ठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

चरित्र - २५ सन १८८३

लेखक - कृष्णशास्त्री चिपळूणक

पु. नांव - साक्रेतिसाचे चरित्र

(श्री प्रिंटर्स अँण्ड स्टेशनर्स, ठाणे)

१२२१

(280)

सं. २९०
२०१९/१२/२

The Department of Public Instruction, Bombay.

A

# LIFE OF SOCRATES.

TRANSLATED FROM ROLLIN

BY

KRISHNA SHÁSTRÍ CHIPLUNKAR.

Sixth Edition— 3,000 Copies.

*Registered for copy-right under the Government of India's Act XXV of* 1867.

Bombay:

GOVERNMENT CENTRAL BOOK DEPÔT.

1888.

( All rights reserved )

*Price Four Annas.*

BOMBAY:
PRINTED AT THE INDIAN PRINTING PRESS.

मुंबई इलाख्यांतील सरकारी विद्याशाळाखातें.

# साक्रेतिसाचें चरित्र.

हा ग्रंथ

रोलिन साहेबाच्या ग्रंथावरून

कृष्णशास्त्री चिपळूणकर

ह्यांनीं

मराठी भाषेंत केला.

आवृत्ति साहावी.
२००० प्रती.

ह्या पुस्तकाची मालकी सन १८६७च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदिली असे.

मुंबई:

गवर्नमेंट सेंट्रल बुक-डिपो.

सन १८८३ इसवी.

ह्या पुस्तकासंबंधी सर्व हक्क सरकारानें आपलेकडे ठेविले आहेत.

किंमत चार आणे.

मुंबईंत
इंडियन प्रिंटिंग छापखान्यांत छापिलें.

# पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना.

ह्या देशात इंग्रज सरकारचा अंमल झाल्यामुळें एतद्देशीय लोकास जे कांहीं लाभ झाले, त्या सर्व लाभांत परम उत्कृष्ट व चिरकालपर्यंत राहणारा असा लाभ ह्मटला ह्मणजे हाच होय कीं, ह्या सरकारच्या उदार आश्रयानें एथें व्यावहारिक भाषांमध्यें उपयुक्त ज्ञानप्रद असे अनेक विषयांवर ग्रंथ होऊं लागले. हल्लीं महाराष्ट्र भाषेंत गणित, वैद्यक, शारीर, पदार्थविज्ञान, इत्यादि शास्त्रीय विषयांवर कांहीं ग्रंथ झाले आहेत; तसेंच हिंदुस्थान, इंग्लंद, वगैरे कांहीं देशाचे इतिहासही झाले आहेत; परंतु प्रसिद्ध पुरुषांचीं चरित्रें ह्या भाषेंत लिहिलेलीं तादृश कोठें आढळत नाहींत. आतां ह्या असल्या चरित्रांपासून उपयोग ह्मटला असता फारच आहे. इतिहासामध्यें ह्मटलें ह्मणजे राजे, मंत्री, सेनापति, इत्यादिकांचे गुणदोष व त्यांच्या बऱ्या वाईट आचरणाचे बरे वाईट परिणाम इत्यादि गोष्टींचें वर्णन असतें; परंतु राजाचे वगैरे अधिकार प्राप्त होण्याचा संभव जरी ह्मटला, तरी तो लक्षावधि मनुष्यांत एकाद दुसऱ्यासच असतो. तेव्हां ज्यांच्या हातून जी गोष्ट घडण्याचा मुळींच संभव नाहीं, ती अमुक रीतीनें केली असतां हित होतें, व अमुक रीतीनें केली असतां अहित होतें, हें समजून मोठासा नफा नाहीं; परंतु चरित्रांमध्यें ज्यांचें वर्णन केलेलें असतें, ते पुरुष बहुतकरून चौघां लोकांसारखे असतात. त्यांस संसारांत ज्या अडचणी व जे प्रसंग आले ह्मणून त्यांच्या चरित्रांत वर्णिलें असतें, त्या अडचणी व ते प्रसंग बहुतांस यावयाजोगे असतात; ह्याकरितां

त्या अडचणी व ते प्रसंग अमुक अमुक थोर मनुष्यांनीं अमुक रीतीनें टाळले, हें समजलें असतां लोकांस फारच उपयोग आहे. हे चरित्र वाचण्याचे सामान्य लाभ झाले.

हें साक्रेतिसाचें चरित्र लिहावयाचा माझा हेतु असा आहे कीं, हा पुरुष पराकाष्ठेचा क्षमाशील, मोठा प्रामाणिक, निस्पृह, व निरभिमानी असा होता. ह्याचे चरित्रांत ज्या उत्तम गुणांचें वर्णन आलें आहे, तें वाचून वाचणारांच्या मनांत त्या गुणांची प्रीति उत्पन्न व्हावी असे ते आहेत. साक्रेतीस हा सामान्य पुरुष नव्हता. हल्लींच्या युरोपियन लोकांच्या विद्याचाराच्या मूलभूत ज्या प्राचीन ग्रीक लोकांच्या विद्या, त्यांचा प्रथम प्रवर्तक साक्रेतीस होय. हें साक्रेतिसाचें चरित्र मुळीं त्याचे शिष्य झेनोफन व प्लेटो, ह्या दोघांनीं ग्रीक भाषेंत लिहून ठेविलें आहे. मुख्यत्वें त्या ग्रंथाचा व इतर प्राचीन ग्रंथांचा साराश रोलिन नामक ग्रंथकारानें फ्रेंच भाषेंत लिहिला आहे; त्याच्या इंग्लिश तरजुम्यावरून हा ग्रंथ मराठी भाषेंत लिहिला आहे.

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

ह्या ग्रंथाची ही दुसरी आवृत्ति तयार करतांना पहिल्या आवृत्तींत लेखकाच्या हस्तदोषानें व दुसऱ्या कारणांनीं जीं व्याकरणाचीं व रचनेचीं वगैरे कांहीं थोडीं अशुद्धें राहिलीं होतीं, तीं दुरुस्त केलीं आहेत.

हा ग्रंथ मुळीं रोलिन साहेबाच्या इतिहासाच्या आधारानें केला होता. अलीकडे यूरोप खंडांतल्या कितीएक महाविद्वानाचीं मतें ग्रीक लोकांच्या प्राचीन इतिहासाविषयीं बरीच निराळीं झालीं आहेत. त्या विद्वानांत ग्रोत साहेबाचें नांव विशेष मुख्य आहे. त्यानें कांहीं थोड्या वर्षांपूर्वी ग्रीस देशाचा एक मोठा इतिहास इंग्रेजी भाषेंत लिहिला आहे. हा ग्रंथ केवळ इंग्लंदांत नव्हे, तर सर्व यूरोप खंडांत मोठा मान्य आहे. सुमारें दहा वर्षांपूर्वी साक्रेतिसाचे चरित्राची पहिली आवृत्ति तयार केली, तेव्हां हा ग्रंथ भाषांतरकर्त्याच्या पाहण्यांत आला नव्हता, व तो ह्या देशांत फारसा प्रसिद्धही नव्हता. असो. ग्रोत साहेबाचे ग्रंथांत साक्रेतिसाचें पुष्कळ वर्णन आहे; व तें कितीएक स्थळीं रोलिन साहेबाचे ग्रंथांतल्यापेक्षां निराळें आहे, त्यावरून, ही दुसरी आवृत्ति तयार करतांना, ती तयार करणारास जेथें अवश्य वाटलें तेथें निराळें मत टिपेंत खालीं लिहिलें आहे. हीं मतें मुख्य ग्रंथांत घातलीं असतां ग्रंथाचें एकंदर संविधानक फारच बदलेल, तें न बदलावें ह्मणून तीं मतें टिपांत घातलीं आहेत. टिपांत घातल्यावरून तीं मतें ह्मणजे कांहीं दुर्बळ आहेत असें वाचणारांनीं समजूं नये.

तसेंच मुळांतला अर्थ जेथें एतद्देशीय वाचणारांस स्पष्ट समजण्यास कठीण वाटला, तेथें तो उघड करण्याकरितांही टिपा घातल्या आहेत.

कृष्णशास्त्री चिपळूणकर,

द० प्रे० क० रिपेंजर.

ही सहावी आवृत्ति फेरफार न करितां दुसऱ्या आवृत्तीप्रमाणें छापिली आहे.

# अनुक्रमणिका.

| अध्याय. | पृष्ठ. |
|---|---|
| पहिला | १ |
| दुसरा | १५ |
| तिसरा | १७ |
| चवथा | २० |
| पांचवा | २९ |
| सहावा | ४५ |
| सातवा | ७४ |

नं.
ता.

# साक्रेतीस ह्या नांवाचा ग्रीक लोकांमध्यें परम विख्यात व मोठा विद्वान् पुरुष होऊन गेला, त्याचा इतिहास.

## अध्याय पहिला.

साक्रेतिसाचा जन्म. तो प्रथमतः मूर्तिकाराचें काम शिकला; परंतु पुढें शास्त्राचा अभ्यास करून त्यांत तो मोठा प्रवीण झाला; नीतिशास्त्राची त्यास रुचि होती; त्याचें आचरण; त्याच्या बायकोचा स्वभाव फार कर्कश होता, तिनें त्यास फार दुःख दिलें; हे विषय ह्या अध्यायांत आहेत.

**साक्रेतीस** हा शालिवाहन शकाचे पूर्वी पांचशें सत्तेचाळीसावे वर्षी ग्रीस देशातल्या अथेन्सनामक शहरात जन्मला. त्याच्या बापाचें नांव **साफ्रोनीसकस**; हा पाषाणमूर्तिकार होता; व त्याच्या आईचें नाव फेनारिती; ही सुइणीचें काम करीत असे. ह्यावरून असें मनात आणावें की, वास्तविक प्रतिष्ठा व खरें थोरपण पुरुषाचे ठायीं येण्यास नीचकुलोत्पत्ति प्रतिबंधक होत नाही. **साक्रेतीस** आपल्या भाषणांत ज्या उपमा आणीत असे, त्यांवरून असें दिसतें की त्यास आपल्या आईच्या किंवा बापाच्या धंद्याची लाज वाटत नसे. तो असें ह्मणत असे की, मूर्तिकार मोठी मेहनत करून अचेतन पाषाणास मनुष्याचें सादृश्य आणितो, आणि मनुष्यें ज्ञानादि प्राप्त करून घेऊन पाषाणाचें सादृश्य घालविण्याविषयी काहींच मेहनत करीत ना

हींत, ही केवढी अचंब्याची गोष्ट आहे! तो असेंही वारं-वार ह्मणत असे की, माझी आई जसा बायकांचा सुईणप-णा करिते, तसा मी लोकांच्या मनांचा सुईणपणा करून त्यांतील गुप्त कल्पना उदयास आणितों. तो कोणत्याही विषयावर बोलूं लागला असतां, असें मार्मिक भाषण करी; व विषयाचें प्रतिपादन करण्याचा त्याचा क्रम इतका बा-लबोध व सरळ असे कीं, ज्यांशीं तो वाद करी, ते त्याच्या प्रश्नांचीं उत्तरें देतां देतां त्याचा विवक्षित अर्थ आपल्याच तोंडानीं वदत. ही रीति आमच्या वाचणाऱ्यांच्या मनांत पक्केपणें यावयाकरितां आह्मी एक उदाहरण लिहितों.

इहलोकीं मनुष्यें जें पुण्य किंवा पाप करितात, त्याचीं इष्ट किंवा अनिष्ट फळें प्राप्त होण्याची जागा परलोक आहे, असें त्यास स्थापणें असल्यास तो ह्याप्रमाणें प्रश्न करी.

प्रश्न. परमेश्वर सृष्टीचा नियंता आहे की नाही?

उत्तर. त्यानें ती उत्पन्न केली, तेव्हां तो तिचें निय-मन करितो, हें उघडच आहे.

प्रश्न. तर ह्या नियंत्याचे ठायीं दयालुता व न्यायिता हे दोन गुण आहेत किंवा नाहींत?

उत्तर. आहेत, ह्यांत काय संशय आहे?

प्रश्न. दयालु व न्यायी अशा नियंत्याचें वास्तविक ल-क्षण काय?

उत्तर. त्याचें लक्षण हेंच की, तो दुष्टांस दंड करितो, व साधूंचें कल्याण करितो.

प्रश्न. इहलोकीं साधूंचें सर्वदा कल्याण होतें काय?

उत्तर. नाहीं. ह्या जगांत त्यांस बहुत वेळ फार दुःखें व संकटें भोगावीं लागतात.

**प्रश्न.** सर्व दुष्टांस तरी येथें शिक्षा मिळते काय?

**उत्तर.** नाहीं. कितीएकांस येथें अगदीच दुःख भोगावें लागत नाहीं; आणि कितीएक पापाची केवळ घरें असतां, त्यांस ह्या जगांत मोठमोठ्या पदव्या प्राप्त होतात, व लक्ष्मी तर त्यांचे घरीं पाणी भरीत असते.

**प्रश्न.** असें जर आहे, तर ईश्वर आपला न्यायीपणा व दयाळूपणा हे कोठें दाखवितो?

**उत्तर.** मला ह्या प्रपंचांत तर त्याचें कांहीं चिन्ह दिसत नाहीं.

**प्रश्न.** बरें तर, ही जी साधूंची व दुष्टांची स्थिति आहे, हिची कधीं तरी उलटापालट झाली पाहिजे कीं नको?

**उत्तर.** ह्यांत काय संशय आहे? अशी एक वेळ झालीच पाहिजे. कारण तसें न होईल तर ईश्वराच्या दयाळूपणास व न्यायीपणास बाध येईल.

**प्रश्न.** बरें तर, ही गोष्ट ते पुरुष जिवंत असतांना जर घडत नाहीं, तर ती केव्हां घडेल?

**उत्तर.** ह्यास मला एवढाच मार्ग दिसतो कीं, मनुष्य मरण पावल्यावर त्यास कांहीं एक विशेष अवस्था प्राप्त व्हावी.

**प्रश्न.** बरें तर, ह्यावरून तुमची खात्री होत नाहीं काय, कीं मरणानंतर परलोकीं मनुष्यास आपल्या पापाचा झाडा द्यावा लागेल ह्मणून?

**उत्तर.** होय; हें मला आतां स्पष्ट दिसतें कीं, जगाचा नियंता जो परमेश्वर, त्याचा दयाळूपणा व न्यायीपणा राहण्याकरितां, पापपुण्याचा जेथें निवाडा होतो असा परलोक अवश्य मानिला पाहिजे. त्यावांचून निर्वाह होत नाहीं.

असो, ह्याप्रमाणें सुगम प्रश्न करून दुसऱ्याची खात्री

करून देण्याचा हा गुण ईश्वरानें साक्रेतिसाचे ठायीं विलक्षण ठेविला होता. तो प्रथम आपल्या बापाचा धंदा शिकून त्यामध्यें मोठा हुशार झाला होता. पाजेनियस राजाचे वेळीं आथेन्स शहरांत त्याच्या हातची मर्कुरी नामक देवाची एक मूर्ति व ग्रेसस नामक देवीच्या एका बैठकीवर उभ्या अशा तीन मूर्ति होत्या. ह्यावरून असें अनुमान होतें कीं, त्या मूर्ति फार उत्कृष्ट होत्या; का कीं त्या जर तशा नसत्या. तर मोठे मोठे वस्ताद मूर्तिकारांनीं केलेल्या मूर्तीत लोकांनीं त्या ठेविल्या नसत्या.

सांगतात कीं, क्रेतो नामें एक गृहस्थ होता. तो साक्रेतीस लहान असतां, त्याची उत्तम बुद्धि पाहून फार आश्चर्य व समाधान पावला; आणि त्यास असें वाटलें कीं, ह्याच्या हातून मोठमोठाल्या गोष्टी व्हाव्या अशी ह्या मुलाची योग्यता आहे; तेव्हां ह्यानें हातीं टाकी घेऊन दगड घडावे हें योग्य नाहीं मग क्रेतोनें त्याला त्याच्या बापाच्या दुकानांतून काढून विद्याभ्यास करावयास लाविलें. साक्रेतिसाच्या गुरूचें नाव आर्किलेयस होतें. त्याची साक्रेतिसावर फार ममता जडली. आर्किलेयस हा, अनेक्सगोरेस नामें एक मोठा पंडित होता, त्याचा विद्यार्थी होता. त्या वेळीं ग्रीस देशांत सिद्धपदार्थविज्ञानशास्त्र, ह्मणजे ज्याच्या योगानें सृष्टपदार्थांचें ज्ञान प्राप्त होतें, तें व ज्यो-

---

१ वाचणारांनीं हें समजलें पाहिजे कीं, साक्रेतिसाच्या वेळीं ग्रीक लोकांत जें पदार्थविज्ञानशास्त्र होतें, तें अर्वाचीन काळच्या त्या नांवाच्या शास्त्रापेक्षां फार निराळें होतें आपल्या लोकांतल्या जुन्या न्यायशास्त्राप्रमाणें किंवा सांख्यशास्त्राप्रमाणें सृष्टि कशी झाली, व कोणत्या द्रव्यांनीं झाली, इत्यादि विचार त्यांत असत.

तिःशास्त्र, ह्मणजे ज्याच्या साहाय्यानें आकाशांतील ग्रहनक्षत्रादिकांच्या गति वगैरे समजतात, तें, अशीं दोन शास्त्रें मात्र लोकांस ठाऊक होतीं. त्याचा अभ्यास साक्रेतिसानें प्रथमतः केला, आणि जेनोफन नामक इतिहासकर्त्याच्या मतीं त्यास ह्या शास्त्रांची चांगली माहितगारी होती; परंतु पुढें ह्या विद्या किती अवघड व किती गहन, व त्यांतील विषय किती परस्पर संकीर्ण आहेत; व इतकें असून त्यांपासून थोडक्यांसच काय उपयोग होईल तो होवो; परंतु मनुष्यमात्रास ह्मटला असता त्याचा फारच थोडा उपयोग आहे; असें त्यास वाटून सर्वोपयोगी जें नीतिशास्त्र, ज्यांत मनुष्यानें ईश्वराशी, इतर लोकांशी, व आपणाशी कसें वागावें हा विषय आहे, त्या शास्त्राचा अभ्यास चालू करावा, असें त्याचे मनांत आलें. सिसरो नामें एक ग्रंथकार होता, त्याचें ह्या विषयावर लिहिणें मोठें चमत्कारिक आहे. तो ह्मणतो कीं, साक्रेतिसानें स्वर्गीचें नीतिशास्त्र भूमंडळी आणिलें आणि तें शहरोशहरीं व घरोघरी विदित करून व तें मनुष्याचे बुद्धीचे आटोक्यात आणून देऊन त्यास मानवी केलें; आणि तेणेंकरून त्याची केवळ प्रापंचिक व्यवहारांत योजना करून लोकांत त्यानें विचारीपणा, प्रामाणिकपणा, व सदाचरणाची आवड, हीं वाढविलीं. त्याचें मत असें असे कीं, ह्या संसारांत आपलीं आवश्यक कर्में कोणती ? सहनशीलता, नेमस्तपणा, शहाणपणा, ह्या गुणांचें स्वरूप काय ? साधुपणा, खरेपणा, प्रामाणिकपणा, ह्यास अनुकूळ व प्रतिकूळ गोष्टी कोणत्या ? तसेंच लोकांत कोणत्या प्रकारची राज्यव्यवस्था असावी, राज्य स्थापण्याचें फळ कोणतें, व राज्य करण्याचे नेम कोणते, व लोकांत

जो पुरुष हुकूम करितो व त्यांवर अंमल चालवितो, त्याचे ठायीं अवश्य पाहिजेत असे गुण कोणते, इत्यादि विषयांची माहितगारी करून घेणें सोडून देऊन, अत्यंत गहन जे विषय, ज्यांत मनुष्याची बुद्धि शिरकतच नाहीं, व जे समजले असताही त्यांपासून मनुष्यास काहीं मोठेंसें सुख होईल असें नाहीं, अशा विषयाची, ह्मणजे पदार्थविज्ञानशास्त्राची, मौज वाटते ह्मणून केवळ त्याचा विचार करून त्यांत आपलें सर्व बुद्धिवैभव व सर्व वेळ घालविणें हा मनुष्याचा एक मूर्खपणा आहे.[१] असो, साक्रेतिसानें नीतिशास्त्राचा अभ्यास करून प्राप्त झालेलें ज्ञान कोणत्या कामास लाविलें, हें पुढील ग्रंथावरून वाचणारांच्या ध्यानांत येईल. साक्रेतिसानें ह्याप्रमाणें व्यासंग चालविला होता, ह्मणून, तो ज्या शहरांत असे, तेथें राहणाऱ्या प्रतिष्ठित लोकास जी कामें करावीं लागत, तीं करावयाची त्यानें सोडली होतीं काय? नाही, नाहीं. सच्छास्त्राच्या अभ्यासाच्या योगानें तो तीं कामें करण्याविषयीं इतर लोकांपेक्षा उलटा अधिक जपत असे. आथेन्स शहरांतील लोकांप्र-

---

१ वाचणारानें लक्ष्य देण्याजोगी मोठी चमत्कारिक गोष्ट ही आहे कीं, साक्रेतिसासारख्या अलौकिक बुद्धिवान् पुरुषास जी विद्या असंभवी व निरुपयुक्त भासली, तीच विद्या (पदार्थविज्ञान) हल्लीं सर्वोत्कृष्ट व अत्यंत उपयोगी होऊन बसली आहे. युरोपाच्या लोकास पृथ्वींत एवढा थोरपणा व प्राबल्य आज प्राप्त झालें आहे, त्याचें मुख्य कारण सूक्ष्मपदार्थांच्या धर्मांचें ज्ञान, व त्या ज्ञानाची संसारसुखाकडे योजना करण्याची युक्ति, हीं आहेत. आगीची गाडी, तारायंत्र, इत्यादि लक्षावधि कल्पना युरोपांत निघाल्या आहेत, त्यांचें बीज सूक्ष्मपदार्थांच्या धर्मांचें ज्ञान होय. ह्यावरून वाचणारानें असें मनांत आणावें की, कोणती गोष्ट संभवनीय किंवा असंभवनीय ह्याचा निर्णय करणे अत्यंत बुद्धिमान् पुरुषास सुद्धां अशक्य आहे.

माणें तो हातांत शस्त्र घेऊन लढावयास जात असे; परंतु दुसऱ्यांत आणि ह्यांत विशेष इतकाच होता कीं, लढाई करण्यांत ह्याचे जे उद्देश असत ते दुसरे लोकांच्या उद्देशापेक्षां श्रेष्ठ व चांगले असत.

त्यानें बहुत मोहिमी केल्या, व तो बहुत लढायांमध्यें गेला होता; आणि सर्व प्रसंगीं सहनशीलता व शौर्य ह्या गुणांविषयीं त्याची वाहवा होत असे. आथेन्स शहरांत सिनेत नामें एक सभा होती. तींतील हा एकदां सभाधिपति झाला होता. त्या प्रसंगीं ह्यानें मोठी न्यायपक्षपातिता प्रकट केली, आणि तसें करण्यांत जरी मोठमोठालें अनर्थ होते, तरी ते त्यानें जुमानिले नाहींत. त्यानें

१ आथेन्सचें राज्य प्रजासत्ताक होतें. तेथें सर्व लोकांस लष्करी शिपायाचें काम करणें अवश्य असे. कितीएक अंशीं ह्याच प्रकारची रीत हल्लीं युरोपखंडांत व अमेरिकाखंडांत चालू आहे. तेथें प्रत्येक मनुष्यास कांहीं वर्षें तरी लष्करांत शिपाई होऊन चाकरी करावी लागते. अशा फौजेस इंग्रेजींत कांस्क्रप्शन किंवा मिलिशा असें ह्मणतात.

२ एका प्रसंगीं आथेन्सच्या लोकांनीं शत्रूवर फौज पाठविली असतां त्या फौजेनें शत्रूचा पराभव तर केला; परंतु ती लढाई पाण्यांत झाली, व त्या प्रसंगीं मोठें तुफान होऊन कितीएक लढाऊ गलबतें फुटून त्यांवरील लोक समुद्रांत बुडून मेले. पुढें लढाईस गेलेले सरदार परत आल्यावर, गलबतें फुटून समुद्रांत बुडून शिपाई लोक मरत असतां ह्यांनीं त्यांस मदत करण्याची हयगय केली, असा गुन्हा त्या सरदारांवर त्यांच्या शत्रूंनीं घातला, आणि ते असें ह्मणाले कीं, ह्या गुन्हेगार सरदारांस ह्या गुन्ह्याबद्दल देहान्त शिक्षा द्यावी कीं नाहीं, असा प्रश्न घालून एकंदर लोकांचें मत घ्यावें, व बहुमताप्रमाणें तजवीज करावी. ह्याप्रमाणे करणें त्या संस्थानच्या कायद्यास विरुद्ध होतें, व ही गोष्ट गैरशिस्त आहे ह्मणून थोड्या लोकांनीं शंका काढिली; परंतु त्या सरदारांस शत्रु फार होते; त्यांनीं अशी धमकी दिली कीं, ह्या गुन्हेगार सरदारांस बचावण्याचा यत्न कोणीं केला, तर त्यांचीं नांवें गुन्हेगारांत घातलीं जातील. ह्या धम-

लहानपणापासून मोतादीनें खाण्यापिण्याची व श्रम करण्याची व किती व कसेही हाल पडले असतां ते काढण्याची आपणास संवय लाविली होती, आणि नगरवासी प्रतिष्ठित लोकास जीं कामें अवश्य करावीं लागतात, त्यांतून बहुतेक कामें वर सांगितलेल्या गुणांवांचून बहुधा घडत नसत. धनाचा धिक्कार व दारिद्र्याची प्रीति ही जितकीं साक्रेतिसाच्या ठिकाणीं होतीं, त्यापेक्षा तीं अधिक ज्याचे ठायीं आहेत, असा मनुष्य सापडणें कठीण. निरिच्छता हा ईश्वरी गुण होय, आणि हा गुण मनुष्यांच्या ठिकाणीं जसजसा वाढतो, तसतसें त्यांचे ठिकाणीं ईश्वरी सादृश्य येतें, असें त्याचें मत असे. त्याची समजूत अशी असे कीं, ईश्वराचे ठायीं जें परिपूर्णत्व आहे, त्याचें एक कारण हें आहे की, त्यास कोणत्याही गोष्टीची अपेक्षा नाहीं, आणि ह्याकरितां मनुष्याच्या अपेक्षा जसजशा कमी होत जातात, तसतसें त्याचे ठायीं ईश्वराचें सादृश्य विशेष येतें. लग्नादि समारंभांत लोकांस सोन्यारुप्याचे अलंकार घालून मिरवतांना, व ऐषआरामीं करून थोरवी दाखवितांना, त्यानें पाहिलें ह्मणजे तो आपल्या अवस्थेचा मोठा संतोष मानून असें ह्मणत असे कीं, अहो, मी केवढा सुखी आहें ! मी जे हे पदार्थ पाहत आहें, व जे प्राप्त होण्याकरितां, व प्राप्त झाल्यावर ज्यांचे रक्षणाकरिता, किती दुःखें भोगावी लागतात, व किती श्रम करावे लागतात, अशा ह्या पदार्थां-

---

कीस भिऊन शंका काढणारांनीं, आमची कांहीं एक शंका नाहीं, ह्मणून सांगितलें. ह्या प्रसंगीं साक्रेतीस मुख्य सभासद होता. त्यानें मात्र सर्व भय सोडून साफ सांगितलें कीं, ही जी तुह्मी गोष्ट करतां ही कायद्यास विरुद्ध आहे व ही मला मान्य नाहीं.

पैकी मला कितीएक पदार्थांची मुळींच गरज नाहीं. साक्रेतिसाच्या बापानें मरते वेळेस त्याकरितां सुमारें दोन हजार रुपये मागें ठेविले होते. पुढें त्याच्या एका मित्रास तेवढ्याच रकमेचें काम होतें, ह्मणून त्यानें ते त्यास दिले. पुढें त्या मित्राचें काम फसून त्याची रकम ठार बुडाली. तथापि एवढी खोट त्याला लागली असतां, तिचें त्यानें आपल्या वैराग्याच्या व समाधानवृत्तीच्या योगानें सहन केलें. असें तसें सहन नव्हे, तर त्या खोटीविषयीं त्यानें चकार शब्दही कधीं काढिला नाही. कानामिक्सनामक ग्रंथात जेनोफनानें असें लिहिलें आहे कीं, त्याच्या घरांतील सर्व चीजवस्त मिळून १२० रुपयावर नव्हती, इतका तो गरीब होता. आथेन्स शहरांतील मोठमोठे धनाढ्य लोक त्याचे मित्र होते, व आपल्या संपत्तींतून काही अंश साक्रेतिसानें घ्यावा ह्मणून त्यानी त्यास जितका पाहिजे तितका आग्रह केला; परंतु तें त्याचें ह्मणणें त्यानें कधींही मान्य केलें नाहीं. त्यास कांही गोष्टीची गरज लागली असता, ती लोकांस सांगण्यास तो कधींही लाजत नसे. एके दिवशीं तो मित्रमंडळींत बसला असतां असें ह्मणाला कीं, मजपाशी जर पैसा असता, तर मी आपणास एक आंगरखा केला असता. ही गोष्ट तो कोणा एकास विशेषंकरून उद्देशून बोलला असें नाही; पण त्यानें आपणास जी निवंता होती, ती सामान्यतः सर्व मित्रमंडळीस सांगितली. हें ऐकून त्याचे सर्व शिष्य, हीं लहानशी नजर साक्रेतिसास मी देईन, मी देईन, असें भांडूं लागले. सिनेका नामें रोमन लोकांत एक मोठा ग्रंथकार होता, तो असें ह्मणतो की, साक्रेतीस ह्मास पुढें

अंगरख्याची गरज लागेल, हें आपल्या बुद्धीनें पूर्वीच समजावयाजोगें असता, तें त्याच्या विद्यार्थ्यास न समजून त्यांनी त्यास ती गरज तोंडानें बोलण्याचा प्रसंग आणिला, ह्यावरून ते फार मंदबुद्धि होते, असें दिसतें. आर्चिलेयस ह्मणून मासिदोनिया प्रांताचा एक राजा होता. त्याच्या मनात फार होतें कीं, साक्रेतिसासारखें रत्न आपल्या पदरीं असावें; ह्मणून त्यानें बहुत नजरा देऊन त्यास बोलावण्यास वकील पाठविला; परंतु ही गोष्ट न स्वीकारितां साक्रेतीस असें बोलला की, आपण त्या पुरुषाकडे गेलों असतां तो जे उपकार करील ते फेडण्याचें जर आपल्या आंगी सामर्थ्य नाहीं तर आपण त्याकडे जाऊं नये; असें एका इतिहासकारानें लिहिलें आहे; परंतु सिनिका हें उत्तर मान्य करीत नाही. तो असे ह्मणतो की, भलत्या भलत्याच गोष्टींत थोरवी व प्रतिष्ठा ही आहेत, असें राजास वाटत असतें, ती त्यांची भ्रांति घालविणें, संपत्तीचे वास्तविक उपयोग अमुक आहेत, त्याकरिता ती पाहिजे, नुसती ती ह्मटली असतां तुच्छ पदार्थ आहे, असें त्याचे मनांत भरवून देणें, राज्य करण्याची कला त्यांस शिकविणें, सारांश, ह्या लोकात आपण वागावें कसें, व कोणत्या रीतीनें चाललें असतां, ह्या लोकी आपला शेवट गोड होईल, ह्या गोष्टींचा त्यांस उपदेश करणें हे राजावर विद्वानाचे लहान प्रत्युपकार आहेत काय? ह्यास्तव आपल्या हातून प्रत्युपकार होणार नाही, ह्मणून साक्रेतिसानें त्या राजाचें बोलावणें पतकरलें नाहीं, असें नव्हे; तर त्यानें असा विचार केला कीं, जेथील लोक स्वतंत्र अशा ह्या आथेन्स शहरात सुद्धां लोकांस आपला स्वतंत्रपणें वागण्याचा प्रकार सोसत नाही,

इतका आपला निस्पृहपणा आहे; तेव्हां अशा निस्पृह स्वभावास स्वेच्छेनें दुसऱ्याची तनेदारी पतकरणें हें योग्य नाहीं; असें वाटून तो मासिदोनचे दरबारीं गेला नाही. ह्याप्रमाणें तो संसारांत विलक्षण हाल काढीत असे, परंतु त्या हाल काढण्यामुळें तो त्या काळच्या विद्वानांसारखा दुर्मुखलेला नसे. तो मंडळींत बसला असता, किंवा कोणाशीं संभाषण करूं लागला असतां, फार उल्हासवृत्ति आणि मोठा रसिक असे; आणि दुसऱ्याचें मनोरंजन करण्याविषयी तर काय केवळ मूर्तिमान् रसच होता. तो पराकाष्ठेचा दरिद्री होता, तरी तो आपलें घर, वस्त्रप्रावरण चांगलें स्वच्छ राखण्याविषयी मोठा बाणा बाळगी. त्या काळी आंतिस्थिनीस नामें एक विद्वान् असे. तो नेहमी मळकट व लकतऱ्या लोंबलेलीं अशीं पांघरुणें आंगावर घेऊन, मी मोठा निस्पृह आहें, असें मोठें उपहासास्पद ढोंग करी. तें साक्रेतिसाला अगदी आवडत नसे. तो एकदा त्यास ह्मणाला कीं, तुह्मी अशा चिंध्या आंगावर घेतां, परंतु त्यांच्या भोंकातून तुमचा गर्व मात्र लोकांच्या दृष्टीस पडतो. त्या पुरुषाचे ठायीं हा एक मोठा गुण होता कीं, त्याचें मन सर्वकाळ शांत असे. ती शांति अशी की, कोणतेंही अरिष्ट येवो, कोणतीही हानि होवो, कोणताही उपद्रव होवो, किंवा कोणतेंही दुःख किंवा अपमान भोगावा लागो; पण ती त्याच्या अंतःकरणांतून कधी ढळलीच नाही. कोणी ह्मणतात की, हा मूळचा फार तापट व हूड होता, व पुढें त्याचे आंगी जो उपशम आला तो उपशम, तो विचार करीत असे, त्या विचाराचें, व आपले चित्ताचा जय करून सन्मार्गी प्रवृत्त करण्याविषयीं जो

त्याचा रात्रंदिवस प्रयत्न चालला होता, त्या प्रयत्नाचेंच केवळ फळ होय, आणि हेंच जर खरें असेल, तर येणें-करून त्याची योग्यता फारच मोठी होती, असें समजावें. त्रिनेका असें लिहितो कीं, मी आतां रागावणार असें जर तुमच्या नजरेस आलें, तर तत्काळ मला त्या गोष्टीची सूचना करीत जा, आणि तुह्मास रागावतांं मीं पाहिलें, तर मीही तुह्मांस तें कळवीत जाईन. खरेंच, आपण जोंपर्यंत शुद्धीवर आहों, व आपल्या आंगाचा संताप झाला नाहीं, तोंपर्यंत काहीं उपाय केल्यास आपणास कोप आवरतां येईल, पुढें येणार नाहीं. आपणास राग येतो आहे, असें त्यास समजल्यावर प्रथमतः मोठ्यानें बोलत असल्यास तो लागलाच आपला स्वर हलका करी, किंवा अगदीच उगा राही. एकदां त्याच्या चाकरानें त्याचा काहीं अपराध केला होता, त्यामुळें आपणास मोठा राग आला, असें समजून तो त्यास ह्मणाला कीं, अरे, ह्या वेळेस जर मला राग आला नसता, तर मीं तुला ठोकलें असतें. एकदां कोणी एकानें त्याच्या तोंडांत मारिली होती; तेव्हां त्यास राग न येता तो हांसून बोलला कीं, शिरस्त्राण केव्हां घालावें हें ठाऊक नसणें हें मोठ्या दुर्दैवाचेंच एक लक्षण आहे. ह्या वेळीं माझ्या डोक्यावर शिरस्त्राण जर असतें, तर मला ह्या मनुष्याचे ताडनापासून कांहीं एक व्यथा झाली नसती. त्याच्या आंगीं जितकी सहनशीलता होती, तितकी सर्व प्रगट करण्यास त्यास घरांतच प्रसंग पडत असे, त्यासाठीं उंबऱ्याबाहेर जाण्याची गरज नव्हती. झांतपी नामें त्याची बायको होती, तिचा स्वभाव पराकाष्ठेचा तापट, छांदिष्ट, व द्वाड, असा असे त्या कर्त्येनें त्यास मनस्वी त्रास

देऊन सहनशीलतेविषयीं त्याचें फारच सत्व पाहिलें. त्या स्त्रीचा स्वभाव तिच्याशीं लग्न करण्याच्या अगोदरपासून त्याला ठाऊक होता. जेनोफनाच्या ग्रंथांत असेंच लिहिलें आहे कीं, बायकोनें केलेला अपमान जर आपणाच्यानें सोसवला, तर मग ज्याबरोबर आपणास वागतां येणार नाहीं, असा तर द्वाड मनुष्य राहणारच नाहीं, अशा खातरीनें दुसऱ्या बायका टाकून जाणून बुजून मी हिशीं लग्न केलें, असें साक्रेतीस आपल्या तोंडानें बोलत असे; आणि त्याच उद्देशानें जर त्यानें तिशी संबंध केला असला तर त्याचा उद्देश पूर्ण सिद्धीस गेला ह्यांत कांही एक संशय नाहीं; का कीं, ह्या जगांत हिजपेक्षां कजाग व आर्ष व दुष्ट दुसरी बायको कधीं झाली नसेल. तिनें कोणती शिवी ह्मणून त्याला द्यावयाची वगळली नाहीं, किंवा कोणताही उपद्रव करावयाचा ठेविला नाहीं. कधी कधी ती त्यावर अशी संतापून आणि बेफाम होऊन जाई कीं, ती उभ्या रस्त्यांत त्याचीं वस्त्रें फाडी. एकदां तर तिनें द्वेषाच्या भिरीरीत तोंडांत ज्या शिव्या आल्या त्या सर्व देऊन शेवटीं त्याचे डोईवर घाणेऱ्या पाण्याची घागर ओतली. असें तिनें केलें तरी तो हासून इतकेंच बोलला की, असा कडकडाट झाल्यावर पाऊस पाहिजेच होता! कोणी प्राचीन ग्रंथकार असें लिहितात की, साक्रेतीस ह्यास दुसरी एक बायको होती, तिचें नांव मिरतो. ती अरिस्तायडीस ह्मणून ग्रीक लोकांत एक मोठा प्रसिद्ध पुरुष होता, त्याची नात होती. त्या दोघींनीं साक्रेतिसास पराकाष्ठेची पीडा दिली. त्यांचें ऐक्यमत ह्मटलें ह्मणजे त्याला शिव्यांची लाखोली वाहण्यात मात्र

असे. ते ग्रंथकार असें ह्मणतात कीं, [1]पिलापोनीससची लढाई चालली असतां मोठी जरीमरी उठून आथेन्स शहरांतील बहुत मनुष्यें मेलीं. मग पुनः लोकांचा भरणा लवकर व्हावा ह्मणून आथेन्स शहरांत असें ठरविलें होतें कीं, ज्यास पाहिजे त्यानें एका काळीं दोन बायका कराव्या. साक्रेतीस ह्यानें ह्या ठरावाप्रमाणें दोन बायका केल्या होत्या. ग्रंथकारास असें काढण्यास एका ग्रंथाचा आधार आहे; परंतु प्लेटो, झेनोफन, वगैरे ग्रंथकार साक्रेतिसाचे शिष्य होते, त्यास त्याची चांगली माहितगारी होती. ते त्याच्या दुसऱ्या लग्नाची कोठें काहीच गोष्ट लिहीत नाहीत. तसेंच झेनोफन, डायदोरस, वगैरे ग्रीस देशाचे इतिहासकार ह्यांनीं पिलापोनीससच्या लढाईची सविस्तर हकीकत लिहिली आहे; परंतु ती लढाई चालली असता आथेन्स शहरांत वर सांगितलेला कायदा ठरला होता, असें त्यानी कोठेंही लिहिलें नाहीं. ह्यावरून साक्रेतीस ह्यानें एका काळीं दोन बायका केल्या होत्या, ही गोष्ट अगदीं खोटी आहे, असें सिद्ध होतें.

---

१ आथेन्सचें राज्य व स्पार्तांचें राज्य ह्या दोहोंमध्यें ही लढाई चालली होती. ग्रीस देशांतील सर्व संस्थानें कांहीं एका पक्षास व कांहीं दुसऱ्या पक्षास अशीं मिळालीं होतीं. ह्या लढाईस इसवी सनाच्या पूर्वी ४३१ व्या वर्षी आरंभ होऊन ती सत्तावीस वर्षे चालली होती. ग्रीस देशाचा दक्षिणेकडील द्वीपकल्परूप जो भाग आहे त्यास प्राचीन काळीं पिलापोनीसस असें ह्मणत; व हल्लीं मोरिया ह्मणतात. त्या भागांतील बहुतकरून सर्व लोक एका ह्मणजे स्पार्तन लोकांच्या पक्षास असल्याने लढाईस तें नाव पडलें.

# अध्याय २.

साक्रेतीस ह्यास एक दीमन् अनुकूल
असे, हा ह्या अध्यायांतील विषय आहे.

हिंदु लोक जसे यक्ष, किन्नर, इत्यादि उपदेव मानितात, तसें ग्रीक लोक दीमन् मानीत असत. साक्रेतीस ह्मणत असे कीं, एका दीमनाचा मजवर प्रसाद आहे. बहुतेक कृत्यात तो मला बुद्धिवाद सांगतो, व माझा सांभाळ करितो. ह्या दीमनाची कांहीं माहिती झाल्यावांचून साक्रेतीस ह्याचा पूर्ण वृत्तांत आमच्या वाचणाऱ्यास समजणार नाहीं, ह्मणून ह्या अध्यायात ह्याविषयींचें निरूपण करितों.

हा दीमन् कोणता होता, ह्याविषयीं ग्रंथकारांची मतें भिन्न भिन्न आहेत; परंतु बहुतेक ग्रंथात त्याचें नाव "साक्रेतीस ह्याचें दीमन्" असें प्रसिद्ध आहे. ही देवता त्यास अमुक गोष्टी कर ह्मणून सांगत नसे; परंतु जींत त्याचा नाश अशी कांहीं गोष्ट तो करूं लागला असतां मात्र, ती करण्यापासून त्याचें मन फिरवीत असे. प्लुतार्क ह्मणून प्राचीन काळच्या लोकांचा वृत्तांत लिहिणारा एक ग्रीक ग्रंथकार होता, त्यानें एका ग्रंथांत साक्रेतीस ह्याच्या दीमनाविषयीं वर्णन केलें आहे. त्यात त्यानें त्या दीमनाविषयीं व त्याच्या अस्तित्वाविषयीं प्राचीन ग्रंथकारांचीं मतें लिहिलीं आहेत. त्या मतांतून जें मत विशेष युक्तिसिद्ध दिसतें, तें येथें लिहितों. आतां ह्या मतावर प्लुतार्क याचा मोठा निर्भर आहे असें वाटत नाहीं. असो.

ही गोष्ट सर्वांस विदित व मान्य आहे की, पुढें काय होईल ह्याचें वास्तविक व स्पष्ट ज्ञान एका ईश्वरास मात्र

आहे; मनुष्यास त्याविषयीं अटकळी मात्र करितां ये
अटकळ, जीस शास्त्रात अनुमान असें ह्मणतात, ती
त्याचा असा प्रकार आहे कीं, कांही गोष्टीमागून व
गोष्ट घडतांना बहुत वेळां पाहून, पाहणारास प्रथम
हिलेली गोष्ट दुसऱ्या गोष्टीस कारण आहे, असें वाटू
गतें. मग जी गोष्ट कारणरूप असते, तिजसारखी
सरी पाहिली असतां तिचे मागून कार्यरूप गोष्ट होईल
असें जें वाटतें, त्याचें नाव अनुमान किंवा अटकळ.
स्पष्ट मनांत येण्याकरितां एक उदाहरण सांगतों. दो
पुरुषांनीं एकास सात आठ वेळ गार पाण्यानें सकाळ
स्नान करतांना पाहिलें, व तितके वेळां त्यास पडसें येता
नाही पाहिलें. एकास असें वाटलें की, पाण्यानें स्नान
करणें हेंच पडशास कारण. दुसरा विचारी होता, त्यास
गार पाण्याचें सकाळचें स्नान पडशाचें कारण असें वाटलें.
आतां एखादा दुसऱ्या मनुष्यास ऊन पाण्यानें स्नान करि-
तांना पाहून ह्या दोघांनीं त्यास पडसें येईल किंवा नाही,-
ह्याविषयीं अनुमानें केली असतां पहिल्याच्या अनुमानापेक्षां
दुसऱ्याचें अनुमान खरें होईल सारांश, कांहीं मनुष्यांनी
केलेलें भाकीत चांगलें जमतें; त्याचें कारण असें असतें कीं,
पुढें घडून येणाऱ्या गोष्टीस साधकबाधक जीं निरनिराळी
कारणें असतात, त्यांमध्यें कोणती बलवत्तर आहेत, असा वि-
चार अभ्यासामुळें त्यांस अगदी बरोबर करितां येतो, आणि
तेणेंकरून अमुक काम परिणामीं सिद्धीस जाईल किंवा फसेल,
हें त्यांस स्पष्ट दिसतें अशी जी भाकीत करण्याची शक्ति, ही
कांहीशी ईश्वरी गुणासारखी आहे, व ही ज्या मनुष्याचे ठायीं
असत्ये, त्यास इतर मनुष्यांपेक्षां श्रेष्ठपणा येतो, व ईश्वरा-

चें कांहीं सादृश्यही येतें. कां कीं, त्या ईश्वरानें पुढील येणाऱ्या गोष्टींविषयीं कशी काय योजना करून ठेविली आहे, हें स्वशक्तीनें त्यास बरेंच समजतें, आणि ती शक्ति लोकांस अद्भुत वाटण्याकरितां आह्मांशी देवता एकांतीं बोलत असते, व तिचा आह्मावर मोठा प्रसाद आहे, अशी ते नानाप्रकारचीं ढोंगें करितात; पण असें केल्यामुळें साक्रेतिसाचा बहुत लोक मत्सर करूं लागले.

---

## अध्याय ३.

देल्फाय् येथील देवानें असा कौल दिला होता कीं, सर्व मनुष्यांपेक्षां साक्रेतिसाचें ज्ञान अधिक आहे, ही गोष्ट ह्या अध्यायांत सांगितली आहे.

हल्लीं हिंदु लोकांत जशीं पंढरपूर, जेजुरी, जगन्नाथ, वगैरे जागृत देवस्थानें मानितात, तसें प्राचीनकाळीं ग्रीस

---

१ ह्या कलमांत रोलिन साहेबाचें मत लिहिलें आहे; परंतु ह्या मता-प्रमाणें साक्रेतिसाच्या आंगीं दांभिकपणाचा दोष येतो, ह्मणजे विशेष अकलेच्या योगानें त्यास पुढील गोष्टी समजत असतां, त्या देवाकडून मला कळतात, असें तो ढोंग करी, असा भाव ह्या कलमांतून निघतो. ही गोष्ट साक्रेतिसाचें, तो मोठा सज्जन व चांगला मनुष्य होता, ह्मणून जें ह्या ग्रंथांत वर्णन केलें आहे, त्याशीं विरुद्ध आहे. तसेंच कांहीं दिवसांपूर्वीं ग्रोत नामक साहेबानें ग्रीस देशाच्या इतिहासाविषयीं जो मोठा प्रसिद्ध ग्रंथ लिहिला आहे, त्या ग्रंथाशीं हें मत विरुद्ध आहे. ग्रोत साहेब असें स्पष्ट लिहितो कीं, तूं अमुक गोष्ट करूं नको असें देव आपणास सुचवितो अशी साक्रेतिसाची वास्तविकच समजूत असे तें त्याचें ढोंग नव्हतें. तो जेव्हां लहान मूल होता, व कार्यकारणभावावरून पुढील गोष्टींचें अनुमान करण्याचें सामर्थ्य त्याचे आंगीं नव्हतें, तेव्हांपासून ती दैवी सूचना त्यास होत असे, असें साक्रेतीस ह्मणे, असें प्राचीन ग्रीक ग्रंथांत लिहिलें आहे.

देशांत देल्फाय नामें एक मोठें विख्यात जागृत देवस्थान मानीत असत. तेथील देवाचें नाव अपालो असें होतें. त्या देवावर ग्रीस देशांतल्या सर्व लोकांची पराकाष्ठेची श्रद्धा असे, आणि त्यांस कोणतीही गोष्ट समजून घ्यावयाची झाली तर ते त्या स्थळीं जाऊन तेथें देवाची एक पुजारीण बाई असे, तीस विचारीत, म्हणजे ती त्याचे प्रश्न कितीही कठीण असले, तरी त्यांची उत्तरें देई. तीं उत्तरें साक्षात् देवाच्या तोंडून आलेल्या उत्तराप्रमाणे ते खरीं मानीत असत; असो आपल्या गुरूचा ज्यास मोठा अभिमान असा साक्रेतीस ह्याचा चिरिफन नामें एक विद्यार्थी होता. तो सहज देल्फाय येथें गेला असता, त्यानें साक्रेतिसापेक्षा शहाणा असा कोणी मनुष्य आहे काय? म्हणून तेथील पुजारणीस प्रश्न केला. तेव्हां तिनें सांगितलें की, कोणी नाहीं. साक्रेतिसास हें उत्तर कळल्यावर तो पराकाष्ठेच्या घोटाळ्यांत पडला. त्यास ह्याचा काहीच अर्थ समजेना. तो आपले मनांत विचार करूं लागला की, अहो, ह्या उत्तराचा अर्थ काय असावा बरें? मजविषयी तर मला पक्की खातरी आहे कीं, माझे ठायीं थोडें किंवा बहुत काहीच शहाणपण नाहीं. बरें कौल खोटा असेल, असाही अदेशा माझ्यानें घेववत नाही; कां की, देवता कधींही खोटें बोलत नाहीत. अशी दोहोंकडून अडचण आल्यावर त्यानें ह्याविषयीं एकाग्रचित्त करून फार विचार केला; व ह्या उत्तराचा अर्थ काढण्यासाठीं मनस्वी श्रमही घेतला. तो असा की, आथेन्स शहरांत एक गृहस्थ असे. तो मोठा अमलदार, राज्यप्रकरणांत मोठा प्रवीण, व मोठा मुत्सदी होता तो त्य

शहरांत जे जे मोठमोठे नामांकित शहाणे असत, त्यामध्यें मोडत असे, व दुसरे लोक त्याच्या अंगीं जितकी योग्यता समजत, तिजपेक्षां आपल्या अंगीं अधिक योग्यता आहे, अशी त्याची खातरी असे. त्यास सक्रेतिसानें प्रथमतः कांहीं प्रश्न करून पाहिले.

त्याशीं संभाषण केल्यावरून सक्रेतिसास दिसून आलें कीं, त्यास कांहीं समजत नाहीं. मग त्यानें हें त्याचें अज्ञान चांगलें समजावयाजोग्या शब्दांनीं त्यास व्यंग्योक्तीनें सुचविलें, तेणेंकरून तो गृहस्थ व दुसरे जे लोक तेथें होते ते सक्रेतिसाचा द्वेष करूं लागले. नंतर राज्यप्रकरणांत बाणा बाळगणारे जे आणखी दुसरे लोक होते त्यांजकडे जाऊन त्याशीं संभाषण करून त्यांसही कांहीं येत नाहीं, असें त्यानें ठरविलें. ह्या त्याच्या शोधापासून त्यास इतकेंच फळ प्राप्त झालें कीं, त्यानें आपणास शत्रु मात्र पुष्कळ करून घेतले. राज्यप्रकरणी लोक संपल्यावर तो कवींशीं संवाद करूं लागला, आणि पाहतो तों त्याचे ठायीं तर, राज्यप्रकरणी लोकांच्यापेक्षां फारच अहंता भरली आहे, व विद्या व ज्ञातेपणा हे गुण खरोखरी ह्मटले असतां फारच कमी आहेत, असें त्याचे नजरेस आलें. पुढें त्यानें ज्ञात्याचा शोध कारागीर लोकांमध्यें चालविला. त्या लोकांत त्याचे दृष्टीस असें पडलें कीं, एकादा कामांत एकादा वाकबगार असला ह्मणजे तेवढ्या वाकबगारीमुळें तो कारागीर आपणास इतरही सर्व कामें येतात असें समजे. सारांश, पुष्कळ बढाई करावी हा दोष आथेन्सांतील सर्व लोकांमध्यें होताच, व ते लोक मोठे डौली असत. ह्यामुळें ते आपण सर्वज्ञ आहों, असा आव घालीत, आणि

कोणताही विषय निघाला असतां त्यावर पांडित्य करण्यास मागें पुढें पाहत नसत; आणि ते स्वभावतः धूर्त असत; ह्यास्तव कोणताही प्रसंग पडला असता, आपलें अज्ञान बाहेर न पडूं देतां ते धौर्त्यानें तो मारून नेत. ह्याप्रमाणेंच त्यानें परदेशचे लोकांतही शोध केला; पण त्यांतही त्यास कोणी ज्ञाता सांपडला नाही.

नंतर साक्रेतिसानें आपणाविषयी विचार केला, व ज्याशीं त्यानें आजपर्यंत वादविवाद केले त्याशी आपली तुलना केली; त्या वेळेस त्याचे नजरेस असें आलें की, मजमध्यें व लोकांमध्यें भेद हाच की, ज्या गोष्टी त्यास वस्तुत. समजत नाहीत त्या मलाही समजत नाहीत; पण मी आपलें अज्ञान प्रांजलपणें पतकरितों, आणि ते तसें करीत नाहीत. ह्या सर्व विचारावरून त्यानें असा सिद्धांत केला कीं, वास्तविक ज्ञाता ह्मटला असता एक ईश्वर मात्र आहे. आतां अपालोच्या पुजारणीनें मला ज्ञाता ह्मटलें त्याचा अर्थ इतकाच कीं, मनुष्यांत वास्तविक ज्ञाता तर कोणीच नाही; तेव्हां जो मनुष्य साक्रेतिसाप्रमाणें आपलें अज्ञान समजतो, तोच मनुष्यांत ज्ञाता होय.

---

## अध्याय ४.

साक्रतीस आथेन्स शहरांतील मुलांस विद्या शिकविण्याचे कामास लागला. त्याचे विद्यार्थी त्याजवर पराकाष्ठेची भक्ति करीत, व तो धर्मसंबंधी व राज्यसंबंधी उत्तम नियम त्याचे मनांत भरवून देई. हा ह्या अध्यायांतील विषय आहे.

साक्रेतिसाच्या जन्मांत त्यास ज्या मुख्य मुख्य गोष्टी घडल्या, त्यापैकीं कांहीं गोष्टी इतके वेळ सांगितल्या.

आता पुढें ज्या गोष्टीनें वाचणाऱ्यांस त्याचें स्वरूप मुख्य-त्वेंकरून समजेल, ती गोष्ट सांगण्यास आरंभ करितों. ती गोष्ट ही कीं, त्यानें सर्व जगास विद्योपदेश करण्या-विषयीं, व विशेषेंकरून आथेन्स शहरांतील मुलांस सुज्ञ करण्याविषयीं, श्रम घेतले. लिबोनियस असें लिहितो कीं, बापाचें मुलांच्या हिताविषयीं व उत्कर्षाविषयीं जसें लक्ष असतें, तसें त्याचें स्वदेशीय लोकांच्या कल्याणाविषयीं लक्ष होतें; परंतु ज्या भ्रांति लहानपणापासून मनुष्याच्या मनांत शिरून त्याच्या काळ्या केंसांचे पांढरे केंस होत तोंपर्यंत त्याचे ठायीं राहिल्या, त्या भ्रांति त्याच्याकडून सोडवणें कठीण असें समजून त्यानें प्रौढ वयांत आलेल्या लोकांचे डोळे उघडणें टाकून तो मुख्यत्वेंकरून मुलाच्या मनांत आपले उपदेश भरवून देण्याविषयीं मेहनत करूं लागला; आणि हा त्याचा विचार फार चांगला होता. कां कीं, ज्या वावरांत फार रान माजलें असतें, व त्यांच्या पाळांनीं आंत शिरून जें व्यापून टाकिलें असतें, त्या वावरांतील सर्व रान तोडून व खोल खोल गेलेलीं मुळें खणून काढून तेथें सुंदर बाग लावण्याचा प्रयत्न करण्यापेक्षां, ज्या वावरां-त मुळीं झाडझुडप व तन नाहीं, तें नांगरून तेथें तो बाग लावण्याविषयीं प्रयत्न करावा, ह्यांत फार शहाणपण आहे; आणि रान माजलेलें वावर चांगलें करण्यापेक्षां प्रौढ वयांत आलेल्या मनुष्यांस सुधारण्यांतही एक विशेष अड-चण आहे. ती ही कीं, वावर नीट करूं लागलें असतां, तें प्रतिबंध करीत नाहीं; पण ह्यांच्या मनांतील भ्रांति काढूं लागलें असतां, हे प्रतिबंध करितात. असो.

त्या वेळेच्या इतर पंडिताच्या जशा शाळा असत, तशी

साक्रेतीस ह्याची शाळा नव्हती; व त्याच्या जशा पाठ सांगण्याच्या वेळा नेमलेल्या होत्या, तशाही ह्याच्या नव्हत्या. भोंवताली विद्यार्थी मंडळी घेऊन मध्यें आपण गुरूच्या आसनावर बसून त्यांस पाठ सांगतो आहे, असें त्यानें कधींच केलें नाहीं. तो प्रसंग आला ह्मणजे जेथें पाहिजे तेथें व जेव्हां पाहिजे तेव्हां लोकांस विद्या शिकवीत असे. स्पेटीच्या वेळेस, चार मंडळींत बसून गोष्टी सांगतांना, जेवतांना, फौजेंत असतांना, फार काय सांगावें, मरावयाच्या पूर्वीं तो तुरुंगांत होता तेथें देखील तो उपदेश करीत असे. प्लूतार्क लिहितो कीं, त्यानें विष प्राशन केल्यावर देखील जीव नित्य आहे, असें सिद्ध करून ती गोष्ट जगास विदित केली; व त्याच समंजस ग्रंथकारानें साक्रेतीस ह्याच्या उदाहरणावरून राज्यप्रकरणसंबंधीं एक उत्कृष्ट गोष्ट सिद्ध केली आहे; परंतु ती गोष्ट प्लूतार्कांचे मनांत प्रथम आली असें ह्मणतां येत नाहीं; कारण सिनेकानें प्लूतार्कांच्या पूर्वीं बहुत दिवस ती स्पष्ट लिहून ठेविली आहे. ती गोष्ट अशी कीं, मनुष्यास लोकनियंता अशी संज्ञा प्राप्त होण्यास, त्याला न्यायाधीशाचें वगैरे सरकारी काम खरोखरी असलें पाहिजे असें नाहीं. असे लोक बहुत आहेत कीं, ज्यांस हीं वर सांगितलेलीं सरकारी कामें असतात, व सरकारांतून अंमलदाराचीं चिन्हें व इतमाम हीं मिळालीं असतात; तसेंच किताबांनीं थोरपणा येतो, असें जर कोणास वाटत असलें, तर मोठे मोठे रावबहादूर वगैरे किताबही बहुतांस असतात; तथापि वास्तविक पाहिलें असतां, हे कोणी अत्यंत नीच व हलक्या पदवीचे लोक आहेत, असें एखाद्या वि-

चारी मनुष्यास वाटावें, अशी त्यांची योग्यता असते; तर दुसऱ्यानी कोणत्याही कामात आपली मसलत घेतली असतां त्यास उत्तम शहाणपणाचा उपदेश कसा करावा; आपल्या नगरातील लोकांस सदाचरण करण्याविषयी उत्तेजन कसें द्यावें; व त्यांचे मनात प्रामाणिकपणा, देवाधर्मावर भक्ति, उदारपणा, स्वदेशप्रीति, इत्यादि सद्गुण कसे भरवून द्यावे; हें ज्या पुरुषास कळतें, तो मग किती कां दरिद्री असेना, किंवा मोडक्या झोंपडींत कां राहीना? प्लूतार्क ह्मणतो कीं, तो पुरुषच खरा फौजदार, खरा न्यायाधीश, व खरा लोकनियंता होय. ।

साक्रेतीस ह्या योग्यतेचा पुरुष होता. त्यानें शिष्ये तरबेज केले, व ग्रीस देशातील लोकांच्या मुलांस शहाणपण शिकविलें, आणि तेणेंकरून त्यापासून त्या देशास जो फायदा झाला, तो इतका मोठा होता, असें शब्दांनीं पुरतेपणें सांगता येत नाही. त्याच्यासारखे पुष्कळ व विख्यात विद्यार्थी कोणत्याही गुरूपाशी नव्हते. त्याच्या विद्यार्थ्यांपैकीं एकटा प्लेतो नामें विद्यार्थीच हजारों विद्यार्थ्यांच्या बरोबरीचा होता. हा प्लेतो साक्रेतीस ह्यास किती लोकोत्तर मानीत असे, हें पुढील गोष्टीवरून समजेल. जेव्हा तो प्लेतो मरावयास टेंकला, तेव्हां त्यानें परमेश्वराचें स्तवन करून विशेषतः ह्या तीन गोष्टींविषयी त्याचा मोठा आभार मानिला. त्या तीन गोष्टी ह्या होत्या. पहिली, त्यानें त्यास मनुष्यजन्मास घालून विचार करण्यास बुद्धि दिली; दुसरी, त्यानें त्यास अडाणी लोकांत

* प्राचीन काळचे बहुतेक सर्व लोक आपणांखेरीज इतर लोकांस अडाणी समजत व नीच मानीत. ह्याच प्रकारची प्राचीन ग्रीक लो-

उत्पन्न न करितां ग्रीस देशांत उत्पन्न केलें; आणि तिस-री गोष्ट ही कीं, साक्रेतीस जिवंत होता त्या वेळीं त्यास जन्मास घातलें. ह्या तिन्ही गोष्टींचें आनुकूल्य जेनोफना-सही होतें. त्याची अशी गोष्ट सांगतात कीं, तो एक दिवस रस्त्यातून चालला असतां, त्यास साक्रेतीस भेटला. आणि त्यानें त्यास थोपवून पुसलें कीं, शिधा कोठें विकत मिळतो, हें तुला ठाऊक आहे काय ! ह्या प्रश्नाचें उत्तर देणें जेनोफनास कठीण पडलें नाहीं. नंतर साक्रेति सानें पुनः विचारलें कीं, मनुष्यांस सदाचरणाचें ज्ञान कोणत्या ठिकाणीं प्राप्त होतें ? ह्या दुसऱ्या प्रश्नानें जेनो फन निरुत्तर झाला, हें पाहून साक्रेतीस त्यास ह्मणाला कीं, तें ठिकाण समजण्याची जर तुला इच्छा असली, तर माझ्याबरोबर चल, ह्मणजे तें तुला मी दाखवीन. तेव्हां जेनोफनानें साक्रेतिसानें सांगितल्याप्रमाणें केलें, आणि पुढें साक्रेतिसावर त्याची इतकी भक्ति बसली कीं, त्यानें आपल्या त्या गुरूचीं संभाषणें जमा करून ग्रंथरूपानें प्रथमतः प्रसिद्ध केलीं

अरिस्तिपस हा आपला स्नेही जो इस्कोमाकस ह्याज-बरोबर संभाषण करीत बसला होता, त्या वेळेस इस्कोमा कसानें संभाषणांत साक्रेतिसाच्या कांहीं कोट्या आणिल्या. त्या कोट्या ऐकून अरिस्तिपसाचें मन मोहीत होऊन साक्रेतिसाचा शिष्य होण्याविषयीं त्यास अशी उत्कंठा लागली कीं, त्या चिंतेनें तो दिवसानुदिवस वाळत चाल-

---

काची समज होती. प्राचीन हिंदु लोक आपणास आर्य ह्मणजे श्रेष्ठ ह्मण-णन व इतर सर्व लोकांस म्लेंच्छ ह्मणजे अडाणी असा शब्द लावीत. प्राचीन यहुदी लोकांचीही अशीच समजूत होती.

ला, व त्याचें तोंड सुकत चाललें. शेवटीं त्याचा उद्देश जेव्हा सिद्ध झाला, व ज्या गोष्टी परंपरेनें दुरून कानीं आल्या असताही त्यास इतक्या गोड लागल्या, त्या गोष्टी जेथून निघाल्या, तेथें मुळापाशीं जाऊन, मनुष्यास अनर्थ कोणता, व तो दूर करण्याचा उपाय काय, ह्याचें ज्ञान करून देणारें विद्यारूप अमृत जेव्हां तो पोटभर प्याला, तेव्हां त्याचा सर्व चिंताज्वर निवून त्यास समाधान वाटलें.

ग्रीस देशांत **मैगारा** नामें एक लहानसें राज्य होतें. तेथें **साक्रेतिसाचा युक्लिद** नांवाचा एक शिष्य राहत होता. त्याची जी गोष्ट आहे, तीवरून त्याच्या शिष्यास त्याचे उपदेश ऐकण्याची किती उत्कंठा होती, हें वर सांगितल्या गोष्टीपेक्षांही चांगलें स्पष्ट दिसतें. **साक्रेतिसाच्या** वेळीं **आथेन्स** आणि **मैगारा** ह्या दोन संस्थानांच्या मध्यें लढाई चालू होती. ती लढाई इतक्या आकसानें चालली होती कीं, **आथेनियन** लोकांनीं आपल्या सेनापतींकडून, आम्ही दरसाल दोन वेळ **मैगारा** लुटून उद्ध्वस्त करूं, अशी शपथ वाहून घेतली होती; व त्यांनीं कायदा ठरविला होता कीं, **मैगारा** येथील कोणी एकानें अतिक्रांत (आथेन्सच्या राज्यांत) पाय घालूं नये; घातल्यास त्यास प्राणान्त शिक्षा होईल! परंतु ह्या कायद्याच्या भयानें **युक्लिदाच्या** मनाची **साक्रेतिसाजवळ** विद्या शिकण्याची आस्था नाहींशी होणें तर कोठून, परंतु कमी सुद्धां झाली नाहीं! तो संध्याकाळ झाली ह्मणजे जनानी पेहराव करून, व तोंडावर बुरखा घेऊन आपलें शहर सोडून रात्रीं **साक्रेतिसाचे** घरीं येई, आणि तेथें सर्व रात्र राहून पहाट झाली ह्मणजे पुनः आलेल्या वेषानें माघारा आपल्या घरीं जाई.

आथेन्स शहरांतील मुलास साक्रेतीस जिकडे जाईल, तिकडे त्याच्या मागें जाण्याविषयीं जो उल्हास वाटे, तो सांगितला तर एखाद्यास खरा वाटणार नाहीं. तो उल्हास इतका मोठा असे कीं, नेहमीं त्यास चिकटून राहून त्याचीं सुरस भाषणें ऐकावीं, ह्मणून त्यांनीं आपलीं आईबापें सोडिलीं, व ते ख्यालीखुशाली करणाऱ्या मंडळींत जाईनातसे झाले. आल्किबेदीस जो सर्व आथेन्सांत मनस्वी तापट असे, त्याची गोष्ट पुढें लिहिली आहे, तीवरून साक्रेतिसाच्या बोलण्याची खुबी कशी होती, ह्याचा निर्णय वाचणारांस करितां येईल. तो इतका जाज्वल्य होता, तरी साक्रेतिसानें कधींही त्याचा मुलाजा केला नाहीं. त्याची रागाची उसळी शांत करण्याविषयीं व त्यास गर्वाची मोठी बाधा होती ती काढण्याविषयीं, तो नेहमीं झटत असे. एक दिवस आल्किबेदीस आपल्या दौलतीची व वतनाची मोठी बढाई मारीत होता, ( असेंच आहे कीं, उमेदवार बडे लोक संपत्तीनें बहुतकरून फुगून जात असतात ) त्या वेळेस साक्रेतिसानें पृथ्वीचा नकाशा त्याकडे नेऊन त्यावर आत्तिका प्रांत कोठें आहे तो दाखीव ह्मणून विचारिलें; परंतु तो प्रांत फार लहान पडला, ह्यास्तव तो त्या नकाशावर त्यास लवकर दिसेना. मग फार श्रम करून त्यानें तो प्रांत शोधून काढल्यावर साक्रेतीस त्यास ह्मणाला, आतां ह्यांत तुझी वतनी जमीन कोठें आहे ती दाखीव. आल्किबेदीस ह्मणाला, ती फार लहान आहे; ती ह्या नकाशावर निराळी करून कशी दाखवितां येईल? हें ऐकून साक्रेतिसानें उत्तर दिलें, बरें तर बाबा, जमिनीचा जो तुकडा डोळ्यांनी पुरता दिसत नाहीं

त्या क्षुल्लक तुकड्यास तूं कसा मोठा मानितोस? साक्रेतिसाचा हा विचार ह्याहूनही पुढें चालविल्यास चालावयाजोगा आहे. आतिका प्रांत तरी सगळ्या ग्रीस देशाशी लावून पाहिला असता काय आहे? ग्रीस देश युरोपाशी लाविला असता काय आहे? आणि यूरोप सर्व पृथ्वीशी लाविलें असता काय आहे? बरें, पृथ्वी तरी तिजभोंवताली जे ग्रहरूप मोठमोठाले गोल आहेत, त्यांनी व्यापलेल्या अफाट अंतराळापुढें कोण पदार्थ आहे? अहो, पृथ्वीवरील अत्यंत प्रतापी राजा देखील ह्या प्रमाणानें पाहता काय अगदी क्षुद्र कीटकासारखा आहे!

सोफिस्त ह्मणून कोणी पंडित असत; ते राजनीतील मोठे पटाईत विद्यार्थी तयार करण्याचा मोठा बाणा बाळगीत. त्या पंडितांच्या हाताखाली विद्याभ्यास केल्यामुळें आथेन्स शहरातील उमेदवार लोकांचे मनात प्रतिष्ठा मिळविण्याची अनिवार्य इच्छा उत्पन्न झाली असे, तीमुळें, व थेमिस्तक्लीस, सेमैन, व पिरिक्लीस, ह्या परमविख्यात सेनापतीचा प्रताप ऐकून आपण त्याप्रमाणें व्हावें, असें त्यास वाटत असे; त्यामुळें जी व्हावी ती गोष्ट करावयास आपण योग्य आहों, असें त्यांस वाटून ते राज्यातील अत्यंत मोठमोठ्या जागांची आशा करीत. त्या उमेदवारांपैकी ग्लाको नामें एक प्लेटोचा भाऊ होता, तो वीस वर्षांचा होता. त्याचें वय मोठें काम झेंपतां यावयाजोगें नसतां, व त्याचे आंगी अक्कल व कर्तृत्व हीं ही नसता, आपण सरकारी कामें करावीं, ह्या गोष्टीचें वेड त्याच्या डोक्यांत असें पक्कें शिरलें होतें कीं, तें मिळण्याच्या छंदापासून त्याच्या कुटुंबापैकीं किंवा त्याच्या मित्रांपैकी कोणाच्यानें त्याचें मन फिरवेना

हा प्लेटोचा भाऊ ह्मणून त्यावर **साक्रेतिसाची** प्रीति असे आणि **साक्रेतिसानें** शेवटीं त्याचें मन वळवून त्याजकडून कोणाच्यानें जो छंद सोडवत नव्हता, तो सोडविला; तो असा.

एके दिवशीं **साक्रेतिसास** तो भेटला असतां **साक्रेतिसानें** त्याशी प्रथम अशा चातुर्यानें व अशा खुबीनें भाषण केलें कीं, त्यानें आपण काय ह्मणतों, हें ऐकण्यास ग्लाकोस गुंतविलें असतां तो त्याचें भाषण ऐकावयास उभा राहिला. हीच मोठी गोष्ट त्यानें मिळविली. मग साक्रेतीस ह्मणाला, का, ग्लाको, ह्या आपल्या लोकसत्ताक राज्याचा कारभार चालवावा अशी तुह्मांस मोठी इच्छा आहे ह्मणून मी ऐकतों. ग्लाकोनें उत्तर दिलें, होय, आहे खरी. **साक्रेतीस** ह्मणाला, वाहवा ! हा तुमचा हेतु फारच उत्कृष्ट आहे ! ह्यापेक्षा उत्कृष्ट उद्देश दुसरा उरलाच नाहीं. का कीं, तुमचा हा हेतु सिद्धीस गेल्यास तुह्मांला आपल्या मित्रांचें कल्याण करण्याची, आपल्या कुळाचा नावलौकिक वाढविण्याची, व आपल्या देशाची मर्यादा वाढविण्याची शक्ति येईल; आणि तुह्मी ह्या योगानें केवळ ह्या लहानशा **आथेन्स** शहरांतच विख्यात व्हाल असें नाहीं, तर सर्व **ग्रीस** देशांत विख्यात व्हाल; आणि कदाचित् थिमिस्तक्लिसाच्या सारखी तुमची कीर्ति इतर देशींच्या अज्ञानी लोकांतही पसरेल. सारांश, तुह्मी कोठें का असानां, तुह्मी आपल्या गुणांनीं असें कराल कीं, सर्व जग तुमचा सन्मान ठेवील, व तुमची वाहवा करील.

ग्लाको हा उमेदवारच होता. त्यास हें कोमल व मनोरंजक भाषण फारच गोड लागलें; परंतु साक्रेति

त्यानें आपणास बोलण्यांत पकडलें, हें त्यास कळलें नाहीं. मग तो आग्रह करून घेतल्यावांचून संतोषानें उभा राहिला, आणि साक्रेतिसाचें व त्याचें संभाषण पुढें चाललें. साक्रेतीस ह्मणाला, बरें, ग्लाको, प्रतिष्ठा मिळवावी व थोरपणा मिळवावा, अशी तुमची इच्छा आहे; त्या पक्षीं आपण लोकांच्या उपयोगीं पडावें, असा तुमचा उद्देश निःसंशय असेलच. ग्लाकोनें उत्तर दिलें, होय. तो उद्देश आहे, ह्यांत काय संशय? साक्रेतीस ह्मणाला, ग्लाको, तुह्मांस देवाची शपथ आहे, मला एवढें कृपा करून सांगा की, ह्या संस्थानाच्या लोकांच्या उपयोगीं पडण्यासाठीं तुह्मी प्रथम कोणती गोष्ट करणार? तो घुटमळला, व आतां उत्तर काय द्यावें, ह्याचें मनन करीत आहेसें पाहून, साक्रेतीस आपणच पुढें बोलूं लागला. ग्लाको, मला वाटतें की, हें संस्थान गबर करावें, ह्मणजे येथील जमाबंदी वाढवावी, असा तुमचा उद्देश असेल, नाहीं बरें? ग्लाको ह्मणाला, तुह्मी माझ्या मनांतलीच गोष्ट बोललां. साक्रेतीस ह्मणाला, मग तर ह्या संस्थानांतल्या जमाबंदीच्या कामांत तुह्मी चांगले हुशार असालच? व तिचा एकंदरीचा आकार तुह्मास पुरतेपणीं माहीत असेलच? पूर्वी न कळून आलेल्या एखाद्या कारणानें काहीं एखाद्या खात्यांतील पैसा उत्पन्न व्हावयाचा फसल्यास, त्यामुळें पडलेली खांच दुसऱ्या काहीं उपायानें पैसा उभा करून आपणास भरतां यावी, ह्मणून आतां सांगितलेल्या गोष्टीचा विशेषेंकरून अभ्यास करावयास चुकलां नसालच. कसें काय बरें ग्लाको? ग्लाको ह्मणाला, ही गोष्ट बाबा माझ्या मनांत आजपर्यंत कधींच आली नाहीं. साक्रेतीस ह्मणाला, बरें,

ह्या संस्थानांतील एकंदर खर्च तरी निदानपक्ष तुह्मास ठाऊक असेल; का कीं, निष्कारण जे खर्च आहेत, जे केल्यावांचून अडचण पडणार नाहीं, ते तोडल्यापासून कोणता फायदा होतो, हें राज्यकारभार करणारास समजणें आवश्यक आहे. ग्लाको ह्मणाला, पहिली गोष्ट जशी मला माहीत नाहीं, तशी हीही गोष्ट मला माहीत नाहीं; असें मी आपलें अज्ञान पतकरतों. साक्रेतीस ह्मणाला, बरें तर, मग हें संस्थान गबर करण्याचा बेत तुह्मांस कांहीं काळपर्यंत तहकूब ठेविला पाहिजे; का कीं, त्याची जमा किती व खर्च किती हें तुह्मास माहीत झाल्यावाचून तुमच्या हातून ती गोष्ट होणें अशक्य आहे.

ग्लाको ह्मणाला, परंतु तो उद्देश सिद्धीस नेण्याचा आणखी एक मार्ग आहे; त्याचा तुह्मी अद्यापि उल्लेख केला नाहीं. संस्थानच्या शत्रूंच्या नाशानेंही तें गबर करितां येतेंना? साक्रेतीस बोलला, तुह्मी ह्मणतां हें वास्तविक आहे; परंतु ती गोष्ट संस्थानाच्या प्रबळतेवर आहे. तें जर दुर्बळ असलें तर लढाईनें त्याजवळ जी काय संपत्ति असेल, ती गमावून तें संकटांत मात्र पडेल; ह्याकरितां लढाई करावी ह्मणून जो इच्छितो, त्यास आपली फौज किती आहे, हें जाणणें आवश्यक आहे. आपला पक्ष प्रबळ दिसल्यास त्यानें लढाई करण्याची मसलत बेधडक द्यावी; आणि तो जर दुर्बळ दिसला तर त्यानें बुद्धिवाद सांगून लोकांचीं मनें लढाई करण्यापासून फिरवावीं. बरें, ग्लाको, तुह्मास आपलें व आपल्या शत्रूचें जलमार्गानें व स्थलमार्गानें किती बळ आहे, तें ठाऊक आहे काय? दोहीकडील, ह्मणजे जमिनीवरील व समुद्रावरील, सैन्यें किती आहेत व कशीं आ-

हेत, ह्याचा लेख तुह्मांपाशीं आहे काय? असला तर मला कृपा करून दाखवा बरें. ग्लाको ह्मणाला, सध्या तो मज-पाशीं नाहीं. साक्रेतीस उत्तर कारतो, बरें तर मला असें दिसतें कीं, आज जर तुमच्या गळ्यात सर्व राज्यकार-भार घातला, तर तुह्मास शत्रूशीं लढाई करवणार नाहीं; कां कीं, ती करावी किंवा न करावी, ह्याचा निश्चय करण्यासाठीं अगोदर तुह्मांस श्रम करून बहुत गोष्टींचा शोध केला पाहिजे. ह्याप्रमाणें ग्लाकोस अगदींच माहीत नाहींत, अशीं आणखी कितीएक कलमें साक्रेतिसानें त्यास पुसलीं. शेवटीं साक्रेतिसानें त्याजकडून असें कबूल करविलें कीं, जे लोक, लोकाचे उपयोगी पडण्याची आप-ल्या आंगीं काहींच तयारी न करितां आपली लोकांत मो-ठी प्रतिष्ठा असावी, व आपणास मोठमोठ्या जागा मिळा-व्या, व आपण उंच उंच पदवीस चढावें, ह्याविषयीं अनि-वार इच्छा करून विचार न करितां राज्यकारभारांत शिरतात, ते लोक अत्यंत उपहासास्पद होतात. साक्रे-तीस ह्यानें त्यास सरते शेवटीं असा उपदेश केला कीं, ग्लाको, तुह्मांवर माझी ममता फार आहे, ह्मणून सांगतों. जपा बरें, नाहीं तर प्रतिष्ठा मिळविण्याच्या इच्छेनें वेडे होऊन भलतेंच काम हातीं घ्याल, आणि त्यांतच तुमची कोती बुद्धि उजेडास येऊन तुमची लोकांत अप्रतिष्ठा मात्र होईल!

ग्लाको साक्रेतिसाच्या बुद्धिवादानें शहाणा झाला, आणि त्यानें सर्व विवक्षित गोष्टी समजून घेऊन तो मग दिवाणदरबारात वागूं लागला. हा उपदेश सर्वांस सर्वकाळ लागू आहे. जो ग्लाकोसारखा राज्यातील मुख्य मनुष्य

होऊं इच्छित असेल, त्यासच नाहीं, तर संसारातील गरीबी, श्रीमंती, वगैरे सर्व अवस्थांतील मनुष्यांस, व लहानमोठ्या सर्व अधिकारांच्या मनुष्यास उपयोगीं पडावयाजोगा आहे.

साक्रेतीस आपल्या मित्रास लहानपणीं सरकारी उद्योग धरण्यास कधी सांगत नसे. तर उद्योगात आपणास यश येण्यास जें ज्ञान जरूर आहे, त्याचें संपादन करण्यासाठीं प्रथमतः श्रम करावयास तो नेहमी त्यास सांगत असे. त्याचें ह्मणणें असें असे कीं, गुरूच्या साहाय्यावाचून शिल्पातील साधारण कला देखील येत नाहीत, मग जें ज्ञान प्राप्त झालें असतां मानवी ज्ञानाचा कळस झाला, असें जें राज्यें चालविण्याचें ज्ञान, तें आंगी यावयास पूर्वी काहीही श्रम व व्यासंग करावयास नको, असें ज्या मनुष्यास वाटतें त्या मनुष्यास किती बरें मुर्ख समजावें ? जे लोक सरकारी काम करण्याची उमेद धरितात, त्यांचीं सर्व कृत्यें, न्याय व प्रामाणिकपणा एतन्मूलक असावी, अशी आपल्या ऐकणारांची खात्री व्हावी ह्मणून तो फार झटे; तसेंच स्वदेशावर प्रीति, व लोककल्याण करण्याची पराकाष्ठेची हौस, व देव परम दयाळू व परम समर्थ आहेत, अशी पूर्ण श्रद्धा, हीं विशेषतः त्यांचे मनात भरवून देण्यासाठी तो मनस्वी यत्न करी. कारण त्याचें मत असें होतें की, हे वर सांगितलेले गुण जर मनुष्याच्या आंगी नाहींत, तर इतर गुण जसे जसे त्याचे ठायीं येतात, तसा तसा तो अधिक दुष्ट होत जातो. युथिदीमस व साक्रेतीस ह्या दोघांचा, देवानीं ह्या जगाची जी व्यवस्था केली आहे, तीविषयीं जो संवाद झाला, तो पुढील लोकांस कळावयासाठीं जेनोफनानें ग्रंथात लिहून ठेविला आहे. त्या सं-

वादाची, प्राचीन काळचे उत्तम उत्तम जे लेख आहेत, त्यांत गणना केली आहे. तो संवाद येणेंप्रमाणें —

**साक्रेतीस युथिदीमसास** ह्मणतो कीं, मनुष्याचें ज्या गोष्टींवांचून चालत नाहीं, अशा गोष्टींची देवांनीं तर्तूद किती काळजीनें करून ठेविली आहे, त्याचा तुह्मी कधीं विचार केला आहे काय? **युथिदीमस** ह्मणतो, नाहीं. कधीं केला नाहीं. **साक्रेतीस** ह्मणतो, उजेड हा प्राण्यास किती आवश्यक आहे! पहा बरें, देवाची ही देणगी, विचार केला असतां किती अमोलिक आहे! **युथिदीमस** हें ऐकून ह्म०, उजेड नसता तर आह्मांस डोळे असून नसून सारखेंच झालें असतें, व ही सर्व सृष्टि असूनही नाहीं सारखी झाली असती. आपणांस मध्यें मध्यें विश्रांति पाहिजे ह्मणून त्यांनीं रात्रीही केल्या आहेत. **साक्रेतीस** ह्म०, तुह्मी ह्मणतां हें बरोबर आहे; आणि ह्याचकरितां आपण त्यांची स्तुति करावी व त्यांचा आभार मानावा. त्यांनी तेजःपुंज सूर्य केला आहे, त्याच्या योगें दिवस होतो, व दिवसाचे निरनिराळे भाग आपणास समजतात; व त्यांनी असा नियम केला आहे कीं, सूर्याच्या प्रकाशानें सृष्टींतील सर्व चमत्कार प्राण्यांच्या दृष्टीस पडावे, व त्याच्या योगानें त्यांस उष्णता प्राप्त होऊन त्यांचें प्राणधारणही व्हावें. त्यांच्याच सत्तेनें निष्प्रभ असा जो चंद्र तो व सर्व तारे रात्रीं प्रकाशित होतात. अहो! रात्र, दिवस, उजेड, अंधार, श्रम, विश्रांति, इत्यादि द्वंद्वें उत्पन्न करून त्यांनीं सृष्टींत जें वैचित्र्य केलें आहे, त्यापेक्षां चमत्कारास्पद दुसरें कांहीं आहे काय? आणि हें सर्व मनुष्यांच्या सुखार्थ व कल्याणार्थ केलें आहे. नंतर अग्नि व पाणी ह्यां

पासून संसारांतील जीं आपलीं असंख्य कामें होतात, त्यां- पैकीं पुष्कळ साक्रेतिसानें युथिदिमसास सांगितलीं, आणि माणसाचा संबंध ज्या ज्या गोष्टींत आहे, त्या सर्व गोष्टींनीं त्यास सुख व्हावें, ह्याविषयीं देवांचें फार चमत्का- रिक लक्ष्य आहे, असा विचार करीत होत्साता त्यानें यु- थिदीमसाशीं संभाषण पुढें चालविलें. अहो! हिंवाळ्यां- नंतर सूर्य उत्तरेकडे येतो, व मागल्या ऋतूंतलीं फळें वा- ळून व कुजून गेलीं असतात, त्यांचे जागीं नवीं फळें पि- कवितो. आणि हें काम केल्यावर तो जर तसाच उत्तरेस राहिला तर आपणांस त्याच्या उष्णतेपासून उपद्रव होई- ल, ह्मणून तो पुनः दक्षिणेस परत जातो; परंतु दक्षिणेस एक मर्यादा आहे, तिच्या पलीकडे तो गेल्यास आपण उत्तरेकडील लोक थंडीनें मरून जाऊं; परंतु तो अनर्थ आपणास प्राप्त होऊं नये, ह्मणून तो त्या मर्यादेपर्यंत पों- होंचला ह्मणजे मागल्यानें उत्तरेकडे वळतो. असा तो आकाशांत जेथें असल्यानें जीवास त्यापासून पीडा व्हाव- याची नाहीं, अशा जागीं तो फिरतो. ह्या सर्व गोष्टी पाहून तुह्मास काय बरें वाटतें? देव अत्यंत कृपाळू आहेत, असें वाटत नाहीं काय? दुसरें असें कीं, आपण थंडींतून उष्णतेंत किंवा उष्णतेंतून थंडींत जर एकदम गेलों, तर त्यांतून एकाचेंही आपणांस सहन करवणार नाहीं. आपली प्रकृति बिघडेल, ह्मणून सूर्य आपणाकडे येतांना व आप णांकडून जातांना इतका हळू हळू चालतो कीं, होत होत पराकाष्ठेची उष्णता झाली, किंवा पडत पडत पराकाष्ठेची थंडी पडली तरी ती बहुतकरून आपणांस कळून येत नाहीं. हें पाहून तुह्मास मोठी मौज वाटत नाहीं काय?

ऋतूंच्या व्यवस्थेवरून परम कृपाळू व सृष्टि चालविणारे जे देव, ते मनुष्यांच्या कल्याणास फार सावध आहेत, असें कोणाच्या मनात आल्यावाचून राहील काय?

युथिदीमस ह्मणतो, तुह्मी ज्या ह्या सर्व गोष्टी सांगितल्या, ह्यावरून मनुष्यावर अनुग्रह करून त्याचें कल्याण करण्याखेरीज देवास दुसरा काही उद्योगच नाहीं, असें मला वाटतें. देव मनुष्यांविषयीं फार दयाळू आहेत. ह्याविषयीं माझी पक्की खातरी झाली; परंतु एका गोष्टीत माझी बुद्धि अगदीं शिरत नाही; कुंठित होते. ती गोष्ट अशी कीं, मनुष्यें ज्या सुखाचा अनुभव घेतात, ती सर्व सुखें पशूंसही आहेत; ह्यावरून मनुष्येंच देवाची आवडती आहेत, असें वाटत नाहीं. साक्रेतीस बोलला, होय खरें; पशु प्राय. सर्व सुखाचा अनुभव घेतात; परंतु पशु मुळी मनुष्यांच्याच उपयोगीं पडावयासाठीं केले आहेत, ही गोष्ट तुमच्या मनात येत नाहीं काय? जनावरात अत्यंत बळकट जी जनावरें आहेत, त्यांस देखील मनुष्यें आपल्या सत्तेंत आणितात, आणि त्यास लढाईच्या व शेतकीच्या व संसारांतील दुसऱ्या अनेक प्रकारच्या कामास लावून आपलें हित करून घेतात.

अहो, सर्व सृष्टीची गोष्ट नको, केवळ मनुष्याचाच विचार करून पाहिलें तर पुरे. त्याच्या शरीराची रचना देवानीं किती कौशल्यानें केली आहे, व मनुष्यांची इंद्रियें, ज्याच्या योगानें त्यास सृष्टीतील पदार्थ समजतात, व उत्कृष्ट उत्कृष्ट वस्तूंचा उपभोग घेता येतो, यांचें मन, जें आपल्या कल्पनांनी प्रतिसृष्टि क्षणांत उभी करितें, त्यांची बुद्धि, जिच्या योगानें तीं सर्व प्राण्यांपेक्षां अशा उंच पदवीस चढलीं आहेत कीं, ती पदवी किती उंच ह्याचा ठिकाण सुद्धा तुह्मांस ला-

मत नाहीं; व त्याची चमत्कारिक वाक्शक्ति, जिच्या योगानें त्यांस आपआपले अभिप्राय परस्परास कळवितां येतात, कायदे करिता येतात, इत्यादि सर्व गोष्टींचा विचार असाच आहे.

शेवटीं त्यानें असा सिद्धांत केला आहे कीं, ह्या सर्व विचारांच्या अंतीं देव आहेत व त्यांचें लक्ष्य विशेषंकरून मनुष्यांकडे आहे, असें स्पष्ट दिसतें. आतां देव आपल्या इंद्रियांस प्रत्यक्ष होत नाहींत, अशी कोणी शंका करील; पण त्या शंकेंत कांहीं जीव नाहीं. कां कीं, वाटेंत जें जें येईल त्यास मोडून टाकणारा जो वारा, तो आपणास दिसत नाहीं, पण तो नाहींसा झाला की काय? दूरचा दृष्टांत नको. आपला आत्मा, ज्यापेक्षां आपणास दुसरें कोणतेंही विशेष अंतरंग नाहीं, तो तरी आपल्या इंद्रियांस कोठें प्रत्यक्ष आहे? तो आपणास दिसतो काय? देवाचीही अशीच गोष्ट आहे. त्यांतील एकही देव प्रसाद करीत असतां आपणास दिसत नाहीं. ज्यांचे सर्व भाग परस्परांशीं मिळाफ पावून मनुष्यास सुख व्हावें अशा बेतानें केले आहेत, असें जें हें विश्व, तें त्या परमेश्वरानें रचिलें, व त्याचा संभाळही तोच करितो. ह्या स्थळीं रोलिन साहेब असें ह्मणतो कीं, येथें परमेश्वर हा शब्द विचार करावयाजोगा आहे. ह्या शब्दावरून एक सर्वोत्तम देव आहे, तो सर्व प्राण्याचा कर्ता, व इतर सर्व देवांपेक्षां श्रेष्ठ, व इतर सर्व देव त्या मुख्य देवाचे आज्ञाधारक आहेत, असें साक्रेटिसाचें मत होतें, असें दिसतें. तो परमेश्वरच आपल्या सत्तेनें सर्व स्थावरजंगम पदार्थांस आपापलें काम करण्यास समर्थ राखून ते कदापि न चुकतां त्वरेनें आपल्या आज्ञेप्रमाणें वागतील असें करितो, आणि त्वरा अशी कीं, ज्या

खरेंची आपणां जीवांस कल्पना देखील करतां यावयाची नाहीं. ह्या परमेश्वरानें स्वकृत असंख्यात चमत्कारिक कामावरून आपणास पुरतेपणें दृश्य करून ठेवलें आहे; परंतु तो साक्षात् ह्मटला ह्मणजे कोणासही दिसावयाचा नाहीं. तस्मात् पदार्थ आपणांस दिसत नाहीं ह्मणून तो मुळींच नाहीं, असें आपण ह्मणूं नये. चर्मचक्षूंनीं जें दिसत नाहीं, तें आपल्या बुद्धिरूप नेत्रानें पहावें. चर्मचक्षूंनीं आपणास कांहीं वस्तु दिसत नाहींत, ह्मणून आपल्या ठायीं जी न्यूनता आहे, ती आपण ज्ञानचक्षूंनीं त्या वस्तु पाहून पूर्ण करावी; व परमेश्वराची पूजा करणें व त्यास सन्मान देणें हा आपणां जीवांचा धर्म होय; ह्मणून मुख्यत्वेंकरून आपण सर्वांनीं ती गोष्ट शिकावी. ज्या परमेश्वराची इच्छाच अशी दिसते कीं, आपणांवर तो जे उपकार करितो, तद्द्वाराच आपण त्यास जाणावें, इंद्रियादिकेंकरून जाणण्याचे भरीस पडूं नये. आतां वर परमेश्वराची पूजा करावी ह्मणून लिहिलें, ती पूजा हीच की, त्यास संतुष्ट करावें. त्यास संतुष्ट करण्याचा मार्ग एकच आहे. तो असा की, त्याच्या आज्ञेप्रमाणें वागावें.

साक्रेतीस आथेन्स शहरातील मुलांस जें शिकवी, तें असें शिकवी; व त्यांच्या मनांत तो ज्या गोष्टी व ज्या मतें भरवीत असे ती हीच. त्याचे मुख्य सिद्धांत दोन होते. एक हा कीं, कायदे व अमलदारांचे हुकूम हे शिरसा मानावे. ह्यात तो न्यायीपणाचा अंतर्भाव करी. आणि दुसरा सिद्धांत असा कीं, परमेश्वराकडे पूर्ण लक्ष्य असावें. ह्यांत सर्व धर्म आला. ज्या गोष्टी मनुष्यांचे बुद्धीच्या

आटोक्यांत नाहींत त्याविषयीं देवांचा* अभिप्राय घ्यावा. दुसरीं लक्षावधि कामें असलीं तरी तीं सर्व एकीकडे ठेवून त्यांस यथाशास्त्र व विचारपूर्वक अशा आपल्या आचरणानें प्रसन्न करण्यास झटावें, हें कल्याणकारक फार आहे, ह्मणून सर्वदा सांगे. तो ह्मणे कीं, देव स्वतंत्र आहेत, ते कोणाचे परतंत्र नाहीत, ह्याकरितां आपण जें त्यांजपाशीं मागतों, तें देणें त्यांच्या मर्जीवर आहे. मर्जीस आल्यास देतात; किंवा आपल्या मूर्खपणानें आज अमुक घडूं नये ह्मणून आपणांस वाटत असतें, तें ते घडवितात. तो एका प्रार्थनेचा पाठ करीत असे ती प्रार्थना त्यानें एका कवीच्या ग्रंथांतून घेतली होती. त्या कवीचें नांव हल्लीं प्रसिद्ध नाहीं. ती प्रार्थना येणेंप्रमाणें होती·—"हे परमेश्वरा, आह्मी तुजपाशीं हें मागतों कीं, ज्या गोष्टींत आमचें कल्याण आहे, त्या गोष्टींची वांछा आह्मास असो किंवा नसो, त्या गोष्टी तूं आह्मांस दे; व ज्या गोष्टींत आमचें अकल्याण आहे, त्या गोष्टी जरी आह्मी तुजपाशीं मागत असलों, तरी त्या तूं आह्मापासून दूर कर" त्या वेळच्या अज्ञाणी लोकांस वाटत असे कीं, देव कांहीं गोष्टीकडे ल-

---

* प्राचीन ग्रीक लोकांची अशी समजूत असे कीं, देव आपल्या भक्तास अनेक प्रकारांनीं पुढील गोष्टी सुचवितात डेल्फाय् वगैरे कित्येक देवळांत पुजाऱ्याच्या अंगांत देव येऊन ते पुढील होणाऱ्या गोष्टी सांगतात, असा त्या लोकांचा ग्रह होता तसेंच देवास बळी दिलेल्या पशूंचीं आंतडीं पाहून त्यांवरून पुढील शुभाशुभ गोष्टी कळतात, असें ते मानीत, तसेंच श्रद्धावान् लोकांस स्वप्नांत येऊन देव भावी गोष्टी सांगतात, असें ते समजत ह्या प्रकारच्या अनेक वेड्या समजुती त्या लोकांत होत्या, व त्या गोष्टी साक्रेटीस, प्लेटो, ह्यासारख्या त्या वेळच्या महान् महान् बुद्धिवान् लोकांस सुद्धां कित्येक अंशीं खऱ्या वाटत असत-

य देतात, व कांही गोष्टींकडे अगदीच लक्ष्य देत नाहीं-; पण साक्रेतिसाचा आपले विद्यार्थ्यांस असा पूर्ण उपदे-असे कीं, देवांचें लक्ष्य आपल्या सर्व कृत्याकडे व सर्व ब्दाकडे आहे. अत्यंत गुप्त ज्या आपल्या कल्पना त्या द्वा त्यास समजतात, व आपण कोणताही विचार करूं लागलों असता, ते आपल्या सन्निध असतात, व आपण कोणतेंही कृत्य करूं लागलों असतां ते आपणांस चांगलें करण्याविषयीं प्रेरणा करितात.

---

## अध्याय ५.

सोफिस्त मोठे ज्ञाते आहेत अशी आथेन्स शहरांतील मुलां-च्या मनांतील बुद्धि साक्रेतिसानें काढून टाकिली, त्याविषयीं.

ग्रीस देशांतील लोकांस कांहीं भलती व भलत्या वि-षयांवर विचार करण्याची रुचि लागली होती, व त्यावि-षयांची माहिती असण्यांत प्रतिष्ठा वाटत असे. ती वाईट रुचि मुलांस लागू नये, ह्मणून कांहीं उपाय करणें साक्रे-तिसास फार आवश्यक वाटल्यावरून त्यास हें पुढील कृत्य करणें भाग पडलें. साक्रेतिसाच्या वेळेस व त्याचे अगोदर कांहीं काळ सोफिस्त ह्या नावानें कांहीं पंडित उ-त्कर्ष पावले होते ते फार गर्विष्ठ असत, व ते पिताकस,

---

१ सोफिस्त ह्या शब्दाचा अर्थ ज्ञाता असा आहे, परंतु साक्रेतीस ह्याची नवीन शाळा झाली, व नवीन मत व प्राचीन मत ह्यांचा सर्वदा विरोध असतोच, त्यामुळें साक्रेतिसाचे प्लेतो वगैरे विद्यार्थी जगद्विख्यात होऊन त्यांचे ग्रंथ सर्वत्र मान्य झाले, त्या ग्रंथांत सोफिस्तांची निंदा आहे, त्यावरून हल्लीं सोफिस्त ह्मणजे विद्येचें ढोंग करणारा, ढोंगी, कुतर्कवादी, असा अर्थ झाला आहे.

वेयास व थेलीस प्रभृति जे ग्रीसांत परम विख्यात पुरुष होऊन गेले, त्यांत आपली गणना करीत; परंतु आचरणावरून पाहिलें असता, त्यांत आणि ह्यांत जमीन अस्मानाचें अंतर होतें; कां कीं, ते लोकातील थोरपणाची इच्छा व धन लोभ हीं दूर टाकून आपला वेळ मुख्यत्वेंकरून ज्ञानसंपादन करण्यांत घालवीत, तसें हे करीत नसत. हे फार लोभी व लोकप्रतिष्ठेच्छु होते. हे प्रपंचातील सर्व कृत्यें करीत; व पुष्कळ कुलंगडीही जवळ बाळगीत, व ह्यानीं आपल्या विद्येचा उदीम मांडला होता. हे शहरों शहरीं फिरत. कोठें गेले ह्मणजे जें पाहिजे तें सांगणारे, अमुक अमुक मोठे पंडित आले आहेत, असा डांगोरा तेथें पिटवीत; व शिष्यांच्या झुंडी बरोबर घेऊन वाटेनें चालत. ते शिष्ये भुलून गेल्यासारखे आपल्या अभिमानी गुरूंच्या मागें फिरण्याकरितां आपले आईबाप सोडीत, व त्यास शिकवण्याबद्दल बहुत पैसा देत. ज्यांत हे गुरु बाणा बाळगीत नसत, अशी एकही विद्या नव्हती. ईश्वरविषयक विद्या, वैद्यशास्त्र, नीतिशास्त्र, गणितविद्या, ज्योतिःशास्त्र व्याकरण, गायनशास्त्र, अलंकारशास्त्र, इतिहास, ह्या सर्वांची आह्मांस पूर्ण माहिती आहे, असें ते ह्मणत. इतर सर्व गोष्टींपेक्षा युक्तिबळानें कोणत्याही वस्तूचे तत्त्वाचा शोध काढण्यांत व सालंकार सुंदर भाषण करण्यात ते निरंतर वांधीत असत. ते आपणास सर्वज्ञ व सर्व शिकविण्यास समर्थ लेखीत त्यापैकीं बहुतेक कोणीं कसाही प्रश्न केल्यास ते त्यानें धाडदिशीं उत्तर देत; आणि तेवढ्यावरच आपणास थोर मानीत. जे मुलगे त्याचे शिष्य होत, त्यांस त्यांच्या उपदेशानीं दुसरें कांहीं एक प्राप्त होत

नसे; आपण थोर व इतर सर्व लोक कवडीचा माल अशी मूर्ख समजूत मात्र त्याच्या डोक्यात शिरे. ह्यामुळें असें होई की, विद्यार्थी जेव्हा शाळेंत येई, तेव्हांपेक्षा दांडगा झाल्यावांचून तो ह्यांच्या शाळेंतून गेला असें कधीं होत नसे.

हे जे गर्विष्ठ उपदेशक त्याचें सर्व शब्दपांडित्य आहे; व हे ज्या युक्ति सांगतात, त्यांत दोष आहेत, असें आथेन्स शहरांतील मुलांस समजून देणें हें आवश्यक आहे, असें साक्रेतिसास वाटलें. त्याच्या समोरासमोर बसून कोटी-वर प्रतिकोटी अशा रीतीनें त्यांशी विप्रतिपत्ति करण्यास साक्रेतीस समर्थ होता. का कीं, वक्तृत्वशक्ति, व तर्कानें तत्त्व शोधून काढण्याची शक्ति, ह्या ईश्वरानें त्याचे ठायीं पूर्ण ठेविल्या होत्या; परंतु ते मोठे वक्ते असत, व आप ल्या प्रौढ वाक्चातुर्यानें श्रोत्यास थक्क करून टाकावें, हाच त्यांचा मुख्य उद्देश असे, ह्यास्तव त्यांशीं उघड वादवि-वाद करणें हा त्यांचा पराजय करण्याचा मार्ग साक्रेति-सास नीट वाटला नाहीं; ह्याकरितां त्यानें दुसरा प्रकार काढला. त्यानें आपलें वास्तविक रूप झांकून टाकिलें, व अज्ञान्याचें सोंग घेऊन भोळसरपणाची मुद्रा दाखवून आप ल्या अंगची उत्कृष्ट व तीक्ष्ण बुद्धि लपविण्याचा बेत केला. ज्या ईश्वरानें त्यास इतकी लोकोत्तर बुद्धि दिली, त्यानेंच प्रस्तुत ह्या सोंगाची बतावणी करितां यावयाजोगा त्याचा आकारही घडविला होता. तो फार कुरूप होता व ह्याखेरीज त्यास कोणी पाहिलें असतां त्यास, हा फार मूर्ख व मंद आहे, असें वाटावें, असा त्याच्या तोंडवळ्याचा गुण असे. त्याच्या शरीराची ठेवण तरी चांगली असाव-

याची होती; पण तीही त्याच्या चेहऱ्यास जमावयाजोगीच अगदी भिकारवाणी वाईट होती.

सोफिस्तापैकी एकाद्याची व साक्रेतिसाची गाठ पडली असतां, साक्रेतिसानें आपण बोलतों हें बराबर आहे किंवा नाही, कोण जाणे, असा आपला साशंकपणा आपल्या मुद्रेनें व बोलण्याच्या स्वरानें दाखवून मोठ्या विनयानें, मला अमुक विषयावर काही शंका आपणास पुसून घ्यावयाच्या आहेत, असें त्यास सांगून त्यास सोप्या शब्दांनी, सोप्या विषयावर सोपे प्रश्न करावे; व बोलण्यांत शिंप्याच्या, सोनाराच्या, वगैरे. अत्यंत हलके धंद्यातील दाखले घेऊन, व क्षुल्लक उपमा देऊन, व दुसऱ्या रीतीनें आपल्या मनातील अर्थ आपणास स्पष्ट करून दाखवितां येत नाही, असें त्यानें दर्शवावें. सोफिस्तानें अप्रयोजक व बडबडीसारखें त्याचें बोलणें तिरस्कारानें ऐकून घेऊन त्यावर बरोबर उत्तर न देतां आपल्या नेहमीच्या घोकींव घोकीव गोष्टी बोलून खूप बडबड करावी त्यानें न रागवावें म्हणून साक्रेतिसानें त्यास पुष्कळ वाखाणून त्याची अशी प्रार्थना करावी कीं, पंडित बावा, कृपा करून माझ्या अल्प बुद्धीनें कळावयाजोगें भाषण करून माझ्या शंकाचें समाधान करावें; कां की, महाराज, आपल्या सूक्ष्म व प्रौढ कोट्याचें आकलन करावयाजोगी मला बुद्धि नाही; व त्या ध्यानांत धरावयाजोगी स्मृतिही नाही. प्रश्न करण्यात व उत्तरें देण्यांत मात्र माझी अक्कल चालते, ह्याबाहेर चालत नाहीं.

अशी गोष्ट भरसभेंत झाल्यावर त्या पंडितास मार्गे घेववत नसे पोकळ शब्दपांडित्य करून धूर्तता करणें हा त्या सोफिस्तास आपल्या अब्रूचा बचाव करण्यास मोठा आ-

डोसा असे. तो आडोसा त्याजकडून टाकून त्यास साक्रेतिसानें आपल्या प्रश्नाची थोडक्या शब्दांत उत्तरें द्यावयास लावावें, आणि मग असें ह्मटलें असतां असें मानावें लागतें. ह्याप्रमाणें एकावरून दुसऱ्यावर, व दुसऱ्यावरून तिसऱ्यावर, असें नेत नेत ह्यानें त्यास अत्यंत अयुक्तिक सिद्धांतात नेऊन घालावें, व शेवटीं त्यास मुकाट्यानें बसणें किंवा आपल्या तोंडानेंच आपलें मत खोडणें भाग पाडावें. शेवटीं, हे पंडितबावा माझें मंदबुद्धीचें अज्ञान दूर करीत नाहींत, ह्मणून आपणच खेद करावा. साक्रेतिस ह्याप्रमाणें हलकेपणा आपणाकडे घेई, तरी त्या पंडिताभोंवताली जी उमेदवारमंडळी बसली असे, ती त्या आपल्या गुरूचें मौर्ख्य पाही, आणि हा मोठा विद्वान् आहे, अशी जी त्याविषयीं तिची समजूत असे, ती जाऊन त्याचा ती तिरस्कार करूं लागे. ह्याप्रमाणें काहीं दिवस होता होता पुढें ग्रीसांत सोफिस्त हें नांव निंदाबोधक व उपहासास्पद झालें

ही गोष्ट सर्वांच्या मनात सहज यावयाजोगी आहे की, सोफिस्ताच्या योग्यतेचे मनुष्य, ज्यांची थोर लोकांत मोठी मान्यता होती, व जे आथेन्स शहरांतील उमेदवारांत मोठी विद्वत्ता मिरवीत असत, व ज्यांची बुद्धीविषयीं व विद्येविषयीं बहुत दिवस विख्याति होती, त्यांवर कोणी तुटून पडून त्यांचा पराजय करणें मोठें कठीण काम होतें.

साक्रेतीस तर विशेषेंकरून त्याच्या कीर्तीवर व हितावर उठला होता. साक्रेतिसानें त्याचे दुर्गुण व दुराचरणें उघडीस आणण्याकरितां व त्याचें पोकळ पांडित्य कवडीचा माल करण्याकरिता प्रयत्न केल्यानें अत्यंत दीर्घद्वेषी पुरुषांपासून जितका नाश होण्याचा संभव आहे, तितका साक्रे-

तिसाचा नाश, त्या उन्मत्त व दुराचारी सोफिस्तापासून* झाला. तो नाश कोणता व कसा झाला, त्याचें निरूपण आह्मी पुढील अध्यायांत करूं.

---

* ह्या अध्यायांत सोफिस्तांचें जें वर्णन केलें आहे, तें रोलिन साहेबाच्या ग्रंथाच्या आधारावरून केलें आहे. बहुत काळपर्यंत ह्या अध्यायांत लिहिल्याप्रमाणेंच सोफिस्तांविषयीं सर्व ग्रंथकारांची समजूत होती, परंतु अलीकडे कांहीं वर्षांपासून प्राचीन काळच्या इतिहासाविषयीं विशेष विचार होऊन अर्वाचीन युरोपियन ग्रंथकारांचीं मतें कित्येक गोष्टींविषयीं निराळीं झालीं आहेत; व तीं आमच्या वाचणारांस समजावीं, ह्या बुद्धीनें तीं संक्षेपानें ह्या टीपेंत लिहितों. अलीकडे कांहीं वर्षांपूर्वीं ग्रोत नामक महाविद्वान् ग्रंथकारानें ग्रीस देशाचा इतिहास इंग्रेजींत लिहिला आहे; त्यांत तो असें लिहितो कीं, सोफिस्तांची निंदा करण्याची जी रीत पडली आहे, तीस प्राचीन ग्रंथाचा किंवा युक्तीचा योग्य आधार आहे, असें समजूं नये. सोफिस्तांविषयीं आपणांस जी माहिती आहे, ती प्लेताच्या ग्रंथावरून मुख्यत्वेंकरून आहे, व प्लेतोचीं बहुत मतें त्या वेळच्या दुसऱ्या विद्वान् लोकांच्या (सोफिस्तांच्या) मताहून निराळीं असल्यामुळें त्याचें व त्या विद्वान् लोकांचें शत्रुत्व होतें. तेव्हां त्या प्लेतोच्या ग्रंथावरून त्या सोफिस्तांस वाईट ह्मणणें योग्य नाहीं. प्लेतो त्यांस मुख्य दोष हा लावतो कीं, ते पैसा घेऊन शिकवीत असत; व त्यांस लोकांत थोरपणा मिळविण्याची इच्छा असे; पण ह्या दोन गोष्टींवरून कोणास वाईट ह्मणूं लागल्यास हल्लींच्या विद्यालयांतील व शाळांतील किती गुरूंस व किती ग्रंथकारांस वाईट ह्मणावें लागेल, ह्याचा विचार वाचणारांनीं करावा. आतां सोफिस्त ह्यांचे आंगीं धनलोभ कांहीं विशेष होता, असें ह्मटल्यास त्या गोष्टींविषयीं प्रमाण नाहीं, असें ग्रोत साहेब ह्मणतो.

दुसरा दोष सोफिस्तांच्या आंगीं असा लाविला आहे कीं, ते मोठे गर्विष्ठ होते. तर हा दोष त्या वेळेस जे सोफिस्त नांवानें प्रसिद्ध होते, त्या सर्वांच्याच आंगीं होता ह्यास प्रमाण नाहीं, व जो मोठा बुद्धिवान् व विद्वान् असतो, त्याचे ठायीं गर्वरूप दोष बहुत वेळ दृष्टीस पडतो खरा; परंतु त्या दोषावरून तो मनुष्य ह्मणजे मोठा दुष्ट झाला असें नाहीं. तिसरा दोष ह्यांवर असा देतात कीं, ते मुलांस अनीतीच्या व खराब गोष्टी शिकवीत, परंतु ग्रोत साहेब ह्मणतो कीं, ही गोष्ट खरी मानण्यास

मराठी ग्रंथ संग्रहालय

# अध्याय छठे.

देवाविषयींचीं साक्रेतिसाचीं मतें फार वाईट आहेत; तो तीं दुष्ट मतें शिकवून शहरांतील मुलांस बिघडवितो; असा मिथ्यापवाद साक्रेतिसावर आला. त्यानें न भितां व बोलण्यांत छक्केपंजे न करितां न्यायाधीशापुढें आपणावर घातलेल्या दोषाचें निवारण केलें, तरी त्यास जिवें मारण्याची शिक्षा ठरविली, हा विषय ह्यांत आहे.

ह्याप्रमाणें लोकांशीं भाषण करून त्यांचें अज्ञान त्याच्या पदरीं घालण्याचा व त्यास उपदेश करण्याचा साक्रेतिसाचा क्रम सुमारें तीस वर्षे चालला होता. असें करण्यानें त्यास कितीएक मित्र झाले खरे; परंतु त्यांपेक्षां शत्रु फार झाले. जे लोकांत विद्वान् व थोर असे मोडत होते, त्यांचें अज्ञान त्यानें उघडकीस आणल्यावरून, ते ह्याचा अर्थातच द्वेष करूं लागले. तसेंच हा ज्या गोष्टी सांगे, त्या नवीन असल्यामुळेंच पुष्कळ लोक ह्याचा त्रास करीत; कारण, एखादी गोष्ट वस्तुत. चांगली असली, तरी ती नवीन आहे एवढ्याच कारणानें तिला नाव ठेवणारे लोक सर्व काळ व सर्व देशांत बहुत असतात. तसेंच तरुण लोक लब्धप्रति-

---

प्राचीन काळच्या लेखांत कांहींच प्रमाण नाहीं, व धुंदीत वाईट व खराब ज्या गोष्टी, त्या कोणी प्रसिद्धपणें शिकवूं लागल्यास आथेन्सच्याप्रमाणें लोकसत्ताक संस्थानांत त्या शिक्षकाचा फार दिवस निभाव होणें अशक्य दिसतें. तसेंच हजारों तरुण लोक पैसे देऊन त्याकडे विद्या शिकावयास जात, व त्यांचे वडील त्यास जाऊं देत, व त्याची गांवोगांव मोठी प्रतिष्ठा होई, ह्यावरूनच ते लोक त्या वेळच्या प्रतिष्ठित लोकांत मोडत होते, असें सिद्ध होतें. ह्या विषयावर ग्रोत साहेबानें फारच प्रतिपादन केलें आहे; परंतु त्याचा चांगला सारांश सुद्धां येथें जागेच्या संकोचास्तव लिहितां येत नाहीं.

ष्ठित नसल्यामुळें निर्मत्सरपणानें त्याची बुद्धि व कल्पन चहात, व मोठ्या उत्कंठेनें त्याचे उपदेश ऐकत, तें न सा हून पुष्कळ लोक त्यास वाईट पहात. साक्रेतीस बहुत दिवस लोकांत संभाषण व उपदेश करीत फिरत असे, लोकांत त्याविषयीं पुष्कळ वाईट समजूत झाली होती; ह्यास प्रमाण हेंच कीं, अरिस्तोफानिस नामक एका कवीनें एक *प्रहसन रचून इसवी सनाच्या पूर्वी ४२३ त नाटकगृहां त त्याचा अभिनय ह्मणजे खेळ केला; त्यांत साक्रेतिसा चें सोंग आणून त्याची थट्टा केली आहे. आता साक्रेति साचा अंतकाळ इसवी सनाच्या पूर्वी ३९९ त झाला ह्यावरून मरावयापूर्वी २५ वर्षें त्याची लोकांत प्रख्याति हो ऊन कितीएक लोक त्यास वाईट पाहूं लागले होते, असें सिद्ध होतें.

आता साक्रेतिसाच्या शत्रूंनी पैसा देऊन अरिस्तोफ निसाकडून तें वर्मी लागणारें नाटक करविलें की कसें, ह्या चा निर्णय होत नाहीं. साक्रेतीस सर्व प्रहसन नाटकां ची व विशेषेंकरून अरिस्तोफानिसानें केलेल्याची उघड निंदा व तिरस्कार करीत असे; आणि त्या अरि स्तोफानिसाचा प्रतिस्पर्धी युरिपेदीस नांवें एक कवि होता, त्यानें केलेलीं करुणरसप्रधान नाटकें तो फार वाखाणीत असे. ह्याबद्दल त्याचा सूड उगवावा ह्मणून अरिस्तोफानि सानें हें त्याच्या निंदेचें नाटक बहुतकरून केलें असावें, असेंही वाटतें. कसेंही असो, अरिस्तोफानिसाचा साक्रे-

* ह्या नाटकांत थट्टा मस्करीच मुख्यत्वेंकरून असते, त्यास संस्कृतांत प्रहसन व इंग्रजींत फार्स असें ह्मणतात. अशीं नाटकें अद्यापि मराठी भाषेंत फारशीं झालीं नाहींत.

नसावर राग होता त्यामुळें तो तें नाटक करी, किंवा त्याच्या शत्रूंच्या सांगण्यावरून तें *करी; तें कसेंही असलें तरी त्यानें त्या अत्यंत थोर साधूची अप्रतिष्ठा व उपहास करण्याकरितां आपली सर्व प्रतिभा व विचारशक्ति खर्चून तें नाटक करून, कवितेनें दुर्जनाचें साहाय्य होऊन सज्जनाचा नाश झाला, असा कवितेला मात्र मोठा कलंक लाविला.

त्यानें जें नाटक केलें, त्याचें नाव **मेघमाला**, असें होतें. त्यांत त्यानें **साक्रेतिसाचें** असें सोंग आणिलें होतें की, तो मेघांत उंच टांगलेल्या पाटींत बसला आहे, आणि तेथून लोकांस आपले सिद्धांत, ह्मणजे अत्यंत उपहासास्पद बारीक बारीक कुतर्क सांगत आहे. इतक्यांत एक कर्जभरू जरजेर ह्मातारा, सावकाराच्या देण्याचे पेंचांतून सुटावें, ह्या इच्छेनें त्याजकडे येऊन प्रार्थना करितो; महाराज, सावकार मला फार तसदी देतात, तर त्याचें मी कांहीं लागत नाहीं, असा मजबूद पुरावा करून त्यांस दरबारांत ठकवितां येईल असें करा. सारांश, माझें खटलें अगदीं खोटें आहे, तें खरें करून दाखविण्यास मला चांगली युक्ति सांगा. परंतु ह्या नव्या गुरूच्या प्रौढ उपदेशापासून शहाणें होण्याची आपली योग्यता नाहीं, असें पाहून तो ह्मातारा आपण जाऊन आपल्या लेंकास पाठवून देतो. मग तो मुलगा ह्या विद्वान् गुरूच्या शाळेंतून असा तरबेज होऊन बाहेर पडतो की,

---

* आह्मास वाटतें कीं, ह्या दोन्हींतलें एकही कारण कल्पिण्याची गरज नाहीं. जो मनुष्य पुष्कळांचा नावडता असतो, त्याची थट्टा करून लोकांस हसविणें, व त्याची वाहवा मिळविणें, ही कवि, नाटककार, व अर्वाचीनकाळीं वर्तमानपत्रकर्ते ह्यांची चालच आहे. त्याचप्रमाणें अरिस्तोफनीस ह्यानें केलें असावें. त्याचें साक्रेतिसाशीं विशेष शत्रुत्व कल्पिण्याचें कांहीं प्रयोजन दिसत नाहीं.

बापाची गांठ पडल्याबरोबर त्यास खूप ठोकतो, आणि तुझ्याशीं मला असेंच वागलें पाहिजे, असें त्यास मोठ्या सबळ व सूक्ष्म रीतीनें सिद्ध करून दाखवितो.* ज्या ज्या प्रवेशात साक्रेतिसाचें सोंग येतें, तेथें तेथें अशी गोष्ट रचिली आहे कीं, तो हजारों अनन्वित भाषणें करीत आहे; सर्व देवास व विशेषेंकरून †जुपितरास लक्षावधि शिव्या देत आहे; महा अभिमानी पुरुषासारखें बोलत आहे; सर्व लोकाचा पराकाष्ठेचा धिक्कार करीत आहे. ईश्वरानें कांहीं गोष्टी मनुष्यांस न कळाव्या अशा करून ठेविल्या आहेत, त्या जाणण्याचा प्रयत्न केला असतां मनुष्यांस पातक लागतें, असें आहे; तें न जुमानून स्वर्गलोकीं काय चाललें आहे, व पाताळीं काय चाललें आहे, ह्याविषयीं त्याचा विचार चाललाच आहे; कितीही अन्यायाचा पक्ष असला, तरी तो मीं उचलिला असतां त्याचा जय होईल, अशी त्याची फुशारकी चाललीच आहे; व तो अशा दुष्ट गोष्टी आपल्या मनात गुप्त न ठेवितां त्या दुसऱ्यास पढवून आथेन्स शहरच्या सर्व मुलास बिघडवीत आहे; अशी त्या नाटकातील कथा होती. ही कथा झाल्यावर पुढें कवीनें सर्वांस हंसें आणणारी अशी त्याची खुबीदार थट्टा केली होती. आथेनियन लोकासारिखे शीघ्रबुद्धि व रसिक ऐकणारे, त्यांतून ज्यास कोणाचा उत्कर्ष स्वभावतः सहन होत नसे, ते लोक हें नाटक पाहून व ही थट्टा ऐकून फारच खुष झाले. त्या कवितेनें ते

* ह्या स्थळीं नाटककर्त्यानें साक्रेतीस अलवयी मूर्ख मुलें भाडून व त्यास कुतर्क शिकवून त्यांची बुद्धि बिघडवितो, व त्यास दांडगे करितो, असें सुचविलें आहे.

† ग्रीक लोकांतल्या देवांतल्या अत्यंत मुख्य देवास जुपितर ह्मणत, जसा आपल्या देवांत इंद्र.

इतके मोहित होऊन गेले कीं, त्यास तो खेळ संपे तोंपर्यंत देखील दम निघेना. त्यांनीं तत्काळ असें ठरविलें कीं, प्रहसनरचना करणारे जे कवि आहेत, त्या सर्वांच्या वर अरिस्तोफनिसाचें नांव घालावें.

आज रंगभूमींत आपलें सोंग येणार आहे, असें ऐकण्यावरून त्या दिवशीं साक्रेतीस अरिस्तोफनिसाचें तें नाटक पहावयास नाट्यशाळेंत गेला. ही गोष्ट त्याचे संप्रदायास विरुद्ध होती; कां कीं, तो अशा समाजात बहुतकरून जात नसे; गेला तर युरिपैदिसानें केलेलें एखादें नवें शोकरसप्रधान नाटक व्हावयाचें असल्यास मात्र जाई. हा युरिपैदीस ह्याचा परम मित्र होता, व हा आपल्या नाटकांत नीतीच्या पुष्कळ उत्कृष्ट गोष्टी आणी, ह्मणून ह्याची तो फार प्रशंसा करी. असें असतां एके दिवशीं युरिपैदिसानें रचलेलें नाटक नाटकगृहात चाललें असतां, त्यात एक सोंग येऊन तें आरंभींच अभद्र भाषण बोललें. त्याचें साक्रेतिसास सहन न होऊन, आपण उठून गेलों असतां आपल्या मित्राच्या नाटकाचा बेरंग होऊन त्याची योग्यता कमी होईल, ह्याचा कांहींच विचार न करितां, तो नाटकगृहांतून निघून गेला. इतका तो नीतिमार्गाचा कैवारी होता. अल्किबैदीस व क्रीनियस ह्यांनीं जुलमानें नेलें तर कोण जाणे; परंतु तो स्वत: संतोषानें प्रहसनें पहावयास कधींही जात नसे; कारण कीं, त्या प्रहसनांत जी मनस्वी टवाळकी असे, तिचा त्यास फार त्रास येई. तसेंच आपण ज्या शहरांत राहतों, त्या शहरच्या लोकांची अब्रू सर्व लोकांसमक्ष दुष्ट सोंगाडे त्या तमाशांत घेतात, हें त्याच्यानें पाहवत नसे. असो; त्याच्या निंदेचें नाटक ज्या दिवशीं

झालें त्या दिवशी तो बुद्ध्या तेथें जाऊन तें पहात खुशाल धिमेपणें बसला होता. त्या प्रसंगी त्याची इतकी कुटाळकी झाली असता, त्यानें तिळमात्रही राग किंवा त्रास दाखविला नाहीं. तेथें कोणी परगावचे लोक मौज पहावयास आले होते. त्यांनी, तमाशांत वारंवार ज्या साक्रेतिसाचें सोंग येतें, तो साक्रेतीस कोणता? ह्मणून विचारिलें असतां साक्रेतीस आपल्या आसनावरून उठून उभा राहून, हा मी साक्रेतीस येथें आहें, पहा; असें त्यांस सांगून सगळा खेळ आटोपे तोंपर्यंत तो तसाच उभा होता. त्याच्या जवळ जे बसले होते, त्यांस त्याची सहनशीलता व मानापमानांविषयीं समानदृष्टि पाहून मोठा चमत्कार वाटला; हें पाहून तो त्यांस ह्मणाला, मला असें वाटतें कीं, मी आज सर्वांस हांसविण्याची मेजवानीच करीत आहें, आणि सर्व लोकांस जर संतोष वाटतो, तर ही सगळी थट्टा सोसणें मला अवश्य आहे.

अरिस्तोफनीस हा साक्रेतिसाचा मित्र नव्हता खरा; तरी तो त्याच्या शत्रूंनीं केलेल्या दुष्ट कपटांत शिरला होता, किंवा त्याचा जीव घेण्याचा त्याचा इरादा होता, असें काढण्यास कांहीं आधार नाहीं. विशेष संभवाचें कारण असें दिसतें कीं, तो, लोकांनी हसावें, त्यास गंमत वाटावी ह्मणून मुख्य मुख्य अंमलदार व सेनापति ह्यांवर सुद्धां प्रहसनें रचून त्यांची सोंगें आणून, त्यांची जशी टवाळकी करी, तशी त्यानें ह्या पंडिताचीही केली असावी; तसें करण्यांत त्यास वाईट वाटावें तें वाटलें नाहीं, इतकाच त्याचा दोष. साक्रेतिसाचा प्राण घेण्याचा वास्तविक दोष ह्मटला ह्मणजे तो त्याचा जे हेवा करीत असत, ते व त्याचे शत्रु ह्यांच्या माथीं होता. त्या दुष्टांनी अरिस्तोफानिसास नाटक

करण्याविषयीं चिथवलें असल्यास, त्याची मसलत फार खोल, दूरवर दाटे देऊन मोठ्या बेतानें रचलेली अशी होती, असें ह्मटलें पाहिजे. त्याचा मतलब असा होता कीं, एखाद्या मनुष्याचें सोंग तमाशांत आणलें ह्मणजे तो तमाशा पाहून लोकांनीं हसावें, ह्मणून तमाशा करणारा त्या मनुष्याचे आंगचे दुर्गुण व व्यंगें काढतो; तीं व्यंगें व ते दुर्गुण पाहिले ह्मणजे लोकांच्या मनांत त्या मनुष्याविषयीं तिरस्कारबुद्धि उत्पन्न होते; आणि तिरस्कारबुद्धि उत्पन्न झाली ह्मणजे ते त्याशीं अन्यायानें वर्तूं लागतात; का कीं, सर्व मनुष्याचा स्वभावच असा आहे कीं, एखादा मनुष्य एकदां सर्वांच्या तिरस्कारास पात्र झाला, ह्मणजे ते त्याचा वारंवार अपमान करितात, त्यास शिव्या देतात व त्यास इजा सुद्धां करितात.

साक्रेटिसाच्या शत्रूंनी त्यावर प्रथम ही आग पाखडली, व हें करण्यांत त्यांनीं त्यावर पुढें जें मोठें खटलें करण्याचें योजिलें होतें, त्याचाही त्यास अजमास लागला. ही त्यांची मसलत बहुत वर्षें गुप्त राहिली होती, ती हें नाटक झाल्यावर सुमारें वीस वर्षांनीं उघडीस आली. ती इतके वेळ स्तब्ध राहण्याचें कारण, त्या वेळेस आथेन्सच्या संस्थानावर मोठा कहर गुदरला होता, हें असावें. आथेनियन लोकांनीं सिसिली बेटावर स्वारी केली होती. ती स्वारी त्यांस परिणामीं अशी भोंवली कीं, *स्पार्तानामक संस्थानचा सरदार लिसांद्र ह्यानें आथेन्स शहरास वेढा घालून तें घेतलें, आणि तेथील लोकसत्तात्मक राज्य मोडून तेथें त्यानें

---

* स्पार्ता नामें ग्रीस देशांत एक प्रख्यात संस्थान असे. ह्या संस्थानाची व आथेन्स संस्थानाची मोठी स्पर्धा असे.

तीस जुलमी अंमलदार नेमिले. ह्या सर्व गोष्टी त्या वीस वर्षांतच घडल्या. त्या अंमलदारास हाकून दिल्यावर पुढें लागलेंच साक्रेतिसावर खटलें चालू झालें.*

मिलितस नामें एक मनुष्य होता. त्यानें आपण फिर्यादी होऊन साक्रेतिसावर कायद्याबहुकूम फिर्याद केली. फिर्यादींतील कलमें दोन होतीं. एक कलम हें की, साक्रेतिस, ह्या संस्थानांतील लोक जे देव मानितात, ते मानीत नाहीं; दुसरे नवे देव मानितो. दुसरें कलम हें होतें की, हा भलत्या भलत्या गोष्टी शिकवून ह्या शहरांतील मुलांस बिघडवितो. ह्या दोन अपराधाबद्दल ह्यास जिवें मारण्याची शिक्षा व्हावी, हें योग्य आहे; असें त्या अर्जीच्या शेवटी सुचवून अर्जी संपविली होती.

झिनोफिनियस ह्यानें एक ग्रंथ केला आहे. त्यास "अपालोजी आफ साक्रेतीस" असें ह्मणतात. या ग्रंथांत असें लिहिलें आहे की, मिलितसानें साक्रेतिसावर कांहीं आधार नसता व कांहींच संभव नसता असा दोषारोप केला

* वास्तविक पाहतां वीस वर्षें साक्रेतिसानें शत्रु त्याचा जीव घेण्याच्या मसलतींत होते, ही गोष्ट खरी दिसत नाहीं; कारण तो मोठा राज्यकारस्थानी मनुष्य नव्हता, ह्यास्तव त्यापासून राज्यव्यवस्था करणारांस कांहीं भय होतें असें ह्मणतां येत नाहीं सिसिलीच्या लढाईंत आथेनियन लोक गुंतले ह्मणून जें कारण लिहिलें आहे, तेंही बरोबर दिसत नाहीं; कारण ती लढाई भरिस्तोफनीसचें नाटक झाल्यावर कित्येक वर्षांनीं पुढें उत्पन्न झाली, व ती चालू असतां साक्रेतिसास शिक्षा करण्यास आथेनियन लोकांस कांहीं भय होतें असेंही दिसत नाहीं ह्यावरून साक्रेतिसावर ह्यात वेळेस इतका गहजब गुदरावयास कांहीं विशेष कारणें झालीं असावीं, त्यांचें उल्लेखन त्या वेळच्या इतिहासकारांनीं केलें नाहीं, असें ग्रोट साहेबाचें मत आहे, व तें मतें सयुक्तिक दिसतें

आहे, तसा कधी कोणी कोणावर केला नसेल. साक्रेतिसानें आथेन्सांतील मुलांस उपदेश करण्याचें काम एक दोन दिवस नव्हे, चाळीस वर्षें एकसारखें चालविलें होतें. तो आपलें मत लोकांस गुप्तपणें सांधीकोंदीत सांगत नसे; तर हजारों लोक एकत्र असतां उघड सांगे. तो दुसऱ्यांस वागण्याचे नियम शिकवी, व त्या नियमाप्रमाणें स्वतः वागत असे. असें असतां मिलितसानें चाळीस वर्षांनी फिर्याद केली, ह्याचें काय बीज असावें? लोकांचें कल्याण करण्याची इतकी कळकळ जर मिलितस ह्यास होती, तर ती इतके दिवस कोठें गेली होती? त्या प्रसंगीच ती एकाएकी उत्पन्न होऊन इतकी कशानें वाढली? मिलितसासारखा कळकळीचा व योग्य मनुष्य शहरांत असून, त्यानें, कोणी मनुष्य त्या शहरच्या मुलांच्या मनांत लोकसत्ताक राज्यप्रकाराविषयीं तिरस्कार व त्रास उत्पन्न करून फंदफितूर करण्याविषयीं उत्तेजन देणाऱ्या गोष्टी शिकवून त्या सर्वांस बिघडवीत असतां, त्या अनर्थाचा प्रतिबंध होण्याकरितां कांहींच उद्योग न करितां, उगीच मुकाट्यानें रहावें, हें त्यास योग्य होतें कीं काय? कां कीं, असें आहे कीं, जो मनुष्य आंगीं सामर्थ्य असतां उपद्रव मना करीत नाहीं, तो मनुष्य व उपद्रव करणारा मनुष्य, दोन्ही एकसारखे गुन्हेगार आहेत; बरें असो, विसराळूपणामुळें अथवा उदासीनपणामुळें, किंवा एखाद्या मोठ्या कामांत गुंतल्यामुळें, मिलितसास साक्रेतिसावर फिर्याद करण्यास सुचलें नसेल; परंतु आथेन्सासारखें शहर, जें मोठमोठ्या न्यायाधीश लोकांनी भरलें होतें; व जे न्यायाधीश लोकहितार्थ रात्रंदिवस जपत असतः व जेथें मोठमोठे

धीट मुदाईम असत, जे मत्सराच्या किंवा दुष्टपणाच्या यो-गानें लोकाचे दोष काढण्यास टपून बसलेले असत, अशा त्या शहरात, साक्रेतिसावर मिलितसानें ह्या प्रसंगीं जो अपराध घातला, तसला सर्वजनप्रसिद्ध अपराध तसल्या न्यायाधीशाच्या व तसल्या मुदाइमाच्या नजरेस आला नाहीं, ही गोष्ट झाली तरी कशी ? ह्यावरून ती अर्जी अगदीं खोटी होती, व तींत युक्तीचा लेश देखील नव्हता, असें स्पष्ट होतें. अर्जी होऊन त्याच्या शत्रूंची मसलत बाहेर पडतांच साक्रेतिसाच्या मित्रानीं त्याचा बचाव करण्याची तयारी केली. लिसियस ह्मणून एक विख्यात दरबारांत बोलणारा असे, त्यासारखा वस्ताद वक्ता त्या वेळीं दुसरा कोणी नव्हता; त्यानें स्वतः विचार करून त्या अर्जीवर एक नामी खासें उत्तर लिहून साक्रेतिसाकडे आणिलें. त्या उत्तरांत त्यानें साक्रेतिसाच्या पक्षास अनुकूल जीं कारणें होतीं, तीं स्पष्ट करून दाखविलीं होतीं. त्या सर्व पत्रभर असे कोमळ व चित्तवेधक शब्द घातले होते, व त्यांतील शब्दरचना अशी सुंदर होती कीं, तें पत्र वाचलें असता केवळ पाषाणहृदय जे असतील, त्यास सुद्धां कळवळा यावा.

साक्रेतिसास तें पत्र वाचून फार संतोष झाला, व त्यानें त्याची फार स्तुति केली; परंतु तो लिसियसास ह्मणाला कीं, हें पत्र अलंकारशास्त्रांतील नियमास जितकें अनुसरून आहे, तितकें पंडिताच्या धैर्यास व अभिप्रायास अनुरूप नाहीं; ह्मणजे हें मला शोभण्याजोगें नाहीं. हें भाषण ऐकुन लिसियसानें पुसलें कीं, हें पत्र चांगलें लिहिलें आहे, व तुमच्या उपयोगीं नाहीं; ह्या परस्पर विरुद्ध गोष्टी

संभवतात कशा? साक्रेतिसानें आपल्या चालीप्रमाणें एक प्राकृत दाखला देऊन त्याचे प्रश्नाचें असें उत्तर दिलें कीं, बाबा, एकाद्या उत्तम कारागिरानें एक शानदार पोषाक, किंवा वर सोनेरी काम केलेला जोडा, मजसारिख्या गरिबाकडे आणिला, तर तो पोषाक किंवा जोडा त्यात काहीं खोड नसतांही माझ्या उपयोगीं पडणार नाहीं.

आथेन्सांतील राज्य लोकसत्ताक होतें, ह्यास्तव ज्याकडे अधिक लोकांचें मत, तो पक्ष खरा होत असे; ह्मणून तेथें कांहीं तंटा उत्पन्न झाला असता वादी व प्रतिवादी आपआपल्या वतीनें खटला तुटण्याकरितां मान्य मान्य लोकांच्या घरोघर संमति मागत फिरत असत. साक्रेतिसानें असा निर्धार केला होता कीं, आपण हलकेपणानें व दीनपणानें संमतीची भीक मागावयाची नाहीं, आणि हा त्याचा निर्धार ढळला नाहीं. तसेच लोक वादांत प्रौढ व गूढ भाषण करून न्यायाधीशांस दिपवून मोहित करीत, व बायका मुलें सभेंत आणुन त्यांच्या रडण्यानें व दीन मुद्रेनें चौकशी करणाऱ्यांस आपणांविषयीं दया उत्पन्न करीत; तसेंही साक्रेतिसानें केलें नाहीं; व ह्या प्रकारचा दुसरा कोणताही कावा केला नाहीं. मग त्यानें कोणाची पायधरणी किंवा आर्जव केलें नाहीं, हें कशास सांगावयास पाहिजे? आपणावरचा दोष उडविण्याकरितां आपल्यावाचून दुसऱ्यास बोलूं द्यावयाचें नाहीं, व न्यायाधीशापुढें अर्जदारासारखें दीन मुद्रेनें उभें रहावयाचें नाहीं, असा दृढनिश्चय करून त्यानें त्याप्रमाणें केलें; परंतु ती गोष्ट त्यानें गर्वानें किंवा न्यायसभेच्या तिरस्कारानें केली असें नव्हे; तर असें करण्याचें कारण हेंच कीं, आपला पक्ष खरा आहे, व आपण अगदीं

निर्दोष आहों, असें त्याची मनदेवता त्यास सागत असे; ह्या मुळें तो निर्भय होता. त्यानें जें उत्तर दिलें, त्यांत भित्रे पणा किंवा लेंचेपणा अगदीं नव्हता. त्याचें भाषण पंडि ताच्याप्रमाणें निस्पृह, खडखडीत, दिलदार असें होतें. त्यांत सत्यता हाच अलंकार होता, ह्याखेरीज प्रौढ रचना आणून त्यास शोभा आणली नव्हती. बोलतांना तो भीं धळला नाहीं, आणि त्याच्या बोलण्यावरून असे दिसलें कीं तो अगदी निरपराध आहे.

साक्रेतिसाच्या चौकशीच्या वेळी प्लेतो तेथें होता. त्यानें त्याचें हें सर्व भाषण उतरून काढिलें, आणि त्यांत आपले पदरचें कांहीएक न घालितां त्याचा एक ग्रंथ रचिला. त्या ग्रंथास "अपालोजी आफ साक्रेतीस" असें ह्मणतात. प्राचीन काळचे जे जे उत्कृष्ट उत्कृष्ट ग्रंथ आहेत, त्या ग्रं थात हा ग्रंथ मोडतो. आह्मी ह्या ग्रंथातील काही सारांश पुढें लिहिला आहे.

नेमलेल्या दिवशीं कायद्याप्रमाणें खटला सुरू झाला. पक्षकार न्यायाधीशासमोर आल्यावर मिलितस पहिल्यानें बोलूं लागला त्याचा पक्ष जितका वाईट होता व त्याचा पुरावा जितका कमी होता, तितके छक्केपंजे त्याला आपला दुर्बळपणा झाकण्यासाठी अधिक करावे लागले. ज्या ज्या योगानें प्रतिवादीवर लोकांचा द्वेष होण्याचा संभव होता, तें तें त्यानें सर्व केलें. तो आपल्या पक्षास साधक युक्ति जर सांगूं लागता, तर तो निखालस तोंडघशी पडता; परंतु त्या न सागतां तो मोठमोठे प्रौढ व सुंदर शब्दानी पोकळ पांडित्य करूं लागला. साक्रेतिसावर आळ घेणारे एक देखील खरा शब्द बोलले नाहीत; तथापि त्यानी शब्दचातु

यानें खरेपणाचा असा डौल आणला होता की, साक्रेतिसानें स्वतः असें कबूल केलें आहे कीं, मिलितस वगैरे ह्यांचें बोलणें ऐकून न्यायाधीशांच्या मनात काय आलें असेल, तें माझ्यानें सांगवत नाहीं; पण मी आपली गोष्ट सांगतों की, मी तर इतका चकित झालों होतों की, माझें देहभान मी विसरलों.

आह्मी मागेंच लिहिलें आहे कीं, साक्रेतिसावर जी फिर्याद झाली होती, तीत दोन कलमें होतीं पहिलें धर्माविषयी होतें. तें असें की, साक्रेतीस पापदायक जिज्ञासा* मनी धरून, स्वर्गात व पाताळी काय चाललें आहे, ह्याचा उगीच शोध करितो, व ह्या सर्व ग्रीस देशातील लोक ज्या देवांस भजतात, ते देव हा मानीत नाहीं, व नवे देव स्थापण्याविषयी प्रयत्न करतो; व तो असें सांगतो की, मी जें जें

---

* सृष्टीच्या क्रमांत मनुष्यास समजत नाहीत अशा असंख्यात गोष्टी आहेत त्या समजण्याविषयीं सर्वकाळ सर्व देशी बुद्धिमान् व विद्वान् पुरुषांचा यत्न चालला आहे ह्या गोष्टीनें जें मनुष्यास ज्ञान झालें आहे, त्यासच विद्या असें ह्मणतात. हें ज्ञान जसजसें वाढत जातें, तसतशा जुन्या कित्येक समजुती खोट्या पडत जातात. ह्यामुळे जुन्या समजुतीचे लोक व अज्ञान लोक विद्येचा द्वेष करितात. बहुत लोकांचें मत असें होतें कीं, सृष्टीतील कित्येक गोष्टी मनुष्यानें जाणू नयेत, अशी देवाची इच्छा आहे, आणि ह्मणूनच ह्या गोष्टी मनुष्यास न समजण्यासारख्या त्यांनीं करून ठेवल्या आहेत. त्या गोष्टी घडणें किंवा न घडणें, हें केवळ देवानीं आपल्या हातीं ठेवलें आहे, ह्यास्तव त्या जाणण्याविषयीं यत्न करणें, व त्याविषयीं भाकित करणें, हें देवाच्या गुप्त गोष्टी कळण्यासाठीं यत्न करणें होय; व तो यत्न देवांस मान्य नसल्यामुळें तो करणें पाप होय; अशी ग्रीक लोकांची समजूत होती. फार काय, ह्याप्रमाणें साक्रेतिसाची सुद्धां समजूत होती, असें झेनोफनाच्या लेखावरून स्पष्ट समजून येतें ह्यास्तव साक्रेतिसावरचा हा आरोप अगदीं खोटा होता.

कृत्य करितों तें तें करतांनी मला एक अप्रसिद्ध देव माझ्या मनात संचार करितो, आणि चांगल्या चांगल्या गोष्टी सांगतो. साराश, तो, देव मुळींच नाहीत, असें ह्मणतो.

दुसरें कलम संस्थानाचा अंमल व वजन ह्यांविषयी होतें. तें असें कीं, साक्रेतीस देवाविषयी भलत्या भलत्याच गोष्टी मुलांच्या मनात भरवितो ह्या संस्थानानें राज्याची जी व्यवस्था केली आहे, ती, व संस्थानचे कायदेही अनर्थकारक आहेत, असें त्यांस शिकवितो; चिठ्या टाकून ज्याच्या नांवाच्या चिठ्या निघतील, त्यांस न्यायाधीश नेमण्याची ह्या संस्थानची चाल आहे, ती मूर्खपणाची आहे, असें हा उघड बोलतो. तो स्वतः ज्या सभास जात नाही, त्या सभाची तो निंदा करितो. अगदी दुर्बळ जरी कोणाचा पक्ष असला, तरी तो चांगलें करून दाखविण्याच्या युक्ति शिकवितो; विद्या शिकविण्याचें मिष करून आपली मोठी प्रतिष्ठा असावी ह्या बुद्धीनें, मुलें आपणास नेहमीं चिकटून राहतील, असें करितो; व तुह्मी आपल्या आईबापाची अवज्ञा करा, त्यांस मारा, ठोका, त्याबद्दल तुह्मास कांहीं शिक्षा व्हावयाची नाही, असें त्यांस सिद्ध करून देतो; अशा दुष्ट उपायानीं तो आथेन्स शहरातील सर्व मुलें बिघडून टाकीत आहे. ह्यापासून संस्थानास मोठा अपाय घडेल. साक्रेतिसासारखा ज्ञाता सर्व भूमंडळावर नाहीं, असा देल्फाय् येथील देवानें कौल दिला, असें ढोंग माजवून तो त्या कौलावर मनस्वी फुशारून गेला आहे. संस्थानातील अव्यवस्था काढून टाकून हें ताळ्यावर आणण्याचा, व येथील सर्व लोकांचे दोष उघडकीस आणून त्यांस चांगल्या मार्गास लावण्याचा नसता अधिकार आपल्या डोईवर घेऊन तो इतर

सर्व लोकांस मूर्ख ह्मणतो; व त्याचे आचरणास व रीतीस काहीं भीड न धरितां दोष लावितो. आतां हा एवढा आव घालितो खरा; परंतु ह्याच्या उपदेशानें विद्यार्थी कसे काय तयार होतात, हें पहावयाचें असल्यास क्रितीयस आणि अल्किबेदीस हे ह्याचे जिवलग मित्र आहेत, त्यांची वृत्ति पहावी ह्मणजे स्पष्ट ध्यानांत येईल. ह्या दोघांनीं मोठमोठे घात केले आहेत, व ह्यांसारखे दुष्ट पुरुष सर्व शहरांत दुसरे कोणी नसतील; व ह्या साक्रेतिसासारखा दुराचारी तर सगळ्या जगांत कोणी निघणार नाहीं.

ह्याप्रमाणें फिर्याद करून मिलितसानें शेवटीं न्याया-धीशांस अशी विनंती केली कीं, महाराज, साक्रेतीस श-ब्दपांडित्यानें आपणास मोहित करील; तर आपण फार सावध असावें; व तो आपणास फसविण्यासाठीं गोड गोड मोहक भाषणें करील, तर आपण त्याचें बोलणें बहुतकरून खरें मानूं नये.

साक्रेतिसानें न्यायाधीशास असें सांगितलें कीं, हरको-णाशीं संभाषण करीत असतां मी जसें बोलतों, तसें तुह्मा-पुढें बोलेन. माझ्या बोलण्यांत अगदीं साधे शब्द येतील; स्तुति वगैरे अगदीं असणार नाहीं. असें प्रथमतः सांगून मग त्यानें अर्जीचीं कलमवार उत्तरें देण्यास आरंभ केला. तीं उत्तरें येणेंप्रमाणें:—ज्यास आपल्या घरीं व देवळांत संस्था-नच्या चालीप्रमाणें देवांस बळी देतांना बहुत लोक हरहमेश पहातात, तो मी संस्थानच्या लोकांचे देव मानीत नाहीं; असें ह्मणण्यास आधार काय? अहो, मला अमूक देवता बुद्धिवाद सांगते, ह्मणून हा लोकांत अफवा उठवितो, असा ज्यावर गुन्हा घातला आहे, व ह्यावरून जो नवे देव स्था-

नतों किंवा नाहीं, अशी शंका तरी घेतां येते काय? अहो, जे लोक शकुनविद्येवर विश्वास ठेवून उडणारीं पाखरें, व होमाकरितां मारलेल्या पशूंचीं आंतडीं, व यदृच्छेनें कोणाच्या तोंडांतून जे शब्द निघतील, व जे पदार्थ दृष्टीस पडतील, ते शब्द व ते पदार्थ, * इत्यादिकांवरून, व देवांनीं मनुष्यास पुढें घडून येणाऱ्या गोष्टींचें ज्ञान प्राप्त होण्याकरितां जे निरनिराळे उपाय दिले आहेत, त्याच्या प्रयोगानें, भाकितें करितात, त्या लोकांपेक्षां शकुन पाहण्यानें मीं कांहीं नवा मार्ग पाडिला, असें नाहीं. मिलितस माझ्यावर दोष घालतांना असें ह्मणाला कीं, सॉक्रेतीस दीमन् ह्मणजे उपदेव जे देवाची अपत्यें होत, ते मानतो. तेव्हां त्याच्या ह्या बोलण्यावरून स्पष्ट सिद्ध होतें कीं, नवे देव किंवा जुने, परंतु मी कसे तरी देव मानितों, आणि ह्यावरून मी अगदींच देव मानीत नाहीं, हें त्याचें बोलणें अगदीं खोटें आहे; का कीं, जो देवाची अपत्यें मानितो, तो देव मानीत नाहीं हें संभवत नाहीं.

सृष्टीतील ज्या गोष्टीचा विचार केला असतां पातक आहे, त्या गोष्टीचा हा विचार करितो, असा मजवर दोष घातला आहे; त्याविषयीं माझें उत्तर असें आहे कीं, सृष्ट वस्तूंचा ज्यांत विचार आहे, असें जें सिद्धपदार्थविज्ञानशास्त्र, त्याचा अभ्यास जे सर्वकाळ करितात, त्यांची मी निंदा करीत नाहीं, किंवा जें ते करितात, तें वाईट करितात, असा त्यास दोष लावीत नाहीं खरा; परंतु मी स्वतः इतर सर्व विचार सोडून सदाचरण कोणतें व दुराचरण कोणतें,

* शेवटच्या रीतीनें शकुन पाहण्याची रीत ह्या देशांत प्रसिद्ध आहे.

अंमल कोणत्या प्रकारें करावा, इत्यादि विषयांवर विचार करीत असतों. ह्या विषयांचें ज्ञान इतर सर्व ज्ञानापेक्षां फार उपयोगी आहे. मी जर कांहीं खोटें बोललों असलों, तर माझ्या श्रोत्यांपैकीं पुढें होऊन माझा लबाडपणा काढावा.

आथेन्सकर हो, देवाविषयीं व राज्य करण्याच्या नियमांविषयीं मोठे अनर्थकारक सिद्धांत मनांत भरवून देऊन हा मुलें बिघडवितो, ह्मणून मजवर वादी गुन्हा घालतो; तर तुह्मा सर्वांस विदितच आहे की, मुलास शिकवून पोट भरण्याचा रोजगार म्यां कधीं केला नाहीं, व कोणी किती जरी माझा वैरी असला, तरी, तो ह्यानें अमक्या वेळेस अमक्यास उपदेश करून त्यापासून पैसा घेतला, असा मजवर दोष ठेवूं शकणार नाहीं. ह्याविषयीं मजपाशीं मजबूद पुरावा आहे. तो हा की, मी फार भिकारी आहें मी जर शिकविण्यावर पैसा मिळवितों, तर आज गबर असतों आपण सदाचरणी व्हावें, अशा इच्छेनें जो मजकडे आला, तो गरीब असो किंवा मातबर असो, त्या दोघांसही आपली मतें कळवून त्यांस सुज्ञ करण्याविषयीं मला सारखा उत्साह आहे. मातबर मला अधिक आवडतात, आणि गरीब कमी आवडतात, असें नाहीं; व मी त्यास प्रश्न करावयास व माझ्या प्रश्नांची उत्तरें द्यावयास पाहिजे तितकी फुरसत देतों; घाई कदापि करीत नाहीं. माझे जे श्रोते आहेत, त्यांपैकीं कोणी जर सदाचरणी किंवा दुराचरणी निघाले, तर पहिल्याचें सदाचरण किंवा दुसऱ्याचें दुराचरण ह्याचा आरोप मजवर नसावा; कां की, मी त्याजवर कोणतीही गोष्ट करण्यास जबरी करीत नाहीं. त्याच्या मनास जें भावतें, तें ते करितात. माझा सगळा उद्योग इतकाच कीं, मी

लहान मुलें आणि थोर मनुष्यें ह्या सर्वांस सर्वदा असें सांगतों कीं, बाबांनो, शरीर, संपत्ति, व त्यासारखे दुसरे जे जे अशाश्वत पदार्थ आहेत, त्यांवर फार ममता ठेवूं नका; तर आपल्या आत्म्याविषयीं मुख्यत्वेंकरून कळकळ बाळगा; तोच तुमच्या प्रीतीस मुख्यत्वेंकरून पात्र होण्यास योग्य आहे; व त्यांस मी रात्रंदिवस असा आग्रह करितों कीं, संपत्तीनें चांगुलपणा प्राप्त होत नाहीं, तर उलटें चांगुलपणानें संपत्ति प्राप्त होते; आणि ह्या मानवी संसारांतील सर्व घरगुती किंवा बाहेरील सुखांचें मूळ एक सदाचरण होय, दुसरें नाही.

ह्याप्रमाणें मुलास शिकविणें हें जर त्यांस बिघडविणें आहे, तर मग महाराज, न्यायाधीशहो, मी गुन्हेगार व नशहत भोगावयास योग्य आहें, असें मी आपले तोंडानेंच कबूल करतों. मी बोलतों हें जर लटकें असेल, तर मजवर लबाडीचा दोष शाबूद करणें फार सोपें आहे. ह्या सभेंत माझे पुष्कळ श्रोते आहेत; त्यानी पुढें येऊन तसें बोलावें, ह्मणजे झालें. त्यांस मी मोहित केल्यामुळें, व त्यांची मजवर प्रीति असल्यामुळें, ते कदाचित् माझ्या विरुद्ध बोलणार नाहींत. ते नाही बोलले तरी त्यांचे बाप, भाऊ, चुलते, ह्यांस संबंधाच्या धर्मानें, व ज्या शहरात आपण राहतों त्या शहराचें आपण कल्याण करावें, असा सर्वांचा धर्म आहे, त्या धर्मानें, पुढें सरून आपल्या पुत्रास, व भावांस, व पुतण्यांस बिघडविणाऱ्यावर फिर्याद करून त्याचें पारिपत्य करणें आवश्यक आहे; परंतु ते तसें करीत नाहींत; उलटी त्यांस माझ्या पक्षाचा जय व्हावा ह्याविषयीं फार कळकळ आहे.

महाराज, आपल्या मर्जीस येईल तो हुकूम आपण मला करा. मी तर आपल्या आचरणाबद्दल कदापि पश्चात्ताप करणार नाही, किंवा त्यात फारफेर देखील करणार नाहीं. देवानें साक्षात् जी कामगिरी माझ्या माथीं मारून दिली आहे, ती मला सोडतां येत नाहीं, व तहकूबही करतां येत नाही. त्यानें माझ्या गावकऱ्यांस उपदेश करण्याचें काम माझ्या हिमतीस दिलें आहे, तें मला अवश्य केलें पाहिजे. *पोतिदिया, आम्फिपोलिस, व दालियम ह्या गांवी लष्कर असतां आपल्या सेनापतींनी जीं ठाणीं मला नेमून दिली होतीं, तीं मीं इमानें इतबारें राखलीं; सोडून गेलों नाहीं. आणि तूं विद्याभ्यासांत जन्म घालवून आपणास व दुसऱ्या लोकांस सज्ञान कर, असा ईश्वरानें साक्षात् मला हुकूम करून उपदेश करावयाची जी जागा दिली आहे, ती जर मी आज मरणाच्या भयानें सोडीन, तर हा माझा मोठा अपराध होईल; आणि तेणेंकरून देव न मानण्याचा व त्यांची निंदा करण्याचा दोष मजवर येऊन देवाज्ञाभंगाच्या अपराधाबद्दल ह्या सभेनें बोलावणें होण्यास मी वास्तविक योग्य होईन. इतःपर पुढें मीं मुकाटें रहावें, कोणास कांहीं शिकवूं नये, अशी अट करून घेऊन मला ह्या खटल्यांतून मुक्त करण्याचा तुमचा निश्चय असल्यास, त्याचें उत्तर मी आतांच तुह्मास सांगतों. ऐका, मी तुह्मा आथेन्सच्या लोकांस थोर मानतों, व तुह्मांवर प्रीति करितों खरा, पण तुमच्यापेक्षा देवांची आज्ञा मला अधिक पाळिली पाहिजे; ह्यास्तव माझ्या जिवांत जीव आहे

* ह्या तीन गावां ह्या लढाया झाल्या, त्यांत आथेन्स संस्थानच्या चालीप्रमाणें साक्रेतीस लढावयास गेला होता.

तों मी तुह्मांस उपदेश करण्याचें कदापि सोडणार नाहीं; किंवा तुह्मापैकीं हरएक कोणी मला भेटला असता माझ्या सांप्रदायाप्रमाणें त्यास पुढील हितवाद केल्यावाचून, किंवा दोष दिसल्यास त्यास नांव ठेवल्यावाचून, कदापि राहणार नाहीं; हें पक्कें समजा. तो हितवाद असा की, माझे मित्रहो, सर्व जगात शहाणपणाविषयी अत्यंत विख्यात जें हें आथेन्स शहर, येथील तुह्मी राहणारे असतां, पैसा जमा करणें व प्रतिष्ठा, अब्रू, व मोठमोठ्या पदव्या, हीं मिळविणें ह्यावांचून तुमच्या मनात कसलाही विचार येत नाहीं; शहाणपण, विवेक, व विद्या, ह्याच्या प्राप्तीकडे तुह्मी अगदी लक्ष देत नाहीं; व तुमच्या आत्म्याचे ठायी जितकी पूर्णता व जितकी चांगुलपणा येण्याची योग्यता आहे, तितकी पूर्णता व चांगुलपणा त्याचे ठायीं आणण्यासाठीं तुह्मी कांहींच श्रम करीत नाहीं; ह्याची तुह्मास लाज वाटत नाहीं काय?

हा प्रत्येकास बाहेर बुद्धिवाद करण्याविषयी इतका झटत असतां न्यायाधीशाच्या* मंडळीत येऊन स्वदेशकल्याणाच्या विचारांत बुद्धिवाद सांगण्यास नेहमी अळंटळं करितो, ह्यावरून हा फार भितरा आहे, असा दोष वादीनें मला लाविला आहे; परंतु तुह्मा आथेन्सकरांबरोबर मी बहुत वेळ शत्रूंशीं लढाई करावयास गेलों आहें; व मी जेव्हा मागें मुख्य न्यायाधीश झालों होतों, त्या वेळीं थार्गिनुसे नामक बेटाजवळ

* त्या लोकसत्ताक संस्थानांत आपणास बुद्धिवान् व शहाणे ह्मणणारे जे लोक असत, ते बहुतकरून सरकारी कामांत शिरत, तसें साक्रेतिसानें केलें नाहीं तीच गोष्ट त्याच्या शत्रूनें येथें लबाडीनें त्याच्या विरुद्ध करून दाखविली आहे.

समुद्रांत झालेल्या लढाईत पडलेल्या व बुडून मेलेल्या लोकांचीं त्यांनीं प्रेतें उचलून आणून पुरलीं नाहीत, ह्मणून तुम्ही फौजेच्या सरदारावर गुन्हा ठेवून त्यांस ठार मारण्याचा यत्न करीत असता, तो यत्न ह्या संस्थानच्या कायद्यास विरुद्ध आहे, असा मीं एकल्यानें सर्वांविरुद्ध अभिप्राय दिला; व त्या वेळेस सर्व लोकांच्या विरुद्ध जो बोलेल तो जिवास मुकेल, असें भय होतें; परंतु तें भय मीं जुमानलें नाहीं. ह्यावरून मला वाटतें कीं, आपल्या आगचा शूरपणा व हिम्मत हीं मीं तुह्मा सर्वांस पुरतेपणीं दाखविलीं आहेत. व लिसांदर* ह्यानें आपल्या शहरात जे जुलमी तीस अंमलदार नेमले होते, ते अमलदार दुष्टपणानें जुलमी हुकूम करीत, त्या हुकुमांस मी एक वेळ नव्हे, बहुत वेळ आडवा आलों आहें. ह्यावरूनही मी भितरा आहें की काय, ह्याविषयीं सर्वांच्या मनाची खात्री झाली असेलच. आतां असें असता तुमच्या सभेंत येण्यास मला कशानें अटकाव झाला असावा बरें? मला माझ्या दीमनानें अटकाव केला. ज्या दीमनाविषयीं बोलतांना तुह्मीं सर्वांनी मला बहुत वेळ ऐकिलें आहे, व ज्या दीमनाचा मिलितसानें बहुत वेळा उपहास केला, तो दीमन, मी जेव्हा लहान होतों, तेव्हांपासून मजवर अनुग्रह करीत आहे. एकादी गोष्ट करण्याविषयीं मी निश्चय केला, आणि ती गोष्ट जर वाईट असली, तर मात्र माझ्या मनात

---

* हा स्पार्तन लोकांचा मुख्य सेनापति होता. स्पार्तन लोक व आथेनियन लोक ह्यांची लढाई चालली असतां लिसांदर ह्यानें आथेनियन लोकांचा पराभव करून, त्यांची मुख्य राजधानी आथेन्स काबीज करून, तेथील लोकसत्ताक राज्य मोडून महाजनसत्ताक राज्य स्थापिलें होतें.

संचार करून, ही गोष्ट तूं करूं नको, ह्मणून तो मला सां-
गतो. ह्याच दीमन सरकारी कामात आपण हात घा-
लावा असें माझे मनांत आलें असतां माझें निवारण करितो;
आणि तो असें करितो, ह्यास मोठ्या सबळ युक्ति आहेत.
कां कीं, मीं जर तुमच्या राज्यप्रकरणीं मसलतींत शिरतों,
तर माझ्या हातून माझें व माझ्या देशाचें कांहीएक कल्याण
सिद्धीस न जातां मी बहुत वर्षांमागें कधींच उगीच मरून
गेलों असतों. न्यायाधीश महाराज, माझ्या मनातील ह्या
वास्तविक गोष्टी कांहीं पडदा न ठेवितां मी आपणांपुढें
निर्भीडपणें बोललों, ह्याबद्दल कृपा करून आपण मनांत
वांकडें येऊं देऊं नये. आमच्यांत किंवा दुसरे कोठेंही
जो मनुष्य निर्भीड स्वभावामुळें सर्व लोकांशीं वांकडा होईल,
व आपल्या अमलातील शहरांत अन्यायाचें काम कदापि
होऊं देणार नाहीं, व कायदा कधीं मोडूं द्यावयाचा नाहीं,
अशा निग्रहानें रात्रंदिवस आपलें काम चालवील, त्याला
लवकरच मोठा अपाय होईल, ह्यांत संशय नाहीं; ह्यास्तव
न्यायपक्षपाती जो मनुष्य आहे, त्यास आपण जिवंत असावें
अशी यत्किंचित् इच्छा असेल, तर त्यास सरकारी कामांत
कदापि शिरतां उपयोगी नाहीं.

आथेन्सकर हो, आता मजवर हा जो गहजब गुद-
रला आहे, ह्यापेक्षां कमी संकटांत असूनही कांहीं लोक
असें न्यायाधीशाची पायधरणी करून ह्याचें आर्जव करि-
तात, व त्यांस आपली दया येण्यासाठी सभेंत आपलीं
नायकामुलें आणितात, तसें मीं केलें नाही; परंतु हें न
करण्याचें कारण गर्व किंवा हट्ट किंवा तुह्मांविषयीं तिरस्का-
रबुद्धि ही आहेत, असें अगदी समजूं नका; तर तुमच्या ह्या

संस्थानचा थोरपणा राखण्याकरितां मीं तसें केलें नाहीं. तुह्मास माहीत आहेच की, आपल्या ह्या शहरात असेही कांहीं पुरुष आहेत कीं, जे मरण ह्मणजे अनिष्ट गोष्ट आहे, असें मानीत नाहींत; तर जे अप्रामाणिकपणा व अपकीर्ति ह्यांस मरण ही संज्ञा देतात. अहो, मृत्यु काय तुच्छ पदार्थ आहे. त्यास शहाण्यानें भिऊं नये. ह्याविषयीं नानाप्रकारच्या गोष्टी आजपर्यंत सांगून आज माझे सारख्या उतारवयात, खरी खोटी कशी तरी माझी कांही कीर्ति लोकात झाली आहे, ती झाली असतां, आज जर मरणास भिऊन मी भलतेंच करावें आणि तेणेंकरून आजपर्यंत आपण त्याप्रमाणें वागून जे आचरणाचे नियम व ज्या गोष्टी लोकांस शिकविल्या, त्या सर्व नियमांवर व त्या गोष्टींवर आपण जातीनें त्यांस विरुद्ध वागून पाणी घालावें; हें कृत्य मला योग्य आहे काय? छी. छी, ही गोष्ट मी कदापि करणार नाही.

असो, आतां माझ्या अब्रूची गोष्ट एकीकडे असूं द्या, तीस तर मी मरणास भिऊन तुमची काकुळती केल्यानें बट्टा लागेलच लागेल, ह्यांत कांही संशय नाहीं; परंतु दुसरी गोष्ट मला अशी वाटते की, वादीनें किंवा प्रतिवादीनें न्यायाधिशाचें आर्जव करून व त्यांच्या हातापाया पडून दोषनिर्मुक्त करून घेणें, हें काम वाजवी नाही. वाजवी ह्मटलें ह्मणजे त्यांनीं आपला वाका त्यांचे मनात भरवून देऊन त्या वाक्याच्या खरेपणाविषयीं त्यांची खात्री करावी. न्यायाधीश जे न्यायासनावर बसतात, ते कायदे मोडून लोकांवर मेहरबानी करावयास बसत नाहीत; तर त्या कायद्याप्रमाणें वागून न्याय करावयास बसतात. ते जी शपथ घेतात, ती ते आमच्या मर्जीस येईल त्यास पारपत्य केल्या-

वांचून मोकळा करूं, व वाटेल त्यास अपराधावांचून शिक्षा करूं, अशी घेत नाहीत; तर आह्मी योग्य न्याय करूं अशी घेतात ह्यास्तव तुमचें आर्जव करून तुह्मास तुमची शपथ लटकी करण्याची संवय लावूं नये, व तुह्मीही आह्मास आपणाला अशी दुष्ट संवय लावूं देऊं नये; कांकी, तसें केल्यानें तुमच्या व आमच्या दोघांच्या हातून धर्म व न्याय मोडून दोघांसही पाप लागेल.

आथेन्सकर हो, ह्यास्तव जे उपाय मला गैरवाजवी व बेकायदी वाटतात, ते उपाय मी मरण टाळण्याकरितां ह्या सभेंत करीन, असें कदापि मनांत येऊं देऊं नका. त्यांतून ह्या प्रसंगीं मिलितसानें मजवर नास्तिकपणाचा आळ घातला आहे; ह्याकरितां ह्या प्रसंगीं तर मुख्यत्वेंकरून मी तसें करणार नाहीं. तुमची प्रार्थना करून तुमचें मन वळवून घेऊन तुह्माकडून जर मी तुह्मी वाहिलेल्या शपथा मोडविल्या, तर ह्यावरून मी तुह्मांस देव मानूं नका असें शिकविलें, असें सिद्ध होईल; व मी आपल्यावरचा दोष उडवून आपला बचाव करावयास गेलों, आणि उलटें मीं शत्रूंचा पक्ष बळकट करून आपणच आपणास नास्तिक ठरविलें. असा मूर्खपणाही मजवर येईल; ह्यास्तव अशा पापाच्या विचारापासून मी फार दूर आहें. असो; मजवर तुफान रचणाऱ्यापेक्षा ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं माझी खातरी अधिक झाली आहे. ती खातरी इतकी कीं, मी आपला सर्व भार ईश्वरावर व तुह्मांवर टाकला आहे. माझा हेतु असा आहे कीं, ज्या रीतीनें माझा निवाडा केला असतां तुमचें व माझें दोघांचें कल्याण आहे असें तुह्मास वाटेल, त्याप्रमाणें तुह्मीं निवाडा करावा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

साक्रेतीस आपला निर्भयपणें व दृढनिश्चयानें ऐकणाऱ्या स्पष्ट लक्षांत यावयाजोगें असें हें भाषण बोलला. त्याचा आकार, मुद्रा, व अंगचेष्टा ही फिर्याद झालेल्या पुरुषाच्या सारखी नव्हती. तो इतक्या दिलदारपणानें व उदारपणानें बोलला कीं, त्यावरून तो त्या सभेंतील न्यायाधीशांचा गुरूच आहे, असें दिसलें; तरी त्याचे बोलण्यात मर्यादा तिळमात्र देखील सुटली नव्हती. त्याचें तें प्रौढीचें व थोरवीचें आचरण पाहून न्यायाधीशास मोठा राग आला. बहुतकरून सर्व न्यायाधीशांची हीच गोष्ट आहे की, त्यांच्या समोर जे वादी प्रतिवादी येतात, त्यांस जीवदान देण्यास किंवा मारण्यास आपण अगदी मुकत्यार आहों, असें ते मानितात; व त्यामुळें त्यांस मनांतून असें वाटत असतें कीं, आपणापुढें त्यांनी मोठ्या गरीबीनें व अत्यंत विनयानें व फार मोठ्या धाकानें यावें, व असें करून घेणें हें सर्वांहून श्रेष्ठ जो आमचा अधिकार त्याचा हक्कच आहे. असो.

मिलितसाकडे पहिल्यानें पांचवा हिस्सा संमति नव्हत्या. इतिहासाच्या आधारावरून असें वाटतें की, ह्या प्रसंगा चौकशी करण्यासाठी सगळे मिळून ५५७ न्यायाधीश जमले होते. ह्या संस्थानचा कायदा असा होता की, फिर्यादीस आपण केलेल्या फिर्यादीचा पुरावा करितां न आल्यास त्यानें अडीचशें रुपये दंड दिला पाहिजे. हा कायदा शहाण्या पुरुषानीं बालंटखोरांस दाबांत राखण्याकरितां केला होता. अनितस आणि लिकन हे दोघे मिलितसास सामील होऊन, आह्मीही साक्रेतिसावर फिर्यादी आहों, असें न ह्मणते, तर मिलितसास हा दंड खचीत द्यावा लागता. त्या दोघांनी आपल्या वजनदारीनें बहुत न्या-

याधीशांच्या संमति आपणांकडे ओढल्या. त्यामुळें साक्रेतिसाच्या पक्षास प्रतिकूल मत देणारे दोनशेंएक्यायशीं न्यायाधीश झाले, व त्यास अनुकूल मत देणारे जे होते, त्यांपेक्षां तीन किंवा अधिक मिळते तर साक्रेतिसाच्या वतीनें खटला तुटून तो दोषापासून मुक्त होता, असा प्राचीन लेख आहे; त्यावरून त्याच्या अनुकूल पक्षास २७६ न्यायाधीश होते असें अनुमान होतें.

आथेन्सच्या संस्थानांत अशी रीत होती कीं, ज्या मनुष्यावर दोषारोप झाला असेल, तो गुन्हेगार आहे कीं नाहीं, इतकाच प्रथम न्यायाधीशांनी निर्णय करावा. नंतर कैदी गुन्हेगार असें ठरल्यावर वादीनें त्यास अमुक शिक्षा असावी ह्मणून सांगावें, व कैदीनें मला अमुक शिक्षा योग्य आहे असें सांगावें, व त्या दोन्ही ह्मणण्यांचा विचार करून न्यायाधीशांनीं त्या दोन्हीतून एक शिक्षा ठरवावी. त्यावरून त्यांनीं साक्रेतिसास सांगितलें कीं, ठार मारण्याचे जागीं मला हद्दपार जाणें, दंड देणें, किंवा कैदेंत राहणें, ह्यांतून एकादी शिक्षा द्यावी असा ह्या सभेस तूं अर्ज केल्यास, सभा तो अर्ज मान्य करून तुझ्या इच्छेप्रमाणें करील. त्यावर त्यानें असें मोठें दिलदारीनें उत्तर दिलें कीं, तुह्मीं सांगितलेल्या शिक्षांपैकीं, एकही शिक्षा मी मान्य करीत नाहीं; कां तर, तसें करण्यांत मी आपल्या तोंडानें आपणास दोषी ठरविलें असें होईल. अहो आथेन्सकरहो, ज्या अर्थी मजकडूनच माझ्या अपराधानुरूप मला शिक्षा ठरवीत आहां, त्या अर्थी आतां तुह्मास फार वेळ तांटकळत ठेवीत नाहीं: सावधान चित्त होऊन ऐका. मीं आपला सर्व जन्म तुह्मास व तुमच्या मुलांस शिकविण्यांत

चालविला, व त्याकरितां सर्व घरगुती कामें सोडून दिलीं, व सर्व सरकारी चाकऱ्या व पदव्या ह्याकडे दुर्लक्ष्य केलें, व आपल्या शहरच्या लोकांस सदाचरणी करण्यासाठीं रात्रंदिवस श्रम करून स्वदेशाचें कल्याण केलें. हीं कृत्यें केल्याबद्दल मी आपणास अपराधी ठरवितों, व ह्या अपराधाबद्दल मी आपणास अशी शिक्षा ठरवितों की, जन्मपर्यंत माझा खर्च सरकारातून चालवून मला ह्या तुमच्या प्रितानियम नामक न्यायसभेंत सर्व न्यायाधीशांचा अध्यक्ष करून ठेवावें; ह्या माझ्या अपराधास मला ही शिक्षा असावी, असें माझें मत आहे. हें त्याचें शेवटचें वाक्य ऐकून न्यायाधीशांचें पित्त असें खवळलें कीं, त्यांनीं तत्काळ हेम्लाक नामक विष पाजून त्यास ठार मारावें, असा हुकूम दिला.

सभेचा असा कडक हुकूम झाला, तरी तेणेंकरून साक्रेतिसाचें धैर्य तिळमात्रही ढळलें नाहीं. तो यत्किंचित्ही न घाबरतां स्वस्थपणें न्यायाधीशांस असें ह्मणाला कीं, महाराज, आपल्या आज्ञेनें मी मरणाची शिक्षा भोगावयास जातों, पण ही शिक्षा आपण मला अपूर्व केली असें नाहीं. ही मी जन्मास आलों त्या वेळेस माझ्या कपाळीं देवानेंच लिहून ठेविली होती; परंतु मजवर हक्कनाहक ज्यांनी बालंट घेतलें आहे, त्यांचा सत्यपक्षपाती जो ईश्वर त्याच्या सत्तेनें ह्या अन्यायापासून व अपकीर्तीपासून माझ्यापेक्षां कमी नाश होणार नाहीं; अधिक होईल. अहो, तुह्मांस असें वाटत होतें काय, कीं मी तुमच्या हातून मोकळा होण्याकरितां लोकांसारखें तुमचें आर्जव करीन, व करुणा यावयाजोगीं दीन भाषणें बोलेन, व शरणागतासारखा फार भिऊन हलकेपणानें तुमच्या पुढें वागेन ?

तुह्मांस कसें वाटत असेल तें वाटो; परंतु मला तर असें वाटतें कीं, जो मनुष्य भला आहे त्यास लढाईंत जसें अयोग्य उपायांनीं पळून शत्रूंस पाठ दाखवून आपल्या जिवाचा बचाव करणें योग्य नाहीं, तसें न्यायसभेंतील चौकशींतही तसें करणें योग्य नाही. मजवर सांप्रत जसें संकट पडलें आहे, असें संकट आलें असता, लोक अश्रिव करून डोळ्यांत आसवें आणून, व ह्याच प्रकारचे दुसरे पाजीपणाचे उपाय योजून, आपले जीव वांचवितात, असें ह्या सभेंत नेहमीं आढळतें; परंतु असें करणें जसें खरे शूरास अपमानदायक आहे, तसें नेकीच्या सर्व पुरुषांसही अपमानदायक आहे

आपालेंदोरेस ह्मणून एक साक्रेनिसाचा परम मित्र व शिष्य होता. तो त्यास असा हुकूम झालेला ऐकून त्याचे जवळ जाऊन त्यास ह्मणाला, अहो, निरपराध तुह्मी मरतां, हें पाहून मला फार खेद होतो साक्रेतिसानें हांसून त्यास उत्तर दिलें, बाबा, तर तुझ्या मनात काय मीं अपराधी असून मरावें ?

प्लुटार्कनामक ग्रंथकारानें, आपणा मनुष्याचा शरीररूप जो अत्यंत क्षुल्लक भाग आहे, त्यावर मात्र दुसऱ्याचा अंमल चालतो; परंतु आपला दुसरा भाग जो जीव आहे, तो पहिल्या भागापेक्षां फारच श्रेष्ठ आहे; त्याचा नाश करीन अशी कोणाची धमकी चालावयाची नाहीं; व तो कोणास उपद्रव करण्यास सांपडावयाचा नाहीं; हा अर्थ सिद्ध करून दाखविण्याकरितां, साक्रेतिसानें ह्या प्रसंगीं बोललेलीं उत्कृष्ट वाक्यें आपल्या ग्रंथांत लिहून ठेविलीं आहेत. तीं वाक्यें साक्रेटीस आपणावर फिर्याद करणाऱ्यास लक्षून

बोलला आहे; परंतु तीं वाक्यें फिर्याद करणाऱ्यापेक्षां न्यायाधीशास चांगलीं लागू आहेत. तीं वाक्यें येणेंप्रमाणेंः—भनितस आणि मिलितस हे मला ठार मारोत; परंतु त्यांस मला उपद्रव करण्याचें सामर्थ्य नाहीं. ह्या वाक्याचा अभिप्राय असा कीं, नशीब हें, धन, दौलत, आरोग्य व जीवन, इत्यादि जी माझ्या शरीराची क्षणभंगुर संपत्ति हिचें हरण करील; परंतु ह्यांत माझा फारसा तोटा नाहीं. का की, मी शरीर नव्हें, तर मी अजरामर आत्मा आहें, व माझी सदाचरण, निर्दोषीपणा, औदार्य, इत्यादि जी अंतरंग उत्तम संपत्ति आहे, ती बलात्कारानें मजपासून हरून घेण्यास बाहेरील नशीब वगैरे कोणीही समर्थ नाहीत.

हा थोर मनुष्य, गड्यांनो, ज्ञात्यानें पापावांचून दुसऱ्या कशास कदापि भिऊ नये, असें आपल्या शिष्यांस वारंवार पढवीत असे, व त्याविषयी त्याची पक्की खातरी होऊन गेली होती; ह्यास्तव त्यानें असा विचार केला कीं, लोक आपणास न्यायाधीशाची पायधरणी करावयास सांगतात, त्यांचें ऐकून तसें नीच आचरण करावें, आणि तेणेंकरून चिरकाळपर्यंत आपला अपमान करून घेऊन इतकीं वर्षें नीट वागून मिळविलेल्या प्रतिष्ठेस एका पाव घटकेंत काळोखी आणावी, ह्यापेक्षा आपण आजपासून पुढें जी काहीं थोडीं वर्षें वांचूं असें वाटतें, त्या वर्षांची आशा सोडून देऊन आजच मरावें हें फार चांगलें आहे.

आजचे लोक मला पुरतेपणें जाणत नाहींत, परंतु पुढील लोक ह्या माझे स्वरूपाची पुरतेपणें पारख करतील, असा त्याचा निश्चय होता. ह्या प्रकारें त्या सुज्ञ व चतुर पुरुषानें फार उतार झालेल्या वयाचा थोडासा अवशेष उ-

दारपणें खर्चून असें दिव्य यश मिळविलें कीं, जेणेंकरू
पुढील लोकांत त्याची मोठी वाहवा होऊन गेली.

---

## अध्याय ७.

साक्रेतिसानें तुरुंगांतून पळून जाणें नाकबूल केलें. आत्मा नि
आहे ह्या विषयावर आपल्या मित्राबरोबर संभाषण करून त्या
त्यानें आयुष्याचा शेवटचा दिवस घालविला. तो विष प्याल
आणि मृत्यु पावल्यानंतर त्यावर मिथ्या अपवाद घेणाऱ्याचें अ
गींच आळ घेतल्याबद्दल पारिपत्य झालें. मेल्यावर त्या
मोठी प्रतिष्ठा मिळाली. हा विषय ह्या अध्यायांत आहे.

हा हुकूम साक्रेतिसास झाल्यावर तो जशा निर्भय मु
नें* त्या जुलमी अंमलदारांस धाकांत राखीत असे, तशा नि
र्भय मुद्रेनें तो तुरुंगांत गेला. सिनेकानामें रोमन ग्रंथका
असें लिहितो कीं, साक्रेतीस तुरुंगांत गेल्यापासून त्या
तुरुंग हें नांव जाऊन सदाचरण व प्रामाणिकपणा ह्यां
स्थान, असें त्यास नांव प्राप्त झालें. साक्रेतिसाच्या म
गून त्याचे मित्रही तुरुंगांत गेले; व हा हुकूम झाल्य
दिवसापासून पुढें तीस दिवसानीं साक्रेतिसास विष पाजलें
तितके दिवस ते त्यास भेटावयास नेहमीं तेथें जात असत
हुकूम अमलांत आणावयास इतका फार विलंब होण्या
कारण असें होतें कीं, देलोस नामें एक बेट असे, तेथीं
देवास बळी देण्यास आथेन्सकर दरसाल सर्व सामग्री आ
भरून एक गलबत पाठवीत असत; व त्या लोकांचा का

---

* आथेन्सांत लिसांदरानें जुलमी तीस अमलदार नेमले होते ह्मणू
सांगितलें, ते अंमलदार साक्रेतिसास त्याच्या निस्पृहतेमुळें फार भी
असत.

दा असा होता कीं, हें गलबत तयार होऊन रवाना झाल्यापासून पुनः परत येईपर्यंत शहरांत कोणा एकास जिवें मारूं नये.

साक्रेतिसास ही शिक्षा सांगितल्याच्या आदल्या दिवशीच तें गलबत रवाना झालें होतें. ह्यास्तव तें परत येण्यास तीस दिवस लागले; तितके दिवस हा हुकूम बजावयाचें तहकूब करणें अगत्य पडलें.

हा जो मध्यें बहुत वेळ गेला, ह्या वेळात साक्रेतिसास आपला सर्व भयंकरपणा दाखविण्यास मृत्यूस चांगली सवड सांपडली होती. इतक्या वेळास त्याच्या आंगचें धैर्य खूप कसोटीस लागलें असावें; व ही पारख केवळ त्यास अंधारकोठडींत हाल भोगावे लागले, व पायांत बिड्या पडल्या होत्या त्या सोसाव्या लागल्या, तेवढ्यानेंच झाली असें नाहीं; तर प्राण्यांस ज्या गोष्टीचा तिटकारा स्वभावतः नेहमीं येतो, अशी जी गोष्ट ( मरण ) ती त्याच्या रात्रंदिवस डोळ्यांपुढें दिसत होती; ती आपणास आतां घडती, मग घडती, असें त्यास वाटत होतें; तेणेंकरूनही ही झाली. असा प्रसंग आला असताही, त्याच्या मनाची रोजची जी आनंदवृत्ति असे, ती होती तशीच होती; तीत काडीमात्रही अंतर पडलें नाहीं. तो आपल्या मित्रांशी संभाषण करीत असतां नेहमी जी आपली समाधानवृत्ति प्रगट करी, तशाच समाधानवृत्तीनें तो त्यांशी तशा प्रसंगीही संभाषण करी. क्रेतो ह्मणून त्याचा एक मित्र होता, त्यानें असें सांगितलें आहे की, उद्यां मरायाचें तरी साक्रेतीस आज रात्रीं नित्याप्रमाणें खुशाल गाढ निजला होता. त्यानें त्या दिवशीं अपालो नामक देवाचें व दायेना नामक दे-

वीचें एक स्तोत्र रचलें, व इसापनीतींतील एका गोष्टीचे श्लोक बांधले. देलोस येथून गलबत येऊन पोंचणार त्या दिवशी, किंवा त्याच्या आदल्या दिवशी, त्याचा जिवलग मित्र जो क्रेतो, तो मोठ्या सकाळीं त्याजकडे गेला, आणि त्यास तें गलबत येण्याचें वाईट वर्तमान कळवून ह्मणाला कीं, हा तुरुंग सोडून आपला प्राण वांचवावयाचें केवळ आपल्या हातीं आहे. आह्मी तुरुंगावरचा मुख्य कामगार अनुकूळ करून ठेवला आहे. आपण नाल त्या वेळेस तुरुंगाचे दरवाजे खुले असतील. आपण येथून निघून गुपचीपपणें थिसली प्रांती जाऊन तेथें स्वस्थ रहावें. वाटेनें जातांना आपल्या केंसास सुद्धां धक्का लागणार नाहीं. ह्याप्रमाणें आह्मीं सर्व तयारी यथास्थित केली आहे. आपण कृपा करून आमची विनंती अवश्य मान्य केली पाहिजे. हें क्रेतोचें भाषण ऐकून साक्रेतिसास हंसें आलें, आणि तो ह्मणाला, बाबा, क्रेतो, ह्या आतिका* प्रांताबाहेर जेथें लोक मरत नाहीत, अशी एकादी जागा तुला विदित आहे काय? हें विनोदाचें भाषण ऐकून क्रेतोस हंसूं आलें नाही. तो ह्मणाला, महाराज, ही गोष्ट ऐकिलीच पाहिजे. सोन्यासारखी ही सवड आली आहे, ही आपण फुकट घालवू नये. असा त्यानें त्याच्या गळीं पडून त्यास फारच आग्रह केला; व आपण सागतों, ह्या मसलतीस रुकार देऊन तुरुंग सोडण्यास त्यानें राजी व्हावें, ह्याविषयीं खूप प्रमाणांवर प्रमाणें दाखविलीं. तो असें ह्मणाला कीं, तुमच्यासारखा अमो-

---

* ज्या प्रांताची आथेन्स शहर राजधानी होती, त्या प्रांतास आतिका ह्मणत.

लिक मित्र गमावल्याबद्दल जो मोठा शोक मला होईल, त्याविषयीं तर बोलावयास नकोच. ह्याखेरीज असें आहे कीं, क्रेतो जर साक्रेतिसास वाचविता, तर तें त्याच्या स्वाधीन होतें; पण जवळ इतका पैका असतां ह्या गोष्टीकरितां त्यास थोडा पैसा खर्चावा असें वाटलें नाहीं, अशी जी माझी निंदा असंख्यात लोक करतील, ती मीं कशी बरें सोसावी? आपण तुरुंग सोडला असतां आपणास व दुसऱ्या कोणास उपद्रव होण्याचा अगदीं संभव नाहीं; असें दिसत असताही साक्रेतिसासारख्या ज्ञात्या पुरुषानें तुरुंग सोडला नाहीं असें कोणास खरें तरी वाटेल काय? आपणास कदाचित् भय वाटत असेल कीं, न जाणो, एक करितां एक होऊन सरकारानें आपणाकरितां आपल्या मित्रांची घरें दारें लुटली, त्यास बंदींत घातलें, किंवा जिवें मारलें, तर काय करावें? परंतु महाराज, मी आपणास असें विचारितों कीं, आपल्या जिवापेक्षां अधिक मोलाची अशी आपल्या मित्रास दुसरी काहीं गोष्ट आहे काय? व असावी काय? मग इतके प्रिय जे आपण ते गेल्यावर त्यांस घरदार, स्वातंत्र्य, व प्राण ह्यांस काय करावयाचें आहे? आपणावाचून तीं सर्व त्यांस व्यर्थ आहेत.

परदेशचे लोक सुद्धां, साक्रेतिसाचा जीव वाचविण्याचें यश तुह्मांसच घेऊं देणार नाहीं, आह्मीही घेऊं, असें आह्मांशीं भांडत आहेत. त्यांतून पुष्कळ लोक तर जें द्रव्य पडेल तें देऊन आपणास गुपचीपपणें ह्या तुरुंगांतून काढून न्यावें ह्याच हेतूनें तांब्याचे पैक्याच्या मोठमोठ्या थैल्या घेऊन येथें आले आहेत; व ते उघड असें बोलतात कीं, साक्रेतीस आमच्या देशांत येऊन त्याचा जर

आमच्या हातून सन्मान झाला व त्यास ज्या ज्या गोष्टींची गरज लागेल, त्या त्या गोष्टींचा जर आमच्या हातून मनमुराद पुरावा झाला, तर आह्मी मोठी प्रतिष्ठा मिळविली असें होईल. आपणास गैरवाजवी ही ठार मारण्याची शिक्षा व्हावयास जे दुष्ट कारण झाले आहेत, त्या शत्रूंच्या हस्तगत होऊन बसून आपला खरा पक्ष अगदीं बुडवावा, हें आपणास तरी उचित आहे काय? आपले गांवकऱ्यांच्या हातून एखादा अनपराध्याचा वध होत आहे, तर तो दोष त्याच्या हातून घडूं न देण्याची तजवीज आपल्या हातीं असल्यास ती करणें, हा सदाचरणी व वाजवी मनुष्याचा धर्म नव्हे काय? परंतु मी जीं हीं सर्व कारणें सांगितलीं, त्यांनीं जर आपलें मन फिरत नाहीं, व आपलें संरक्षण करण्याविषयीं आपणास कांहींच कळकळ वाटत नाहीं, तर न वाटो; परंतु आपणास मुलें आहेत, त्यांच्या हिताकडे तरी आपण लक्ष्य दिलें पाहिजे खरेंच पहा, आपण जर आज मेलां, तर आपल्यामागें त्यांची काय अवस्था होईल बरें? पंडितपणाचा लौकिक मिळविण्यासाठीं बापाचा धर्म आपणास मुळींच सोडतां येत नाहीं.

क्रेतोचें हें भाषण साक्रेतिसानें लक्ष्य लावून ऐकून घेतलें, आणि आपणाविषयीं ह्यास इतकी ममता आहे हें पाहून त्याविषयीं त्याची त्यानें स्तुति केली, व त्याचा आपणावर मोठा उपकार मानला; परंतु त्याचें ह्मणणें मान्य करण्याचे पूर्वीं तो असा विचार करूं लागला कीं, आथेन्सकरांच्या परवानगीवांचून तुरुंगांतून निघून जाणें, हें आपल्या प्रामाणिकपणास उचित आहे की नाहीं? आणखी साक्रेतिसास विचार करावयाची गोष्ट इतकीच

रता का, एखाद्या मनुष्यास ठार मारण्याची शिक्षा झाली आहे; परंतु ती शिक्षा अन्यायानें झाली आहे, आणि तो मनुष्य शिक्षा टाळण्याकरितां जर पळून गेला, तर तो अपराधी आहे की नाहीं? ह्या स्थळीं विचार करण्याजोगी कांही गोष्ट आहे असें मनांत आणणारे लोक ह्या काळांत पाहू गेल्यास फारच थोडे सांपडतील, असें आह्मांस वाटतें.

साक्रेतिसानें प्रकृत विषयास गैरलागू अशा सर्व गोष्टी एकीकडे काढून टाकून प्रकृत विषयाच्याच विचारास आरंभ केला. तो ह्मणाला, क्रेतो, मी हा तुरुंग सोडावा असें जर त्वां मला सिद्ध करून दाखविलें, तर मला खरो-खरी मोठा आनंद होईल; परंतु तसें करणें नीट आहे अ-शी माझी खात्री तुमच्या हातून झाल्याखेरीज माझ्यानें ही जागा सोडवत नाहीं. आपणांस एखादी गोष्ट करावया-ची असतां तीविषयीं लोक काय ह्मणतात, ह्याची काळजी बाळगण्याची आपणांस अगदीं गरज नाहीं; तर ती गोष्ट वाजवी किंवा गैरवाजवी आहे, हा निवाडा करण्याचा अ-धिकार ज्यावांचून दुसऱ्या कोणास नाहीं, असा जो एक सत्यपक्षपाती ईश्वर तो ही गोष्ट केली असतां आपणांस काय ह्मणेल, ह्याची मात्र आपण काळजी करावी. द्रव्य, अन्न, मुलें, व आपका ह्यांचा नाश होईल ह्मणून त्वां मला बहुत सबबी सांगितल्या त्या खऱ्या; परंतु तुह्मी जी गोष्ट करा-याला सांगतां ती गोष्ट वाजवी आहे, असें तुह्मीं मला दा-खविल्यावांचून त्या सबबी नाहीं सारख्याच आहेत. आ-पणां सर्वांस हा नियम मान्य आहे, व हा कदापि फिरणार नाहीं कीं, जें काम गैरवाजवी आहे, त्याविषयीं मनुष्यें कांहीं ह्मणोत व त्यापासून कोणतेंही कल्याण होवो; तें काम

जो कोणी करील, त्याची दुष्कीर्ति व नाश हीं झाल्यावांचून कदापि राहणार नाहींत. हा नियम मूळ धरून आपण आजपर्यंत वादविवाद करीत आलों, व ह्यापासून कधीं तिळमात्रही ढळलों नाहीं. लहान मुलांस जसें एक व निश्चित मत नसतें, ह्यास्तव तीं एकदम होय व नाहीं दोन्ही ह्मणतात, तसें आपण ह्या उतारवयात गंभीर विषयांवर बोलत असतां करावें, हें आपणांस योग्य आहे काय? माझ्या जिवलगा क्रेतो, तर आपणास कांहीं स्थिर व निश्चित नियम असावे, हें बरें नव्हे? असो.

बरें आतां क्रेतो, आपण इतके दिवस जे नियम ठरविले आहेत, त्या नियमांस तुह्मी सांगता ही गोष्ट अनुसरून आहे किंवा नाहीं ह्याचा आपण विचार करूं. आपणां सर्वांचा असा सिद्धांत आहे कीं, दुसऱ्याशी अन्यायानें वागणें, मग तें कोणत्याही सबबीनें कां असेना, किंवा जे आपणांस उपद्रव देतात, त्याशीं कां असेना, कसें असलें तरी अन्यायानें वागणें ह्मटलें ह्मणजे निषिद्ध आहे. तसेंच दुसऱ्यानें आपलें वाईट केलें ह्मणून त्याचें आपण वाईट करूणें हेंही निषिद्धच आहे. अमुक करितों असा शब्द आपल्या तोंडांतून एकदां निघून गेला, ह्मणजे ती गोष्ट करण्याकरिता आपण शब्दानें बांधले गेलों कोणतें व कसेंही हित असलें तरी त्याच्या साठीं आपणांस दिलेलें वचन मोडता येत नाहीं. असें मनांत आणा कीं, मी तुरुंगातून पळून जावयास सिद्ध झालों, आणि त्या संधीस ह्या संस्थानचे सर्व कायदे एकत्र गोळा होऊन मजपुढें मूर्तिमंत येऊन उभे राहिले आणि मला जर त्यांनीं हे पुढील प्रश्न केले, तर त्यांस मीं काय उत्तर द्यावें बरें क्रेतो? ते प्रश्न असे

की, **साक्रेतिसा**, हें तूं काय करितोस? अरे, न्यायास भिऊन पळून जाणें ह्मणजे हें संस्थान व येथील कायदे आह्मी, ह्यास सफई बुडवून टाकणें नव्हे काय? ज्या संस्थानात न्यायाचें प्राबल्य नाहीं, आणि इतकेंच नाहीं, तर उलटें जेथील लोक न्यायाचा धिक्कार करून त्यास मोडून टाकितात, तें संस्थान टिकेल, असें तुला वाटतें काय? आतां त्या कायद्यांस द्यावयास मला एक उत्तर आहे की, ह्या संस्थानचे सरकारानें मला ठार मारावें, अशी गैरवाजवी शिक्षा ठरवून हें सरकार मजशीं अन्यायानें वागलें ह्मणून मी तें सोडतों. असें मी ह्मणेन खरें, परतु कायदे ह्यावर असें ह्मणतील की, ह्या संस्थानी तूं ज्या अर्थी राहिलास, त्या अर्थी येथील सरकार जो इनसाफ ठरवील तो इनसाफ माझ्या स्वताच्या विचारास विरुद्ध असला, तरी मी आपला विचार एकीकडे ठेवून सरकारचा इनसाफ कबूल करीन, अशी तुझी बोली संस्थानाशीं आहे, असें स्पष्ट सिद्ध होतें. तर ही बोली तूं विसरलास काय? सर्व रयतेनें असें कबूल केल्यावांचून सरकारी अंमल चालावयाचा नाहीं. आह्मी कायदे व आमच्या संस्थानची अंमल करण्याची रीत जर तुला आवडत नव्हती, तर हा खटला तुजवर होण्याचे पूर्वी तूं हें संस्थान सोडून दुसऱ्या पाहिजे त्या ठिकाणीं जाऊन रहावयास मुखत्यार होतास; परंतु आज सत्तर वर्षे येथें तुझी वस्ती आहे, ह्यावरून स्पष्ट सिद्ध होतें कीं, येथील कायदे तुला वाईट वाटले नाहींत. तर त्वां पुऱ्या माहितीनें व स्वताच्या अनुभवावरून आपण होऊन कायदे मान्य केले आहेत असें दिसतें. वस्तुगत्या पाहिलें असतां विद्या, धन,

वगैरे जें जें तुजपाशीं आहे, तें तें आह्मां कायद्यांमुळें तुजपाशीं आलें आहे, व राहिलें आहे. साक्रेतिसा, त्वां ह्या संस्थानाशीं जे संकेत केले आहेत, व जे मी पाळीन ह्मणून अनेक शपथा वाहिल्या आहेत, ते संकेत व त्या शपथा मोडण्यास तूं मुखत्यार आहेस काय? ह्या संस्थानच्या सरकारानें तुझा नाश करावयाचें जरी योजिलें, तरी त्यानें आपलें वाईट केलें, व आपणास उपद्रव दिला, ह्मणून त्याचें वाईट करणें व त्यास उपद्रव देणें, तुला उचित आहे काय? असें तूं आपल्या आईशी किंवा बापाशी वागशील? तुला हें माहीत नाहीं काय, की ईश्वराच्या मतें, व सर्व मनुष्यांच्या मतें, मनुष्यास जन्मदेश आईबापापेक्षां किंबहुना सर्व सोयऱ्याधायऱ्यापेक्षां थोर व मान्य आहे; व त्यानें त्यास गौरविलें पाहिजे; व त्यानें मनस्वीपणानें जरी कांहीं सांगितलें, तरी तें ऐकिलें पाहिजे; फार तर काय, पण त्यानें पीडा दिली असतांही त्याशी ममतेनें व कृपाळूपणानें वागलें पाहिजे? सारांश, आपला देश आपणाशी अन्यायानें वागतो आहे, तर आपण मोठ्या विनयानें त्याची कानउघडणी करून, व त्यास शहाणपणाच्या चार गोष्टी सांगून त्यास शुद्धीवर आणावें; शुद्धीवर न येई तर तो जो हुकूम करील तो निमूटपणें शिरसामान्य करावा, हाच आपला धर्म होय. साक्रेतिसा, तूं आपल्या मुलांविषयीं जर कांहीं काळजी करीत असशील, तर ती तूं करूं नको. तुझे मित्र आहेत, ते त्यांच्या हातून होईल तितकें त्यांचें कल्याण करितील, आणि त्यांनी कदाचित् न केलें, तरी निदानचा जो सर्वपालक विश्वंभर तो त्यांस कधीं अंतर देणार नाहीं. ज्या देशानें तुला जन्म

दिला, जेथें तूं लहानाचा मोठा झालास, व जेथें तुला विद्या प्राप्त झाली, त्या देशांतील कायदे तुला जो बुद्धिवाद सांगतात, तो ऐकून त्यांवर भार ठेव. साक्रेतिसा, ह्या जगांत मुलें बाळें वगैरे ज्या ज्या आपणांस प्रियवस्तु आहेत, त्या तर काय, पण आपला प्राण सुद्धा प्रामाणिकपणापेक्षां मोठा मानूं नको. साक्रेतिसा, तूं असें वागलास ह्मणजे तुला *प्लूतोच्या सभेंत तुझी चौकशी चालली असतां तेथील न्यायाधीशांस उत्तरें देण्यास अडचण पडणार नाहीं; परंतु जर अन्यथा वागशील, तर आह्मी तुझे वैरी होऊन तुझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत तुला क्षणभर देखील चैन पडूं देणार नाहीं; आणि तूं मेल्यावर परलोकीं आमचे भाऊबंद जे दुसरे कायदे आहेत, ते तूं आमचा अपमान केला असें जाणून तुजवर कदापि अनुग्रह करणार नाहीत; तर तुझा नाशच करतील. ह्याप्रमाणें बोलून साक्रेतीस क्रेतोस ह्मणाला, मला वाटतें कीं, मी जें बोललों, ह्याचा तुला पूर्ण बोध झाला, व मीं जे हेतु दाखविले हे तुझ्या मनांत चांगले पक्के ठसून आतां तुला ह्या विषयावर शंका काढावयास जागा उरली नाहीं. क्रेतोनें उत्तर केलें, होय; खरोखरी नाहीं; तुह्मी ह्मणतां हें सर्व वास्तविक आहे, असें ह्मणून तो निरुत्तर होऊन तेथून उठून आपल्या घरास गेला.

शेवटीं साक्रेतिसाच्या मृत्यूची पताकाच काय असें जें देलोस बेटास गेलेलें गलबत, तें आथेन्स शहरास येऊन पोहोंचलें. तेव्हां दुसरे दिवशीं मोठ्या सकाळीं प्लेतोखेरीज सर्व साक्रेतिसाचे मित्र त्याचे भेटीस गेले. प्लेतो अजारी होता,

---

* हिंदु लोक जसा यम नरकलोकाधिपति मानतात, तसे ग्रीक लोक प्लूतो नामें एक नरकाधिपति देव मानीत असत.

ह्मणून तो मात्र गेला नव्हता. परंतु तुरुंगवाल्यानें त्यांस सांगितलें की, तुरुंगाचे अकरा अंमलदार, तुला आज मराव-याचें असें कैदीस कळविण्याकरितां आंत आले आहेत, ह्मणून तुह्मी अंमळ बाहेर बसा. नंतर ते लवकरच आंत गेले आणि पाहतात तों साक्रेतिसाच्या पायातल्या बेड्या काढल्या आ-हेत, आणि तो व त्याची बायको जांतपी ही शेजारीं शेजारी बसलीं आहेत, व तिनें आपल्या हातांवर मूल घेतलें आहे, असें त्यांच्या दृष्टीस पडलें. त्यांस पाहतांच तिनें मोठी किंका-ळी फोडली, आणि मोठ्यानें फुंदत, केंस तोडीत व हातानें तोंड बडवीत साक्रेतिसा, हे तुझे मित्र तुझी शेवटची भेट घ्यावयास आले आहेत, असें ह्मणून मोठ्यानें रडून तिनें स-गळा तुरुंग दणाणून दिला. नंतर साक्रेतिसानें, हिला येथून न्याल तर बरें होईल, असें ह्मटल्यावरून त्याच्या मित्रांनीं तिला घरीं पोहोंचती केली.

साक्रेतिसानें नेहमींसारखें संतोषवृत्तीनें व स्वस्थपणें आ-पल्या मित्राबरोबर संभाषण करून तो सर्व दिवस घालविला. त्या दिवसाचें संभाषण जीवाचे नित्यत्वाविषयीं होतें. हा वि-षय फार उपयोगी व त्या दिवसाच्या प्रसंगास फार उचित असा होता. हा विषय निघण्याचें कारण असें झालें की, ते बोलत असतां, सहज एकानें असा प्रश्न केला कीं, खरा जो पंडित आहे, त्यास मरणाची इच्छा करणें व तें प्राप्त होण्याविषयीं श्रम करणें योग्य आहे किंवा कसें? ह्या प्र-श्नाचा केवळ अक्षरार्थ घेतला असतां त्यापासून पंडितानें आत्महत्या करावी असा अर्थ स्पष्ट गर्भित होतो. साक्रे-तिसानें उपपादन करून दाखविलें की, असें त्यानें करावें हें मत अत्यंत विरुद्ध आहे; कां तर, मनुष्यास ईश्वरानें

स्वतः घडलें आहे, हा त्याचा आहे, व ह्या जगात ह्यास जी अवस्था प्राप्त झाली आहे, तींत त्यानें ह्यास स्वहस्तें ठेवलें आहे. ह्याकरिता त्याच्या परवानगीवांचून ह्यास ती अवस्था सोडतां येत नाही; व त्याचे आज्ञेवांचून हा लोक टाकतां येत नाही. जर टाकील तर अन्यायानें वागल्याचा दोष ह्याच्या माथ्यावर येईल. सर्व मनुष्यांची अशी गोष्ट असतां, पंडिताच्या मनांतच मरणाची आवड योग्य होण्यास कारण काय? ह्या आवडीचें कारण ह्मणून एकच आहे. आपण मरून परलोकीं गेल्यावर तेथें आपणास अलौकिक सुख होईल, अशी त्यास आशा असते; आणि ह्या आशेस आधार ह्मटला ह्मणजे, जीव नित्य आहे, त्याचा नाश कदापि होत नाहीं, हें मतच होय; दुसरा कांहीं आधार नाही. ह्याप्रमाणें जीवाचे नित्यत्वावर त्याच्या भाषणाचा ओघ आला असतां, प्रौढ व अत्यंत उपयुक्त अशा ह्या विषयावर संभाषण करून आपल्या मित्रांस रंजवून साक्रेतिसानें आपल्या आयुष्याचा सरतेशेवटचा दिवस घालविला. प्लेटोनें फीदन नामें जो संवादरूप एक चमत्कारिक ग्रंथ केला आहे, तो सर्व साक्रेतिसाच्या ह्या वेळच्या संभाषणांतील अर्थ घेऊन केला आहे. त्या ग्रंथांत साक्रेतिसानें आत्मा नित्य आहे, ह्या मतास साधक जी प्रमाणें दिली आहेत, तीं स्पष्ट करून दाखविली आहेत, व ह्या मतावर ज्या शंका आहेत, त्या सर्व खोडून टाकल्या आहेत. ह्या ग्रंथांत ज्या शंका केल्या आहेत त्या, आणि आज लोक त्या मतावर ज्या शंका घेतात त्या, बहुतकरून एकच आहेत. शंकांचीं उत्तरें देण्याचे पूर्वी साक्रेतीस ह्मणाला आहे कीं, अरे, ही गोष्ट केवढी वाईट आहे की,

कांहीं अज्ञानी पुरुष, कोणी जें कांहीं बोलेल, त्यास विरुद्ध बोलतात व प्रत्येक गोष्टीविषयी संदेह घेतात, तेवढ्याव रून सर्व लोक कांहींच निश्चित नाहीं, असें ह्मणतात। तो फीदूनास ह्मणतो, गड्या, ही दुर्दैवाची गोष्ट नव्हे काय? ह्या जगांत असे कांहीं लोक आहेत कीं, ज्यांनी कांहीं पोरकळ भाषणें ऐकिली असतात, ज्या भाषणांत सर्व गोष्टी कधीं खऱ्या व कधीं कधी खोट्या दिसतात, आणि तशी भाषणें ऐकिल्यावरून चांगली, सबळ, व सहज समजण्याजोगी प्रमाणें असतां त्यास कोणतीही गोष्ट खरीच वाटत नाहीं! हे अप्रामाणिक आणि असमंजस पुरुष ह्यांनी अज्ञानाबद्दल आपणास दोष लावावा, व आमच्या बुद्धीच्या अल्पतेमुळें आह्मांस ही गोष्ट समजत नाहीं, असें त्यांनीं मनांत मानावें; तसें न करितां उलटें ती प्रमाणें खोटीं आहेत, त्यामुळें आमची खातरी होत नाहीं, असें ह्मणून शेवटीं त्या प्रमाणांचा तिरस्कार करूं लागतात. त्यास असें वाटतें कीं, वस्तुमात्राचे ठायीं स्वभावतः वास्तविकपणा व निश्चयार्हता हीं कांहींच नाहींत; व ही गोष्ट आह्मांसच समजली, दुसऱ्या कोणास समजली नाहीं; ह्याकरितां इतर लोकांच्यापेक्षां आमची विचारशक्ति व आमचें ज्ञान हीं फार मोठीं आहेत.

पुढें साक्रेतिसानें असें मानणें अन्याय होय, असें सिद्ध करून दाखविलें आहे. तो असें ह्मणतो कीं, जर दोन गोष्टी आहेत, व दोन्हींचाही निश्चय होत नाहीं; तर येथें शहाणपणा हाच कीं, जी गोष्ट स्वीकारली असतां हित फार, व विपक्षीं अहित होण्याचा संभव कमी, ती गोष्ट स्वीकारावी. आतां आत्मा नित्य आहे, ह्याविषयी मी ज्या

प्रमाणांचा उपन्यास करितों, तीं खरीं असल्यास मी ह्मणतों हें मानणें हितावह आहे. परंतु माझ्या मरणानंतर जरी तीं खोटीं झालीं, तरी हें मत अंगीकारल्यापासून इहलोकीं मला मोठा लाभ होईल. तो असा कीं, ह्या संसारांत मनुष्यमात्रास जी दुःखें सामान्यतः प्राप्त होतात, तीं तितकीं मला जाणवणार नाहीत. आत्मा नित्य आहे, ह्या मताची उपपत्ति करून साक्रेतीस थांबला नाहीं, तर तें मत सिद्ध झाल्याच्या पोटीं आचरणाचे जे उपयुक्त नियम सिद्ध होतात, त्यांचें निरूपण त्यानें केलें आहे; व परलोकीं अक्षय्य सुख होण्याची आशा पूर्ण होण्यासाठीं मनुष्यानें काय केलें पाहिजे, जें केलें असतां त्या आशेचा भंग होणार नाहीं, व मेल्यावर दुष्टास जो दंड होईल ह्मणून सांगितलें आहे, तो दंड भोगावा लागणार नाहीं, ह्या विषयाचें चांगलें विवरण केलें आहे. मग परलोकीं मनुष्याच्या पापपुण्यांचा निवाडा होतो; पाप्यांस अक्षय्य नरकप्राप्तिरूप शिक्षा होते; व जे जीव निर्दोष व निष्पाप राहतात; किंवा जे पश्चात्तापेंकरून व समाधानवृत्तीचें अवलंबन करून स्वकृत अपराधांची निष्कृति करितात, त्यांस अनंत सुख व अक्षय्य शांति हीं प्राप्त होतात; ज्यांनी लहान लहान पातकें केलीं असतात, व ज्यांनी त्यांचें प्रायश्चित्त केलें नसतें, अशा जीवांस धड सुखाची नव्हे, व धड दुःखाची नव्हे, अशी एक अवस्था आहे, तींत रहावें लागतें; तेथें राहण्यानें त्यांच्या पापाचें क्षालन होऊन ते शुद्ध होतात; इत्यादि अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी त्या पंडितशिरोमणीनें स्पष्ट करून दाखविल्या आहेत. तो आपल्या मित्रांस बोलतो, गड्यानो, तुह्मांस अजून एक गोष्ट सांगा-

वयाची आहे. ती मानणें फार योग्य आहे ती गोष्ट अशी कीं, आत्मा जर नित्य आहे, तर त्यास इहलोकी, व जेथें त्यास अनंत काळ रहावें लागेल, त्या परलोकीं, सुखप्राप्ति व्हावी ह्मणून त्यास चांगल्या मार्गास लावण्यासाठीं आपणांस फारच जपलें पाहिजे; का कीं, ह्या गोष्टीची तिळमात्र उपेक्षा केल्यास, त्या उपेक्षेचे जे घोर परिणाम भोगावे लागतील, त्यांस अंतपारच नाहीं. मनुष्य एकदां मेला ह्मणजे गेला, त्याचें पुढें कांहींच उरत नाहीं, असें जर असतें, तर दुष्ट मोठे दैववान् झाले असते; कां तर ते मेले ह्मणजे त्याबरोबर ते आपलें शरीर, आत्मा, व पातकें ह्या सर्वांपासून मुक्त होते; परंतु ज्या अर्थी आत्मा नित्य आहे, त्या अर्थी सदाचरण केल्यावांचून व सद्विद्या प्राप्त करून घेतल्यावांचून स्वकृत पापापासून मुक्त होण्यास त्यास दुसरा उपाय नाहीं; कां कीं, मनुष्य मेल्यावर त्याजबरोबर दुसरें कांहीं येत नाहीं. त्यानें केलेलें सदाचरण किंवा दुराचरण व त्याचे सद्गुण किंवा दुर्गुण हीं मात्र त्याबरोबर येतात. सदाचरणादिक हीं मनुष्यास जी बरी वाईट शिक्षा लावली असते, तिचीं फळें होत. तींच परलोकीं त्याला अक्षय्य सुख किंवा दुःख प्राप्त होण्याचीं कारणें होतात. जीव देहातून निघून गेल्यावर ते सर्व एकत्र जमण्याची एक जागा आहे; तेथें त्यास दीमन ( यमदूतांसारखे कोणी देवयोनिविशेष आहेत, ते ) घेऊन जातात. मग ते तेथें पोहोंचल्यानंतर त्यांची चौकशी होती. ज्या माणसांनीं आपलें आयुष्य केवळ धड सदाचरणांत घालविलें नाहीं, व धड दुराचरणांत घालविलें नाहीं, त्यांस एका स्थळीं पाठवितात. तेथें त्यांस त्यांच्या अपराधानुरूप दुःखें

भोगावीं लागतात; आणि शेवटीं दुःखें भोगल्यानें त्यांच्या आगचा सर्व दोष जाऊन ते शुद्ध झाले ह्मणजे त्यांस स्वातंत्र्य प्राप्त होऊन, त्यांनीं ह्या मानवी शरीरांत जी चांगली कर्में केलीं असतात, त्याचें चांगलें फळ त्यास मिळतें. जे देवस्वापहार करितात, किंवा ह्यासारखे मोठे मोठे घोर अपराध जाणून बुजून व इच्छापूर्वक करितात, ह्यामुळें हे कदापि शुद्ध व्हावयाचे नाहींत, असें ज्यांच्या चौकशीअंतीं ठरतें, त्यास अत्यंत निष्ठुर असा जो जीवमात्राचा न्यायकर्ता प्लूतो ( यम ) तो तार्तेरसांत ( नरकांत ) झुगारून देतो. तेथून त्याची सुटका कदापि होत नाहीं; व ज्यांचे अपराध तर फार मोठे आहेत; परंतु ते काहीं पारिपत्य करून माफ करावयाजोगे आहेत, ह्मणजे असे कीं, मोठ्या त्वेषानें वेडे होऊन ज्यांनी आईबापांस मोठें दुःख दिलें आहे, किंवा त्यांस ठार मारलें आहे; पण ज्यांस पुढें आपल्या पातकाचा मोठा पश्चात्ताप झाला आहे, अशा मनुष्यांस, मागें सांगितलेल्या मनुष्यांस जो नरक प्राप्त होतो ह्मणून सांगितलें तोच नरक प्राप्त होतो; परंतु त्यांनीं तेथें हाल व यातना भोगून व ज्यांस त्यांनी पूर्वीं पीडा केली असती, त्यांची प्रार्थना करून त्यांपासून ते मुक्त होतात.

आतां जे सुज्ञ पुरुष शुद्ध आचरणांत आपलें सर्व आयुष्य घालवितात, ते मरणानंतर जसें एखाद्या कारागृहांतून सुटावें तसे ह्या नीच शरीरांतून सुटून देवलोकीं जाऊन तेथें देवांनी सत्कारिले होत्साते वास करितात; आणि ते विद्येनें पवित्र झाले असतात, ह्मणून ते त्या लोकीं निरशरीर होत्साते सर्वोत्कृष्ट आनंदाचा अनुभव घेतात; ज्या आनंदाचें वर्णन करणें अशक्य आहे, व ह्या वेळेस

त्याचें विशेष विवरण करण्यास मला अवकाशही नाहीं.

गड्यांनो, मला वाटतें कीं, मी इतके वेळ जें तुह्मांशीं भाषण केलें हें इतकें पुष्कळ झालें. एवढ्यानें मनुष्यमात्रानें जन्मभर क्षणमात्रही हयगय न करितां सद्गुण व सद्विद्या ही प्राप्त होण्याविषयीं अंतःकरणपूर्वक झटावें ही गोष्ट स्पष्ट सिद्ध होते. कां की, पहा बरें, ईश्वरानें असें वागण्याबद्दल आपणांस केवढें मोठें बक्षीस देण्याची योजना केली आहे! व तें बक्षीस प्राप्त होण्याबद्दल आपणास केवढी मोठी आशा असावी! आतां आत्म्याची नित्यता तर स्पष्ट दिसती; परंतु तशी नसतां ती संदिग्ध जरी असती, तरी, जो ज्ञाता ह्मणून आहे, त्यानें आपल्या मनाची अशी खातरी करावी कीं, ह्या विषयाचा पक्का निश्चय नाहीं; तरी सर्वदा ध्यास करून ही गोष्ट खरी मानणें व तदनुसार वागण्यास जे श्रम पडतील, ते भोगणें हें मला फार उचित दिसतें. आपण बहुत वेळ धाडस करितों; परंतु आत्मा नित्य मानून सदाचरण करण्याविषयीं धाडस करणें जसें प्रतिष्ठा देणारें आहे, असें प्रतिष्ठा देणारें धाडस दुसरें कोणतें आहे बरें! एरवीं आशा वाईट खरी; परंतु आपला जीव अमर आहे, व सदाचरण केलें असतां आपणांस अक्षय्य सुखप्राप्ति होईल, अशी जी आशा आहे, ही फारच उत्तम आहे. ह्या आशेस आपण सर्वांनीं भुलावें. ही गोष्ट तुमच्या मनात चांगली बिंबून द्यावी ह्मणून मीं संभाषण इतकें लांबविलें.

साक्रेतिसानें सांगितलेल्या गोष्टी सिसरोनें आपल्या लिहिण्याच्या चालीप्रमाणें फार रस आणून लिहिल्या आहेत. सिसरो आपल्या ग्रंथांत लिहितो कीं, ज्या वेळीं साक्रेतिसानें तो प्राणघातक विषाचा पेला हातीं घेतला, त्या वे-

केस त्यानें जें भाषण केलें त्यावरून असें दिसलें की, हें विष पाजून हे दुष्ट आथेन्सकर मजवर मोठा जुलूम करितात असें नाहीं; तर हे लोक मजवर कृपा करून मला आनंदलोकीं जाण्यास हा मृत्युरूप मार्ग खुला करून देतात; असें त्यास वाटलें. तो ह्मणाला की, आपण हा लोक सोडला ह्मणजे आपल्या आत्म्यास दोन मार्ग लागतात. एक मार्ग असा कीं, ज्या मार्गानें जे जीव इहलोकीं कुत्सित विषयसुखास लंपट होऊन किंवा मोठमोठी पापकर्मं करून आपणास भ्रष्ट करितात, ते अक्षय्य नरकास जातात. दुसरा जो मार्ग आहे, त्यानें जे जीव येथें पृथ्वीवर सदाचरण करितात व आपला पवित्रपणा राखतात, ते सुखमय देवलोकास जातात. साक्रेतिसाचें बोलणें आटपल्यानंतर क्रेतोनें त्यास विचारिलें, महाराज, मला व आपले दुसरे मित्रांस आपल्या मुलांबाळांविषयीं व घरगुती कामाविषयीं जें काय सांगावयाचें असेल, तें सांगावें; ह्मणजे आपला हा शेवटचा हुकूम बजावून आह्मी आपल्या मर्जीप्रमाणें वागुन आपणास संतुष्ट केलें, असें चित्ताचें समाधान करण्यास आह्मांस जागा होईल. साक्रेतीस ह्मणाला, बाबांनो, आजपर्यंत जें तुह्मांस सांगत आलों त्यापेक्षां अधिक काही मला सांगावयाचें नाहीं. आपणांस चांगलें जपा, ह्मणजे झालें. असें करण्यापेक्षां तुह्मांस आपलें कल्याण करून घेण्यास [illegible] कोणताही मार्ग नाहीं.

किंवा मला संतोष [illegible]

नंतर क्रेतोनें पुन. विचारिलें कीं, आपणास कशी काय मूठमाती द्यावी? साक्रेतिसानें उत्तर केलें, तुमच्या मर्जीस येईल तशी; परंतु हातांतून निसटून जाऊं न देतां तुह्मांस मला पकडतां आलें तर! असें विनोदी भाषण करून तो आप·

त्या मित्रांकडे अवलोकन करीत होत्साता हसत हसत ह्म-णाला, काय करावें, तुह्मांबरोबर जो बोलतो, व जो आ-पल्या भाषणाच्या निरनिराळ्या भागांची रचना करितो, तो साक्रेतीस होय, हें हाडामांसाचें शरीर साक्रेतीस नव्हे, ही गोष्ट मला क्रेतोच्या मनात भरवून देतां येत नाही; कां कीं, ह्यास सर्वदा असें वाटतें कीं, अंमळशानें मरून जमिनीवर पड-णार जो देह, हाच साक्रेतीस होय. हा वेडा मला हा-डामांसाचा गोळा समजतो, आणि विचारितो की, तुह्मांस क-सें काय पुरावें ? असें बोलून तो उठला, आणि शेजारीच एक खोली होती, तेथें स्नानास गेला. त्याचें स्नान झाल्यावर त्याची मुलें त्यास भेटावयास आणिलीं होतीं. तीं तीन होती. त्यांपैकी एक चागलें जाणतें होतें, व दोन अज्ञान होतीं. तो कांहीं वेळ त्यांजबरोबर बोलल्यावर त्यानें त्यां-चें पालन करणाऱ्या बायांस त्यांविषयी सांगावयाचें होतें, तें सागून, त्यांस घरीं लावून दिलें. नंतर आपल्या खो-लींत येऊन तो बिछान्यावर पडला.

इतक्यांत तुरुंगाच्या अंमलदाराचा चाकर येऊन त्यानें त्यास कळविलें की, विष पिण्याची वेळ झाली.

ह्या प्रसंगीं तो चाकर दुःखानें अत्यंत व्याकुळ होऊन पाठमोरा होऊन ढळढळां रडूं लागला. साक्रेतीस तें पाहून ह्मणाला, पहा, हा मनुष्य किती सुजन आहे ! मी कैदी झाल्यापासून हा मला भेटावयास व माझ्याशीं संभाष-ण करावयास वारंवार येत असतो. येथें ह्याच्या बरोबरीचे जे दुसरे कामावर आहेत, त्या सर्वांपेक्षा हा फारच योग्य आहे. हा बापडा मजकरितां कसा मनापासून रडतो आहे पहा !

ही चाकराची गोष्ट चांगली लक्षांत ठेवावयाजोगी आहे. ज्यांस ह्या मनुष्यासारखीं कामें असतील, त्यांनीं सामान्यतः कैदीशीं व कांहीं प्रसंगवशात् थोर मनुष्य त्याच्या ताब्यांत आले असतां विशेषेंकरून त्याशीं आपण कसें वर्तावें, हें ही गोष्ट वाचून शिकावें. असो. नंतर तो प्राणघातक विषाचा पेला आल्यावर आतां हें विष प्याल्यानंतर काय केलें पाहिजे, असें साक्रेतिसानें त्या चाकरास पुसलें. चाकरानें सांगितलें कीं, महाराज, कांहीं नको; आपण हें विष प्यालां कीं लागलेंच इकडे तिकडे फिरावें, आणि पाय दमले असें वाटूं लागलें, ह्मणजे आपल्या अंथरूणावर पडावें, ह्मणजे झालें. मग साक्रेतिसानें स्वस्थपणें तो विषाचा पेला उचलून हातीं घेतला, आणि चाकरास विचारिलें, काय बाबा, कसें काय? ह्या विषांतून कोणी एकाद्यानें लिबेशन[1] केलें, तर परवानगी आहे की नाहीं? परंतु हें आपणास घेण्यापुरतें मात्र आहे, अधिक नाहीं; असें चाकरानें सांगितल्यावरून तो ह्मणाला, बरें, लिबेशन नाही तर नाहीं. निदान आपला धर्म आहे, त्याप्रमाणें देवांची प्रार्थना करून त्यांनीं आपला शेवट गोड करावा, अशी त्यांपाशीं प्रार्थना करण्यास काय चिंता आहे? हें खुशाल करावें. असें बोलून तो कांही वेळ स्तब्ध राहिला, आणि मग विष प्याला. भावनामात्रेंकरून आंगावर रोमांच आणणारा जो हा प्रसंग, ह्या प्रसंगी त्या गंभीर व लोकोत्तर पुरुषानें आपल्या शांत मुद्रेनें

---

१ लिबेशन ह्मणजे हल्लीं ब्राह्मणांत जसा चित्राहुति घालण्याचा विधि आहे, तसा प्राचीन ग्रीक लोकांत ते कांहीं पदार्थ पिऊं लागले ह्मणजे त्या पदार्थाचे द्रव्यांतून कांहीं थोडेंसें देवतोद्देशानें जमिनीवर ओतण्याचा विधि असे, त्या ओतण्यास लिबेशन ह्मणतात.

जी अंतःकरणाची स्वस्थता प्रगट केली, ती शब्दांनीं सांग- णें लांबच आहे; परंतु तिची मनांत कल्पना करणें सुद्धां फार कठीण आहे!

इतका वेळपर्यंत त्याच्या मित्रांनी मोठ्या जुलुमानें अश्रु थांबवून धरले होते; पण त्यानें विष प्राशन केल्यावर त्यांचें देहभान अगदीं सुटून ते उच्च स्वरानें रडूं लागले. त्या मित्रमंडळींत त्याचा दोरस नामें एक मित्र होता. त्या- ची अवस्था अशी झाली होती कीं, साक्रेतिसाचा वर लि- हिलेला संवाद चालला असतां सर्व संवादभर त्या दोरसा- च्या डोळ्यांवाटे एकसारखें पाणी चाललें होतें. तो ह्या प्रसंगीं मोठ्यानें किंकाळ्या फोडून असा कांहीं अतिशय वि- लाप करूं लागला कीं, तो ऐकून त्या सर्व मंडळींचीं अं- तःकरणें फुटून गेलीं, परंतु त्या सर्व समाजांत ज्याच्या चित्तास कांहीं एक व्यथा झाली नव्हती असा एक साक्रे- तीस मात्र होता. त्यानें उलटें आपल्या मित्रांस शोक करितांना थांबविलें. आतां हें त्याचें दाबणें इतरांच्या सारखें कठोरपणाचें नव्हतें; तर त्याच्या चालीप्रमाणें गोडीगुलाबीचें होतें. तो त्यास ह्मणाला, गड्यांनो, तुह्मीं हें मांडलें आहे तरी काय ? तुमचें हें वर्तन पाहून मला चमत्कार वाटतो. अरे, तुमचें धैर्य गेलें तरी कोठें ? बायकांस मनोनिग्रह नसतो, ह्मणून त्या असल्या प्रसंगीं गोंधळ करितात. तो गोंधळ होऊं नये ह्मणून मीं म- घाशीच त्यांस घरीं लावून दिलें. मी बहुतांच्या तोंडून ऐकिलें आहे की, मनुष्यानें देवांचे उपकार आठवून त्यांची स्तुति करीत होत्साता मोठ्या स्वस्थपणें प्राण सोडावे. ह्या- कारितां माझें तुह्मां सर्वांपाशीं मागणें हेंच आहे की, तुह्मी उगे

रहा; आणि आपल्या आगचा धीरपणा अमळ अधिक प्रगट करा; ह्मणजे मी स्वस्थ होईन. साक्रेतिसाच्या तोंडचे हे शब्द ऐकून ते सर्व लज्जित झाले; आणि त्यास उगेंच रहाणें भाग पडलें.

हें भाषण चाललें असतां साक्रेतिसाचें इकडून तिकडे आणि तिकडून इकडे फिरणें चाललें होतें. मग आपले पाय दमले असें पाहून तो सांगितल्याप्रमाणें बिछान्यावर उताणा निजला. मग तें विष उत्तरोत्तर अधिक अधिक आपला गुण करूं लागलें. नंतर तें काळजास भिनूं लागलें असें पाहून मरावयाच्या वेळीं आपणास त्रास होऊं नये, ह्मणून तो क्रेतोस ह्मणाला, क्रेतो, आपण एस्क्युलेप्यसास ( ह्मणजे धन्वंतऱ्यास ) मरते वेळेस एक कोंबडा बळी द्यावा असें आहे; ह्याकरितां तुला सांगतों कीं, तूं तेवढा बळी माझ्या नांवें दे, विसरूं नको बरें. साक्रेतिसाचें हें सरतेशेवटचें भाषण होतें. हें बोलणें झाल्यानंतर त्यानें लवकरच देह सोडला. नंतर क्रेतोनें जवळ जाऊन त्याचे डोळे व तोंड झांकलें. ह्याप्रमाणें साक्रेतिसाचा शेवट झाला. ही गोष्ट शालिवाहन शकाचे पूर्वी ५९७ वे वर्षी घडली. त्या वेळेस साक्रेतिसाचें वय ७० वर्षांचें होतें. सिसरो ह्मणतो की, प्लेतोनें केलेल्या ग्रंथात साक्रेतिसाच्या मरणाचें वर्णन वाचतांना डोळ्यास आसवें आल्यावांचून रहात नाहींत, डोळ्यांस पाणी येतेंच येतें.

साक्रेतीस मेल्यावर त्याला मारूनही त्याच्यावर आळ घेणारांचा कोप शांत झाला नाहीं. ते आपलाही नाश करतील असें भय वाटून प्लेतो व साक्रेतिसाचे दुसरे मित्र

आथेन्स शहर सोडून मैगारा संस्थानांत युक्लिदाचे घरीं गेले, आणि उठलेलें वादळ शांत होईपर्यंत तेथेंच राहिले होते. ह्याप्रमाणें सर्व झाले. एक युरिपैदीस मात्र झाला नाही. त्यानें आथेन्सच्या लोकांस, सर्वांत अत्यंत उत्तम मनुष्य जो साक्रेतीस ह्यास असल्या क्षुलक सबबीवरून तुह्मी मरणाची शिक्षा केली हा मोठा अन्याय केला, असा दोष लावावा ह्या हेतूनें पालामिदीस नामक एक शोकरसप्रधान नाटक रचिलें. त्या नाटकांतील नायक जो पालामिदीस, ह्यासही नीच लोकांनी त्याजवर खोटा आळ घेऊन मारलें होतें. हा पुरुष उगीच पुढें करून कवीनें त्या नाटकांत वस्तुतः आपला मित्र साक्रेतीस ह्याच्या मरणाविषयीं खेद केला होता. त्या नाटकांत सोंगाड्यानें बतावणी करतां करता,

अवघ्या ग्रीकांमाजी नाहीं न्यायानुवर्ति ज्या ऐसा,
त्यातें मारायाची शिक्षा तुह्मी समस्त देत असां !

ही आर्या उच्चारितांच रंगमंडपांतील सर्व लोकांस प्रसिद्ध न्यायानुवर्तित्वगुणावरून साक्रेतिसाचें स्मरण होऊन त्यांच्या डोळ्यावाटे शोकाश्रूच्या धारा चालूं लागल्या; आणि साक्रेतीस फार चांगला मनुष्य होता, त्यास सरकारानें व्यर्थ मारिलें, असा गवगवा इतका मोठा झाला कीं, साक्रेतिसाचें नांव कोणीं प्रसिद्धपणें काढूं नये, काढल्यास दंड होईल, असा सरकारास नवा कायदा करावा लागला.

कोणी असें ह्मणतात कीं, युरिपैदीस हा साक्रेतिसाच्या अगोदर मरण पावला होता, ह्याकरितां त्यानें नाटक केलें वगैरे सर्व गोष्ट खोटी आहे.

आता हें काय असेल तें असो, इतकें खरें कीं, साक्रेतीस मेल्यावर कांही दिवसपर्यंत आथेन्सच्या लोकाचे डोळे उघडले नाहींत. पुढें कांहींका दिवसांनीं त्याविषयीं त्याचे मनात जो द्वेष होता तो सर्व गेल्यावर, व त्यांनीं स्वस्थपणें त्याविषयीं विचार केल्यावर, आपण त्या सज्जनास मारिलें हा आपल्या हातून मोठा घोर अन्याय घडला, असें त्यास स्पष्ट दिसूं लागलें. मग कांही दिवसपर्यंत त्या शहरात साक्रेतिसाच्या स्तुतीखेरीज दुसरी कांही गोष्ट ऐकूं येईनाशी झाली. विद्यालयांत, लोकांच्या घरोघर, लोकाचे सहल करावयास जाण्याचे जे रस्ते असत तेथें, बाजारात, जेथें जावें तेथें साक्रेतिसाच्या तोंडचा प्रिय व गोड असा सूर तोच अद्यापि घुमत आहे, असें लोकांस वाटूं लागलें. अहो, ह्या स्थळीं साक्रेतिसानें आपल्या शहरच्या उमेदवार लोकास चांगल्या रीतीनें वागण्याच्या चालीं लावून तरबेज केलें; ह्या स्थळीं त्यानें आपल्या लहान लहान मुलांस आपल्या देशावर प्रीति करण्यास व आपल्या आईबापांस सन्मान देण्यास शिकविलें; ह्या जागीं त्यानें आह्मांस मोठ्या चमत्कारिक व उत्कृष्ट गोष्टीचा उपदेश केला; व येथें तो आमचे अंतःकरणांत सदाचरण करण्याची व सद्गुण संपादन करण्याची विशेष हौस उत्पन्न व्हावी ह्या हेतूनें योग्य प्रसंग आला असतां कधी कधीं आह्मास दोषही लावीत असे; आणि तो जो आमच्या इतका उपयोगी पडला, त्या उपकारानें आह्मी त्यास फारच चांगलें बक्षीस दिलें ! आह्मां दुष्टात राहून बापडा प्राणास मात्र मुकला ! हाय, हाय, आह्मी केवढे हो कृतघ्न आहों ! आमच्या ह्या पापाचें ईश्वर आह्मांस

काय दारुण फळ देईल तें देवो ! ह्याप्रमाणें सर्व आथेन्स शहरचें शहर पराकाष्ठेचें भय पावून मोठा विलाप करूं लागलें. सर्व लोकांनीं आपलीं कामें करण्याची तहकूब केली, साक्रेतिसावर ज्यांनीं तुफान घेतलें होतें, त्यांस तुह्मी निरपराधी मनुष्यास मारविलें ह्याचें कारण काय तें सांगावें ह्मणून सरकारांतून बोलावणें झालें, त्यांपैकी मिलितस जिवें मारण्याची शिक्षा झाली, व इतरांस हद्दपार करून दिलें. प्लुतार्क नामें ग्रंथकार असें लिहितो कीं, साक्रेतिसावर आळ घेण्याच्या दुष्ट व नीच कामांत ज्यांनीं ज्यांनीं ह्मणून अंग होतें, त्यांचा आथेन्सचे लोक इतका राग करूं लागले कीं, त्यास त्यांनीं विस्तव सुद्धां देऊं नये; त्यांनीं कांहीं विचारिलें असतां त्यांचें उत्तर करूं नये. फार तर काय, ते ज्या हमामखान्यांत न्हात, त्यांत हे न्हात नसत, व कदाचित् आपल्या हमामखान्यास त्यांचा स्पर्श झाला, तर त्या जाग्यास आपण शिवलों तर आपणांस विटाळ होईल ह्मणून तो हमामखाना धुवून ते स्वच्छ करीत. असे सर्व लोक वागूं लागल्यामुळें ते दुष्ट असे त्रासून गेले कीं, त्यांनीं लवकरच आपल्या हातांनीं आपणास मारून घेतलें.

आथेन्स शहरच्या लोकांस साक्रेतिसाच्या वैन्यास पारिपत्य करून समाधान झालें नाहीं; त्यांनीं लिसिपस नामें एक मोठा विख्यात कारागीर होता, त्याजकडून साक्रेतिसाची पितळेची एक मूर्ति करवून शहरांत अत्यंत प्रसिद्ध अशा ठिकाणें होतीं त्यांपैकीं एके ठिकाणीं ती मूर्ति स्थापिली. इतक्यानेंच झालें नाहीं, तर त्या सज्जन पुरुषाविषयीं त्यांची सन्मानबुद्धि व कृतज्ञता इतकी वाढली कीं, ते त्यास देवा-

सारखें पूज्य मानूं लागले. त्यांनी त्याच्या नांवें एक देऊळ बांधून त्याचें नाव साक्रेतिसाचें देऊळ असें ठेविलें.

समाप्त.

---

१ अथेन्सच्या लोकांच्या मनांतून साक्रेतिसाचा राग जाऊन त्याविषयीं त्यांच्या मनांत मोठी प्रीति व भक्ति हीं उत्पन्न झालीं, व त्यांनीं त्याच्यावर दोषारोप करणारांस शिक्षा दिली, ही गोष्ट प्लेटो वगैरे महाप्रसिद्ध अलीकडले इतिहासकार खरी मानीत नाहींत.